विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्द रुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची ४६

जानेवारी २०२२, वर्ष नववे
अंक नववा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५०
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

भाषा, साहित्य आणि लोकशाही
**दीप्ती राऊत**

कोरोनानंतरचे अर्थकारण व मराठी साहित्यव्यवहार
**डॉ. सुधीर संकलेचा**

'वृत्तमाध्यमांचे मनोरंजनीकरण'
संमेलन परिसंवाद : एक आकलन
**डॉ. लतिका भानुशाली**

रॉबिन्सन क्रुसो – डॅनिएल डेफो
Robinson Crusoe by Daniel Defoe
**राजीव श्रीखंडे**

एंटरटेनमेन्टबद्दलच्या कल्पनाच बदलल्या...
**भरत दाभोळकर**
**मुलाखत – राजीव जोशी**

राजकारणाचे बदलते वास्तव आणि तंत्रज्ञानक्रांती
**रोहित भानुशाली**

जर्नी ऑफ ब्लॅक...
**पार्श्वनाथ विजय नांद्रे**

**ग्रंथाली वाचकदिन वृत्तांत / क्षणचित्रे**

**ग्रंथाली पुस्तकप्रकाशन वृत्तांत /**

**'ग्रंथाली' ग्रंथपाने / चांगदेव काळे /**

# संपादकीय...

**गेल्या** महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नाशिक इथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडलं. या चौऱ्याण्णवव्या संमेलनानं गेली दोन वर्षं अशा उत्सवाला पारखं राहिलेल्या रसिकांनी केलेली तुडुंब गर्दी अनुभवली. आजी-माजी संमेलनाध्यक्ष प्रत्यक्ष उपस्थित नसल्याची ही पहिलीच वेळ असावी. बाकी विषय, मांडणी, एकूणच परिसराचं सुशोभिकरण सारं उत्तम होतं. या संमेलनात पुरस्कार प्रदान करून 'ग्रंथाली'च्या कार्याचा गौरव केला गेला. साहित्यसंमेलनांतच पुस्तकांच्या ओढीनं येऊन वाचनभूक शमवणाऱ्या, लेखकांना पाहण्या-ऐकण्याचं कुतूहल असणाऱ्या वाचकांची गर्दी पाहून, त्यातलं महत्त्व ध्यानी घेऊन, गावोगावी पुस्तकं पोचली पाहिजेत या विचारातूनच 'ग्रंथाली'चा जन्म झाला. त्यामुळे साहित्यजागर अर्थात जिज्ञासापूर्ती आणि वाचनवृद्धी करणाऱ्या ग्रंथालीच्या कार्याचा गौरव साहित्य संमेलनात व्हावा, ही समाधानाची बाब आहे. सुदेश हिंगलासपूरकर यांनी आजवरच्या 'ग्रंथाली'च्या प्रवासातील संस्थापकांपासून सर्वदूर सदस्य-कार्यकर्ते, हितचिंतकांसह सुहृदांपर्यंत ज्यांचा ज्यांचा सहभाग राहिला, त्या साऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करत या पुरस्काराचा स्वीकार केला.

संमेलनात जे विषय चर्चेला घेतले गेले त्यातील तीन विषयांवर ऊहापोह या अंकात दीप्ती नाईक, डॉ. सुधीर संकलेचा आणि डॉ. लतिका भानुशाली यांनी केला आहे. माध्यमांचं स्वरूप हा गेल्या काही वर्षांतला एक चर्चेचा विषय झालाय. नव्या तंत्रातून नवी माध्यमं उदयाला येत आहेत. ओटीटी प्लॅटफॉर्म हे आताचं असंच एक माध्यम. दिवाळी अंकात यावर अनेकांनी मतं मांडली. त्याच विषयावर भरत दाभोळकर आणि रोहित भानुशाली यांचे लेख या अंकात आहेत.

गेल्या महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात मुंबईत एक साहित्यसंमेलन पार पडलं. अर्थात, 'ग्रंथाली'चा वाचकदिन. या दिवशी बारा नव्या पुस्तकांचं प्रकाशन झालं. त्याचा उत्तरार्ध रंगला पं. सत्यशील देशपांडे यांनी खुमासदार निवेदनासह सादर केलेल्या 'बंदिशींतील सौंदर्यस्थळे' या कार्यक्रमानं. त्यांच्याच संपादनात डिसेंबर महिन्याचा 'शास्त्रीय कंठसंगीतातील घराणी' या विषयावर अंक सजला. या अंकाला संग्राह्यमूल्य असल्याच्या प्रतिक्रिया येत आहेत. पंडितजींचा व्यासंग, स्पष्ट विचार, गायकांमधले दुराग्रह अथवा आपल्या सर्वच कसं येतं हे दाखवण्याची मानसिकता, बंदिशींचं सौंदर्य कसं खुलवता येतं याचं त्यांनी घडवलेलं प्रात्यक्षिक, हे सारं अनुभवणं एक मेजवानी होती. 'ग्रंथाली'च्या यू ट्यूब चॅनेलवर त्याचा लाभ घेता येईल.

वाचकदिनाचा आरंभ सुदेश हिंगलासपूरकर यांनी घेतलेल्या वार्षिक आढाव्यानं झाला. स्क्रीनचा आधार घेत केलेलं प्रेझेंटेनशन रसिकांना भावलं. त्यानंतर बारा नव्या पुस्तकांचं प्रकाशन झालं. डॉ. बाळ फोंडके, डॉ. अविनाश सुपे, संजीवनी खेर आणि राजीव श्रीखंडे या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ही प्रकाशनं झाली. यावेळी पाहुण्यांनी प्रकाशित पुस्तकांवर बोलण्याऐवजी विशिष्ट विषयावर विचार मांडावेत, ही कल्पना घेऊन त्यांना कोरोनासंदर्भात विज्ञान, आरोग्य, साहित्य आणि माध्यमं असे अनुक्रमे विषय सुचवले होते. या वक्त्यांनी आपापले विषय उद्‌बोधक पद्धतीनं मांडले. नेहमीच्या पठडीपेक्षा वेगळं आणि माहितीपूर्ण ऐकायला मिळाल्याचं रसिकांनी सांगितलं.

ग्रंथाली' कोरोनाकाळातही कशी कार्यरत होती, हे डिजिटल माध्यमातून सादर केलेल्या कार्यक्रमांमुळे सिद्ध झालंच आहे. 'ग्लोबल साहित्यसफर' हा राजीव श्रीखंडे यांच्या अभिजात इंग्रजी पुस्तकांच्या रसाळ परिचयाचा कार्यक्रम न चुकता पाहिला जातोय. १२ डिसेंबरपासून ग्लोकल साहित्यसफर' हा संजीवनी खेर सादर करत असलेला, देश-विदेशांतील लेखिकांच्या अभिजात साहित्याचा परिचय करून देणारा कार्यक्रम पहिल्याच भागात रसिकांच्या मनाची पकड घेता झालाय. हे दोन्ही कार्यक्रम पाहण्यासाठी granthali watch या यूट्यूब चॅनेलला  भेट देऊन ग्रंथालीच्या संपर्कात राहा.

नवीन वर्षात अधिक मुक्त, दडपणरहित, खुल्या वातावरणात आरोग्यसंपन्न जीवन फुलावं, ही सदिच्छा!

**– अरुण जोशी**

# भाषा, साहित्य आणि लोकशाही



**दीप्ती राऊत**

''**साहित्य** वाचकाला आपल्यापलीकडचा समाज, त्यांची संस्कृती, व्यक्ती याबद्दल संवेनशील बनवतं. त्यांच्यासोबत प्रेमाचं आणि आत्मीयतेचं नातं निर्माण करतं''... असे विचार ज्येष्ठ गीतकार जावेद अख्तर यांनी नाशिकमध्ये झालेल्या साहित्य संमेलनानिमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून 'दिव्य मराठी'ला दिलेल्या खास मुलाखतीत व्यक्त केले. 'साहित्या'ची ही अत्यंत समर्पक व सर्वसमावेशक व्याख्या वाटली. परंतु प्रत्यक्षातील साहित्यव्यवहार या वाटेवर नेमका कुठे आहे याचा विचार करताना मात्र पदरी निराशाच येते.

यंदा प्रथमच साहित्य संमेलनात मुख्य निवडणूक कार्यालयाने एक परिसंवाद घेतला. विषय होता, 'भाषा, लेखक आणि लोकशाही'. निवडणूक आयोग आणि साहित्य संमेलन या समीकरणाने अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या, पण 'साहित्यातील लोकशाही' आणि 'लोकशाहीतील साहित्य' याबाबतची चर्चा किमान ९४ वर्षांनंतर का होईना आपण सुरू केली हेही नसे थोडके. 'लोकशाही ही केवळ राज्यव्यवस्था नाही तर जगण्याची पद्धत व्हावी', अशी भूमिका महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी यावेळी मांडली आणि साहित्यव्यवहारात लोकशाही खरेच रुजली आहे का याबाबत अनेक प्रश्नांचा कल्लोळ उठला.

मुळात लोकशाही ही राज्यव्यवस्था म्हणून आपण स्वीकारलेली असली तरी भारतीय समाजव्यवस्था लोकशाहीप्रधान नाही. परिणामी, कुटुंबांपासून सार्वजनिक व्यवहारांपर्यंतची निर्णयप्रक्रिया, नेतृत्व, सहभागिता आणि कार्यपद्धती ही लोकशाही कमी आणि नेतेशाही अधिक अशी दिसते. ('नेतेशाही' हा वेगळा शब्द इथे आवर्जून वापरत आहे. लोकशाहीला विरुद्ध शब्द हुकूमशाही हा वापरला जातो. मात्र एखादी व्यक्ती हुकूमशाही वृत्तीची नसते मात्र यंत्रणेची प्रमुख म्हणून त्या व्यक्तीस सर्व अधिकार सुपूर्द करायचे, त्यांनी 'निर्णय' घ्यायचे आणि बाकीच्यांनी त्याचे फक्त पालन करायचे अशी अलिखित सामाजिक मानसिकता आपल्याकडे दिसते. अनुभव, वय, पद यातील ज्येष्ठतेनुसार त्याचे नेतृत्व एखाद्या व्यक्तीकडे जाते, त्यांनी घेतलेल्या निर्णयांना सहज सर्वमान्यता मिळते आणि बाकीच्यांवर 'निर्णय' घेण्याची जबाबदारी पडत नाही ही सोयीची रचना सगळ्यांना आवडते.) नेतेशाहीबद्दल विस्ताराने लिहिण्याचे कारण, लोकशाहीचे व्यवहार हे आपल्या जीवन-विचार-वर्तन आणि व्यवहारातच कसे अद्याप भिनलेले नाहीत याचा खुलासा करण्यासाठी. मग ती कुटुंबव्यवस्था असो, कार्यालय असो, पक्ष-संघटना असोत वा संमेलने असोत.

लोकशाही व्यवस्थेत सर्वांना सामावून घेणे, परिघावरील वंचित, उपेक्षितांना (ज्यांचे प्रतिनिधित्व कमी आहे किंवा अजिबात नाही त्यांना) जाणीवपूर्वक प्रवेश देणे, संधी देणे व सामावून घेणे अभिप्रेत आहे. ही सहभागिता प्रतिनिधित्व, कारभार व निर्णयप्रक्रिया या साऱ्यात प्रतिबिंबित झाली तरच ती वर्तन-व्यवहार आणि विचारांच्या पातळीवर उतरते. मराठी साहित्यव्यवहारात ही प्रक्रिया जाणीवपूर्वक न झाल्यामुळे असेल कदाचित, साहित्यसमूहाची शकले झाली आणि संमेलनाच्या अनेक चुली मांडल्या गेल्या. गेल्या पंधरा-वीस वर्षांपासून त्याबाबत असंख्य चर्चाचर्वणे झाल्यावरही त्या मुद्यांना किंवा प्रक्रियांना मराठी भाषा व साहित्यविश्वात स्पर्श केला जात नाही हे पुरोगामी महाराष्ट्रासाठी निश्चितच लाजिरवाणे आहे. परिणामी, एवढा सुरेख सोहळा झालेल्या या साहित्य संमेलनाच्या निमंत्रणपत्रिकेत २५७ निमंत्रितांमध्ये महिलांची नावे होती फक्त ३३ (ज्यात ३० महिला कविकट्टा आणि बालसाहित्य मेळाव्याच्या प्रमुख होत्या!) आणि उद्घाटन व समारोपसत्राच्या वेळी व्यासपीठावरील महिलांची संख्या होती अवघी ४ टक्के. हे

कशाचे द्योतक आहे? मुद्दा टक्कावाढीसाठी महिलांना प्रतिनिधित्व दिले पाहिजे हा नाही, तर साहित्यविश्वातील अर्धे अवकाश व्यापलेल्या एका घटकास न्याय्य प्रतिनिधित्व दिले पाहिजे, त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली पाहिजे, आपण त्यांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे, निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग हवा याचा विचारच अद्याप आपल्या बौद्धिक कवाडांमध्ये न येणे, त्याबद्दल कुणाला खंतही न वाटणे, द्रष्ट्यांनी त्यासाठी तत्त्व म्हणून आग्रही न राहणे हे चिंताजनक आहे.

येथे महिलांचे प्रतिनिधित्व हा एक निकष म्हणून, एक उदाहरण म्हणून मांडले आहे. साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर किती आदिवासी, किती मागास जातीजमातीच्या, भटक्या समूहांच्या, तृतीयपंथीयांसारख्या वेगळ्या गटांना प्रतिनिधित्व दिले जाते याचा याच धर्तीवर विचार केल्यास हाती मोठा भोपळा लागतो.

या मुद्दा थोडा विस्ताराने समजून घेण्यासाठी महिलांचे प्रतिनिधित्व या मुद्यावर थोडे तपशिलात जाऊ. एखाद्या समाजातील स्त्रियांची स्थिती कशी आहे त्यावर संबंधित समाजाच्या 'प्रगती'चे मोजमाप होते. त्यात भाषा ही तर थेट मानसिकता ध्वनित करणारी. मराठी भाषेत जातिवाचक समूहांचे अपमानकारक शब्द बदलण्याचे महत्त्वाचे परिवर्तन झाले. मात्र, लिंगवाचक शब्दांची मात्र समतेच्या मूल्यातून चिकित्सा होताना दिसत नाही. इंग्रजी भाषेतील 'चेअरमन' हा शब्द बाजूला सारून 'चेअर पर्सन' हा समभावावर आधारलेला शब्द रुजवला गेला. 'मॅन पॉवर' या शब्दाला 'ह्युमन रिसोर्स' हा प्रतिशब्द आला. 'कॅमेरामन'ऐवजी 'कॅमेरा पर्सन' असा उल्लेख सुरू झाला. मराठी किंवा हिंदीत 'सभापती'पदी महिला विराजमान झाल्या, पण त्यांचा उल्लेख 'सभापती महोदया' असा केला जातो. 'पत्रकार', 'अधिकारी' या शब्दांमध्ये दिसणारी लिंगभावतटस्थता लेखक-लेखिका, कवी-कवयित्री, निवेदक-निवेदिका यांसारख्या शब्दांमध्ये आपल्याला आणावी लागेल. 'शेतकरी' हा शब्द उच्चारताच फेटेवाला पुरुष डोळ्यांसमोर येतो त्याप्रमाणेच 'लेखक' हा शब्द उच्चारताच झोळीवाला 'पुरुष' डोळ्यांसमोर येतो.

मंत्रिमंडळात महिलांना 'महिला व बालविकास', आरोग्य', 'शिक्षण' यांसारखी ठोकळेबाज खाती देण्यात येतात, त्यानुसार संमेलनात बालसाहित्य मेळाव्याचे प्रमुख पाहुणेपद देण्याचा सोपस्कर पार पाडण्यात आला. कोरोनानंतरचे अर्थकारण, शेतकऱ्यांच्या दुरवस्थेचे समाजकारण या बौद्धिक परिसंवादांमध्ये चर्चा फक्त पुरुषांनी केली. यवतमाळच्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या विधवा पत्नीने केले, हे सारे विसरून गेले. मागे एकदा साहित्य संमेलनातील स्त्रियांच्या अल्प टक्क्यावर टीका झाल्यावर एका संमेलनात 'महिला साहित्य' या विषयावर एक परिसंवाद ठेवून या पोकळीची बोळवण करण्यात आली होती. पुढे त्यावर टीका झाल्यावर तो रद्द करावा लागला. एवढा एखाद्या समाजघटकाला सामावून व समजून घेण्यातील आपल्या साहित्यव्यवहाराचा संकुचित विचार दिसतो. महिला, दलित, आदिवासी, भटके, अल्पसंख्याक यांच्यासाठी स्वतंत्र संमेलन किंवा स्वतंत्र परिसंवाद हे यावरील उत्तर नाही, तर मुख्य प्रवाहातील अवकाश व निर्णयप्रक्रिया यात त्यांचा सहभाग वाढल्याशिवाय हे क्षितिज विस्तारणार नाही हे नक्की. अन्यथा, 'विद्रोही'सारखी अनेक शकले होऊन अंतिमत: मुख्य प्रवाहातील परिवर्तन निष्प्रभ राहील.

बीबीसीतर्फे जगभरातील शंभर प्रभावशाली महिलांची यादी प्रसिद्ध करण्यात येते. आपली संस्कृती, कला, स्वातंत्र्य, मानवी हक्क पुनर्स्थापित करण्यासाठी योगदान देणाऱ्या महिलांची ही यादी असते. त्यात फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, आफ्रिका, अफगाणिस्तान अशा अनेक देशांतील लेखिका, कलाकार, कार्यकर्त्यांचा समावेश आहे. यात भारतीय महिला आहेत फक्त दोन आणि त्यात मराठी आहेत, 'शून्य'!

भोवतालचे जग प्रचंड वेगाने बदलते आहे. नवीन पिढीचे जगणे, त्यांचे भावविश्व, त्यांचे प्रश्न भाषा व साहित्यास कवेत घ्यायचे असतील तर खूप सारे खळखळून हलवावे लागेल, ढवळून काढावे लागेल. एचआयव्ही-एड्स प्रतिबंधात्मक मोहिमेचा भाग असलेल्या वेश्याव्यवसायातील महिला संघटित झाल्यावर त्या म्हणू लागल्या, आम्हाला 'देहविक्रेत्या' किंवा 'वेश्या' म्हणून नका. इंग्रजीत 'सेक्स वर्कर' हा शब्द रुढ झाला. मराठीत त्यांना कोणता शब्द वापरायचा हा झगडा अद्याप संपलेला नाही. 'आयटम गर्ल', 'आयटम साँग' हे शब्द महिलांकडे उपभोग्य वस्तू म्हणून बघणाऱ्या मानसिकतेचा परिपाक आहेत. तरीही त्यांची एवढी चलती आहे. तमाम शिव्या महिलांचा, विशेषत: त्यांच्या लैंगिकतेचा उद्धार करणाऱ्या. त्यावर अधिकार गाजवणाऱ्या. या दशकात एलजीबीटी (लेस्बियन, गे, बायोसेक्शुअल, ट्रान्सजेंडर) हा मोठा समूह व्यक्त होऊ लागला. मराठीतील कोणत्या शब्दाने त्यांचे विश्व मांडायचे? शहीद जवानांच्या वॉर विडोज, काश्मीरमधील हाफ विडोज, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील फार्म विडोज, कोविडमध्ये पती गमावलेल्या कोविड विजोड. परंतु 'विधवा' शब्दासोबत येणारा सामाजिक कलंक वगळून त्यांची ओळख करून देणारा गोळीबंद शब्द भाषा कधी शोधणार आणि कधी देणार?

एरवी क्लिष्टतेमुळे टीकेची धनी असलेल्या सरकारी यंत्रणेने एकट्या महिलांसाठी 'एकल' हा चळवळीने दिलेला शब्द स्वीकारला आणि तो शासकीय पत्रकांमध्ये रुजला. त्यानिमित्ताने एकट्या महिलांचे जगणे, त्यांचे म्हणणे सार्वजनिक चर्चेच्या पटलावर आले. तोपर्यंत 'एकल महिला' या समूहाचे सामाजिक अस्तित्वच भाषेच्याच नाही तर लोकजीवनाच्या, धोरणकर्त्यांच्या चर्चापटलावर आले नव्हते. या निमित्ताने या समाजसमूहाला दृश्यता मिळाली. गावागावातील विधवा, परित्यक्ता, कुमारी माता, प्रौढ कुमारिका यांची स्वतंत्र गणना झाली आणि 'एकल' या एका शब्दामुळे त्या एकत्र आल्या, संघटित झाल्या. त्यांच्यासाठी योजना तयार होऊ लागल्या, त्यांचे म्हणणे विचारात घेतले जाऊ लागले. लोकशाही प्रक्रियेत एक शब्द केवढा बदल घडवून आणू शकतो याचे हे उदाहरण.

मात्र, हा प्रवास येथेच संपत नाही. भाषा ही प्रवाही असते असे म्हटले जाते. 'एकल' या शब्दाचा अनुभव तेच सांगतो. या

शब्दाच्या निर्मितीने ग्रामीण भागातील एकट्या झगडणाऱ्या महिलांना अस्तित्व दिले, संघटनेची ताकद दिली, मात्र शहरी व स्वावलंबी तरुण मुलींना हा शब्द अपमानकारक वाटतोय. याच शब्दाची तिसरी बाजू मांडणारा; एक विचारात टाकणारा अनुभव एका सामाजिक कार्यकर्त्याने मांडला. गावातील एकल महिलांचे एक सर्वेक्षण सुरू असताना माहिती देणाऱ्याच्या रकान्यांमध्ये 'विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता' असे पर्याय होते. एक बाई म्हणाल्या, मी या तिन्ही प्रकारांत मोडत नाही. मी नवऱ्याला सोडलेय, तुम्ही तसा वेगळा उल्लेख करा. यास मराठीत शब्द न सापडल्याने अखेरीस कार्यकर्त्यांनी 'एमएनएस – मी नवऱ्याला सोडले' ही स्वतंत्र कॅटेगिरी त्या फॉर्ममध्ये टाकली आणि सर्वेक्षणातील वीस टक्के महिलांनी आपली गणना त्या रकान्यात करावी असे सांगितले. आता नवऱ्याने 'टाकलेली' बायको एवढ्या दुय्यम व हीन शब्दात ज्या समूहाचे आपल्या भाषेत, आपल्या समाजव्यवहारात वर्णन केले जात असेल, ती 'मीच नवऱ्याला सोडले' अशी आपली वेगळी ओळख सांगत असेल, तर तिचे म्हणणे कवेत घेणारा शब्द कोणता? मित्रासोबत बोलणे हा 'व्यभिचार' कसा ठरतो या एखादीच्या प्रश्नाचे पडसाद कोणत्या साहित्यात पडतात? 'मूव्ह ऑन', 'ब्रेक अप' या बदलत्या पिढीचे भावविश्व कोणत्या शब्दांत मांडायचे? महिलांची आत्मचरित्रे प्रसिद्ध नवऱ्यांभोवतीच घुमत राहिलीत. बदलते नातेसंबंध, बदलते अनुभवविश्व त्याच्या कोसो मैल पुढे गेलेय.


प्रसिद्ध चित्रपटकार अमोल गुप्ते एका मुलाखतीत म्हणाले, एकेकाळी जागतिक स्तरावील हिंदी सिनेमा बॉलीवूडच्या नावाने पिंक बेडरूम आणि बार्बी डॉलच्या कचकडीपणात हरवला. तीच गत आजच्या साहित्यात झाल्याची दिसते. फाशीच्या कैद्यांना भेटून हिंसेचा अभ्यास करणारे, सामाजिक कार्यकर्त्यांशी जोडून घेऊन 'समाज' समजून घेणारे तेंडुलकर स्कूल केव्हाच कुलूपबंद झाले. समाज, लोकशाही, दूर ज्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्कामुळे आपण लिहू शकतो त्याच्या संरक्षणासाठीही तोंड उघडण्याची हिंमत नसावी एवढी हतबलता, कौर्याची परिसीमा गाठली जात असताना काहीच न वाटण्याचा बोथटपणाने साहित्यविश्वही गोठून गेल्याचे दिसतेय.

लोकशाहीप्रक्रियेमुळे जळगाव जिल्ह्यातील एका गावात अंजली पाटील नामक तृतीयपंथी ग्रामपंचायतीच्या सदस्या होतात, मात्र अंधारातील एक पूर्णपणे वेगळे भावविश्व आपल्या कवितांमुळे जगापुढे आणणारी दिशा शेख ही तृतीयपंथी कवी आपल्या संमेलनात निमंत्रित केली जात नाही. प्रचंड वेगाने बदलणाऱ्या या जगात वंचितता, उपेक्षिततेचा परीघही स्थळकाळानुसार झपाट्याने बदलतोय. मूठभरांच्या हातातील अभिव्यक्तीची मक्तेदारी केव्हाच संपुष्टात आली आहे. सधन वर्गाकडे एकवटलेली संपादन, प्रकाशन, वितरणाची प्रक्रिया समाजमाध्यमांमुळे सार्वत्रिक झाली. 'मला जे वाटतं', 'मी जे अनुभवते' ते मांडण्याची संधी प्रत्येकाच्या तळव्यात आली. बोटाच्या टोकावर भाषा नाचू लागली आहे आणि एका क्लिकने ती जगापर्यंत पोहोचू लागली आहे. त्यातील अक्षरे कमी होत आहेत, मात्र विश्व विस्तारत चाललेय. तंत्रज्ञानाने अभिव्यक्तीचे लोकशाहीकरण झाले. मुद्दा आहे, त्यातून पुढे येणाऱ्या स्पंदनांना समजणारे, स्थान देणारे, लोकशाहीने खुले केलेले अवकाश कवेत घेण्याची ताकद व कुवत विद्यमान भाषाव्यवहार व साहित्यविश्वात आहे का याचा.


**– दीप्ती राऊत**
प्रतिनिधी, दिव्य मराठी
diptiraut@gmail.com

**ग्रंथाली**

## अरुण साधू पाठ्यवृत्ती पुस्तके





**माझ्या मराठीचा बोल**
**अरुण साधू**
**मूल्य १२५ रु.**
**सवलतीत ७५ रु.**




**मोइ कुन? आमी कुन?**
**मेघना ढोके**
**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**




**ऐसे नको गोरक्षण...**
**दत्ता जाधव**
**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**



**पोर'पॉर्न'खेळ**
**मुक्ता चैतन्य**
**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

# कोरोनानंतरचे अर्थकारण व मराठी साहित्यव्यवहार



**डॉ. सुधीर संकलेचा**

**समाजकारण,** राजकारण आणि अर्थकारण ह्या प्राधान्यक्रमाने विकसित होणारा समाजव्यवस्थेचा प्रवास आता उलट्या क्रमाने होताना दिसतो. संपूर्ण जगाचे केंद्रस्थान आता अर्थकारणाकडे झुकले असून अगदी घर चालवण्यापासून देश चालवण्यापर्यंत प्रत्येक गोष्ट अर्थकारणावर अवलंबून आहे. प्रत्येक व्यवसायाचे एक स्वतंत्र अर्थकारण असले तरी ते आपल्या देशाच्या अर्थकारणाशी सुसंगतच असावे लागते आणि मराठी साहित्यव्यवहारदेखील त्याला अपवाद असू शकत नाही.

ह्याच अनुषंगाने नुकत्याच नाशिक येथे पार पडलेल्या चौऱ्याण्णवव्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनात 'कोरोनानंतरचे अर्थकारण व मराठी साहित्यव्यवहार' या विषयावर परिसंवाद अर्थतज्ज्ञ, प्रकाशक, पत्रकार व संपादक यांच्या सहभागाने पार पडला. अर्थकारणाची बदललेली दिशा, भारताची बदललेली आर्थिक धोरणे, कोरोनापूर्वीची आणि नंतरची आर्थिक परिस्थिती व त्याचे विविध घटकांवर झालेले परिणाम, मराठी साहित्यव्यवहार आणि त्याच्याशी निगडित प्रकाशक, विक्रेते, लेखक, वाचक व वृत्तपत्रे यांची झालेली आर्थिक परवड आणि बदललेली भूमिका या सर्व बाबींचा वेगवेगळ्या अंगांनी व वेगवेगळ्या भूमिकांमधून ऊहापोह झाला.

अर्थकारण म्हणजे अर्थातच आर्थिक धोरणे. जागतिक स्तरावर आणि आपल्या देशपातळीवर यात वेळोवेळी काळानुसार व गरजेनुसार बदल होत असतात. प्रत्येक देशाची आपली एक चौकट असते, त्या चौकटीत राहूनच आपल्याला आर्थिक धोरणे ठरवावी लागतात. कोरोनानंतरच्या अर्थकारणावर भाष्य करण्याआधी अर्थकारणाची बदललेली दिशा व त्याची कारणे समजून घेणे आवश्यक ठरते. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर यांनी ह्या अर्थकारणाच्या बदललेल्या दिशेचा प्रवास उलगडून दाखवताना सांगितले, की साधारणपणे १९३०पर्यंत सोन्याच्या साठ्यांशी निगडित असणारे चलनसाठ्याचे नाते जागतिक महामंदीनंतर तुटले आणि गरजेनुसार चलनछपाई सुरू झाल्याने अर्थकारणाचा प्रवास हा डेफिसिट बजेट अर्थात तुटीच्या अर्थसंकल्पाकडे सुरू झाला. जागतिक बँकेचा उदय होऊन कर्ज घेण्याचे प्रमाण वाढले. त्यानुसार विकसित, विकसनशील आणि अविकसित राष्ट्रे या संकल्पना उदयास आल्या. जागतिक सावकारी सुरू झाली. त्यानंतरच्या काळात विकसित देशांमधील उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जागतिकीकरणाचे वारे वाहायला लागले आणि जागतिक व्यापार संघटनेने अर्थकारणाच्या 'रेडीमेड पॉलिसी' बनवून त्या विविध देशांच्या माथी मारण्यास सुरुवात केली. अत्याधुनिक जागतिक उत्पादने हवी असल्यास व देशाचा विकास करायचा असल्यास या चक्रव्यूहात शिरण्याशिवाय आपल्याला पर्याय नव्हता आणि त्यानुसार आपणदेखील १६० देशांच्या कळपात सामील झालो. अर्थातच, त्याच्या परिणामी उत्पादन विषमता, मालमत्ता विषमता आणि प्रादेशिक असमतोल वाढला. चीनसारख्या देशाने या संधीचा पुरेपूर वापर करून घेतला आणि अनेक क्षेत्रांत आपली एकाधिकारशाही निर्माण केली. जागतिकीकरणाच्या अर्थकारणात भारतासारख्या देशाला काही फायदे आणि तोटे झाले. अनेक वर्षे भारताने आपला विकासाचा वेग आणि दर आपल्या गरजेनुसार, आपल्या लोकसंख्येला मानवेल अशा पद्धतीने नियंत्रित ठेवून समतोल विकास साधण्याचा प्रयत्न केला. पचेल तेवढेच जेवावे असे म्हणतात तसेच काहीसे आपण सुरू ठेवले, पण हा सुरू असलेला

विकासाचा दर खूप कमी आहे, असे भासवून आपल्याकडे २०१४ साली सत्ताबदल झाला. आणि त्या अनुषंगाने आपली आर्थिक धोरणेदेखील बदलली. आपल्याकडे अर्थव्यवस्थेत नसलेला काळा पैसा हा भ्रष्ट व्यवस्थेतून निर्माण झालेला असल्याने तो नष्ट झाल्यास आपण अधिक सक्षम होऊ ह्या भ्रमातून सरकारने अचानक नोटाबंदीसारखा निर्णय घेतला आणि मूळ उद्दिष्ट साध्य न होता, सर्वसामान्य नागरिकांना आणि अनेक क्षेत्रांना त्याचा फटका बसला. नोटाबंदी झाली नसती तर कदाचित कोरोनाकाळात आपली अर्थव्यवस्था अधिक चांगल्या पद्धतीने तग धरू शकली असती, असा निष्कर्ष अनेक अर्थतज्ज्ञांनी नोंदवला असल्याचे दिसून येते.

दिल्लीत अनेक वर्षे पत्रकारिता केलेल्या सुरेश भटेवरा ह्यांनी सरकारच्या नोटाबंदी आणि जीएसटी धोरणांवर अतिशय परखड भाष्य करून अत्यंत घाईघाईत कुठलीही फारशी पूर्वतयारी न करता जीएसटीची अंमलबजावणी कशी झाली आणि त्याचाही फटका अनेक उद्योगांना कसा बसला ह्याचे विस्तृत विश्लेषण केले. विशेषत: सेवाक्षेत्रावर भर दिल्यामुळे सरकारचे उत्पन्न वाढले, पण सोबतच महागाईदेखील प्रचंड प्रमाणावर वाढली. प्रत्यक्ष आयकर भरण्याचे प्रमाण कमी असले तरी प्रत्येकाच्या खिशातून अप्रत्यक्षरीत्या खूप मोठ्या प्रमाणावर करवसुली सुरू झाली. लोकांची कर्जे घेण्याची क्षमता कमी झाली. चलनवाढ आणि महागाईमुळे आपली अर्थव्यवस्था फुगली. तिला सूज आलेली दिसून येते, पण तिची 'ग्रोथ' मात्र झालेली दिसून येत नाही. कारण डॉलरच्या तुलनेत रुपया घसरला. 'एक देश एक कर' या अतिशय उत्तम संकल्पनेवर आधारित जीएसटी ही करप्रणाली तिच्या अंमलबजावणीत सुसूत्रता नसल्याने अनेक क्षेत्रांसाठी घातक ठरली. विकासकामांसाठी अधिक पैसा उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून सरकारने आपली 'रिझर्व्ह गंगाजळी'देखील रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून वापरली. भरीस भर डिजिटल क्रांतीमुळे आणि वाढत्या संगणकीय प्रणालीमुळे विविध क्षेत्रांत मनुष्यबळाची गरज कमी होऊ लागली. ज्यामुळे अनेक जणांचे रोजगार जाऊन बेरोजगारी वाढली. सरकारचे उद्दिष्ट भारताला आर्थिक महासत्ता बनवण्याचे असले तरी भारताच्या लोकसंख्येचा, लोकांच्या कुवतीचा, दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या अशिक्षित, केवळ श्रमावर आधारित काम करू शकणाऱ्या खूप मोठ्या जनसमुदायाचा विचार केल्यास समाजात निर्माण होणारी आर्थिक विषमता ही देशासाठी अधिक चिंता वाढवणारी आहे. एका ठरावीक वेगाने होणारा विकासच आपल्यासारखा देश पचवू शकतो ह्याचा विचार होणे आवश्यक आहे. विशेष करून कोरोनाकाळात ह्याची जाणीव अधिक प्रकर्षाने झाली. आर्थिक विकासापेक्षादेखील आपल्या कृषी, आरोग्य आणि शिक्षण व्यवस्थेचा विकास झाल्यास साक्षरता वाढीस लागून नवीन पिढी आपोआपच अधिक सुदृढ आणि आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होऊ शकेल.

कोरोनाकाळात आणि कोरोनानंतरच्या दोन वर्षांत अनेक व्यवसाय, उद्योग, सेवाक्षेत्रे यांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागले. मराठी साहित्यव्यवहारही त्याला अपवाद नव्हता. कारण पुस्तकांना जीवनावश्यक बाबींचा दर्जा आपण दिलेला नाही आणि कदाचित तो कधी देऊ शकणार नाही. कारण रोटी, कपडा आणि मकान ह्या महत्त्वाच्या मूलभूत गरजादेखील आपण अजून पूर्ण करू शकलेलो नाही. मराठी साहित्यव्यवहारातील कोणाकोणाला कोरोनाचा फटका बसला, तर मुख्यत्वे ग्रंथनिर्मिती करणारे प्रकाशक, त्यांचे वितरण करणारे वितरक, पुस्तकविक्रेते आणि लेखनावरच ज्यांची गुजराण होते असे लेखक. सोबतच मराठी साहित्यनिर्मितीला आणि वाचनसंस्कृतीला चालना देणारी वृत्तपत्रेदेखील यात भरडली गेल्याचे दिसून आले. यावर आधारित मुद्रणालयांनादेखील याचे परिणाम भोगावे लागले.

नवीन पुस्तके प्रकाशित होण्याचे प्रमाण तर ह्या काळात अगदीच नगण्य होते. कारण प्रत्येकाकडे एक स्मार्टफोन आला होता ज्यावर वाचायला आणि वेळ घालवायला वाटेल ती माहिती उपलब्ध होती. ह्याच काळात डिजिटल वाचनसंस्कृती मोठ्या प्रमाणावर वाढीस लागली. ह्याचा खूप मोठा फटका प्रकाशनसंस्थांना बसला.

पुस्तकांचा विचार केल्यास, शालेय व महाविद्यालयीन पाठ्यपुस्तके आणि त्यावर आधारित गाईड, प्रश्नसंच यांसारखी इतर पुस्तके, व्यावसायिक अभ्यासक्रमांची उपलब्ध असणारी अक्षरश: असंख्य पुस्तके यांचा एकूण पुस्तकविक्रीतील वाटा हा जवळपास ३५ ते ४० टक्के एवढा असतो. महाराष्ट्रात जवळपास १,१४,००० शाळा व १६,००० महाविद्यालये ऑनलाइन झाली. कोरोनाकाळात ऑनलाइनमुळे हा संपूर्ण पुस्तकविक्री व्यवहार ठप्प झाला आणि मुख्य म्हणजे यातील बहुतांश पुस्तके डिजिटल फॉरमॅटमध्ये उपलब्ध झाल्याने ह्याचे दूरगामी परिणाम होऊन कायमसाठी विक्रीकपात होण्याची भीती निर्माण झाली.

पुस्तकविक्रीचे दुसरे हक्काचे व्यासपीठ म्हणजे शासकीय अनुदान मिळणारी सार्वजनिक वाचनालये. वाचनसंस्कृती वाढवणाऱ्या या वाचनालयांकडून दरवर्षी एकूण पुस्तकविक्रीच्या जवळपास ३० ते ३५ टक्के पुस्तकखरेदी केली जाते. १२,८८७ इतक्या प्रचंड संख्येने असणारी ही वाचनालये या काळात बंद होती. सरकारने अनुदानदेखील न दिल्याने ती हक्काची पुस्तकपेठ बंद पडली.

लोकांनी पुस्तकखरेदीकडे पाठ फिरवल्याने अनेक पुस्तकविक्रेत्यांना आपली दुकाने बंद करून इतर पारंपरिक व्यवसायांकडे वळावे लागले. अगदी दुकानांची भाडी देणे त्यांना शक्य झाले नाही. काही दुकाने तर आता कायमस्वरूपी बंद पडली आहेत.

महाराष्ट्रातील जवळपास एकोणीस जिल्ह्यांमध्ये ललित साहित्य विक्रीची दुकाने नाहीत, अशा ठिकाणी पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध करण्याचे कार्य विविध प्रकाशन आणि वितरणसंस्था या ग्रंथप्रदर्शनाच्या माध्यमातून करत असत आणि त्याला उत्तम प्रतिसाद लाभत असे. एकूण पुस्तकविक्रीच्या जवळपास १२ ते १५ टक्के पुस्तके या प्रदर्शनांतून विकली जात असत. परंतु कोरोनाकाळात आणि पश्चात ही प्रदर्शने भरलीच नाहीत. कारण पुस्तके विकली जातील याची शाश्वती नव्हती आणि आधीच आर्थिक कंबरडे

मोडलेले असल्याने कोणाचीही जोखीम घेण्याची तयारी नव्हती. त्यातल्या त्यात जी काही पुस्तकविक्री झाली ती ऑनलाइनच्या माध्यमातून. मात्र वाचकांची क्रयशक्ती व उत्साह कमी झाल्याने वैयक्तिक पुस्तकखरेदीही मंदावली. पुस्तकवाचन हे लोकांसाठी दुय्यम झाले. खरे तर जग कसे चाललेय हे पुस्तके सांगतात, पण कोरोनाकाळात जगायचे कसे हाच प्रश्न होता तेथे घर सावरायचे की जग समजून घ्यायचे? त्यामुळे एकांत अंगावर येत होता तरीही मानसिक अशांततेमुळे लोकांचे पुस्तकवाचन मंदावले होते. लोक निष्क्रिय झाले होते.

पुस्तकव्यवहाराची जी अवस्था होती तीच गत वृत्तपत्रांचीदेखील झाली होती. 'दैनिक सकाळ'च्या उत्तर महाराष्ट्र आवृत्तीचे संपादक राहुल रनाळकर ह्यांनी वृत्तपत्रांची कोरोनाकाळातील अवस्था, बिघडलेले आर्थिक गणित आणि तरीही वृत्तपत्रे कशी आणि का टिकून राहिली ह्यावर प्रकाशझोत टाकला. सुरुवातीच्या काळात वृत्तपत्रे घरात घ्यायलादेखील लोक घाबरत होते. जवळपास छत्तीस हजार वृत्तपत्र विक्रेते आणि हॉकर बेरोजगार झाले, अनेक मृत्युमुखी पडले. वृत्तपत्रे बंद पडतील की काय असेही वाटून गेले. जाहिराती कमी झाल्या, ऑनलाइन डिजिटल एडिशन काढाव्या लागल्या, तरीही वृत्तपत्रे टिकली आणि कोरोनाविषयीच्या खात्रीशीर आणि खऱ्या बातम्या व माहिती ही वृत्तपत्रांनीच पुरवली असे WHO आणि UN ने देखील म्हटले. पुस्तके विकत घेऊ न शकणाऱ्यांना साहित्यवाचनाचा आनंद वृत्तपत्रे विविध ललित लेखांच्या व कॉलमच्या माध्यमातून देतात आणि हा मराठी साहित्यव्यवहार जिवंत ठेवतात असे म्हटले तर वावगे होणार नाही.


सगळ्यात शेवटी, ह्या मराठी साहित्यव्यवहारातील सगळ्यात महत्त्वाचा घटक म्हणजे ही साहित्यनिर्मिती करणारा लेखक. त्याचे आर्थिक गणित तर पूर्णच कोलमडले. लेखकांकडे वेळ भरपूर होता, पण साहित्यनिर्मितीसाठी लागणारे वातावरण नव्हते. मानसिक शांतता नव्हती. एक प्रकारची अस्वस्थता होती. एकांत होता, पण तो सुखावह नव्हता. माणसे एकमेकांविषयी साशंक होती, माणसांवरचे प्रेम आणि विश्वास कमी झाल्याने सकस साहित्यनिर्मिती अशक्य होती. सगळीकडे मृत्यू, मृत्यूचे भय, स्थलांतरितांचा तांडा बघून काही अस्वस्थ लेखक लिहिते झाले. ज्ञानपीठविजेते नेमाडे यांनी या काळात मृत्यूवर पन्नास कविता लिहिल्या. पारूल खक्कर या गुजराती कवयित्रीने तर अंगावर शहारा अणणारी एक कविता लिहिली. परंतु ही काही मोजकी उदाहरणे सोडली तर फारशी साहित्यनिर्मिती या काळात झाली नाही. भविष्याची चिंता वाटली की माणूस इतिहासात डोकावतो या न्यायाने जुन्याच पुस्तकांची थोडीफार विक्री झाली. साहित्यनिर्मिती आणि वाचन दोन्ही दुय्यम होते.

सारांशात संपूर्ण परिसंवादाचा आढावा घेताना ज्येष्ठ पत्रकार जयदेव डोळे ह्यांनी सकारात्मक भूमिका मांडली. ते म्हणाले, कोरोनापश्चात अर्थकारण चाचपडत का होईना हळूहळू पूर्वपदावर येऊ पाहतेय. साहित्यनिर्मितीसाठी परस्परसौहार्द, प्रेम आणि विश्वास वाढवणे आवश्यक आहे. माणसे एकमेकांपासून दूर जात आहेत. साहित्य त्यांना जवळ आणण्याचे काम करेल, असा विश्वास वाटतो.


हा विश्वास वाढणे हीच काळाची गरज आहे.

**– डॉ. सुधीर संकलेचा**
**एम.डी.(पॅथ.)**
s.sankalecha@rediffmail.com

ग्रंथाली




शरद काळे
यांचे
दोन पुस्तके




**चिंतन - भाग २**

**मूल्य ७५० रु.**
**सवलतीत ४५० रु.**

**विज्ञानाच्या पाऊलखुणा**

**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २४० रु.**

# ‘वृत्तमाध्यमांचे मनोरंजनीकरण’ संमेलन परिसंवाद : एक आकलन



**डॉ. लतिका भानुशाली**

**नैतिकतेची** जबाबदारी समाजातील ज्या घटकांवर प्रामुख्याने टाकली जाते; किंबहुना अपेक्षिली जाते ते घटकवर्ग म्हणजे शिक्षक, डॉक्टर आणि पत्रकार. शिक्षकांनी कमी पैशांत ‘साधी राहणी आणि उच्च विचारसरणी’ आत्मसात करावी, डॉक्टरांनी अल्प मोबदल्यात रुग्णसेवा करावी आणि पत्रकारांनी समाजाचे प्रबोधन करत इष्टानिष्ट गोष्टींविरोधात वा समर्थनार्थ आवाज उठवावा अशी साधारण या तीन घटकांकडून समाजाची अपेक्षा असते. या भूमिका पार पाडण्यात हे घटकवर्ग कमी पडले तर त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून जाब विचारला जातो. याच पार्श्वभूमीवर यंदाच्या ९४व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात ‘वृत्तमाध्यमांचे मनोरंजनीकरण’ या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या परिसंवादात विश्वंभर चौधरी, जयदेव डोळे, हरी नरके, अपर्णा वेलणकर यांनी वक्ते म्हणून सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसन्न जोशी यांनी केले.

या परिसंवादाच्या शीर्षकातच घोळ होता. कदाचित त्याऐवजी ‘वृत्तमाध्यमांचा उथळपणा’ वा ‘सवंगपणा’ हे शब्द जास्त चपखल बसले असते. दुसरी बाब म्हणजे या विषयावर चर्चा करण्यासाठी आमंत्रित सगळेच वक्ते मुद्रित माध्यमाचे प्रतिनिधी होते. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक माध्यमांची बाजू मांडायला कोणती संधीच उपलब्ध राहिली नाही. त्यामुळे शीर्षक जरी ‘वृत्तमाध्यमांचे मनोरंजनीकरण’ असे असले तरी मुद्रित माध्यमांना जाब विचारायला कोणीच नसल्याने चर्चा एकांगी आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या विरोधात अपेक्षित असावी अशी एकमार्गी झाली. नाही म्हणायला प्रसन्न जोशी यांनी आयोजकांची आणि सहभागी वक्त्यांची परवानगी घेऊन इ-माध्यमांची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला, पण तो अपुरा ठरला.

समाजाच्या दृष्टीने एका अत्यंत गंभीर मुद्यावर या निमित्ताने चर्चा झाली हेही नसे थोडके. यातील वक्त्यांनी उपस्थित केलेले विरोधी मुद्दे हे दोन्ही माध्यमांतील वृत्तमाध्यमांना लागू होत असले तरी साधकबाधक चर्चा घडून येण्याऐवजी एक चुकीचा संदेश समाजासमोर गेला, की पत्रकारितेचा खरा धर्म हा मुद्रित माध्यमांकडून पाळला जातो आणि इ-माध्यमे मात्र बेजबाबदार वागत आहेत. खरा प्रश्न आहे, लोकशाहीचा चौथा स्तंभ- मग तो मुद्रित माध्यम असू दे वा इ-माध्यम, तो जबाबदारीने वागत आहे का?

सर्वसामान्य माणूस हा समाजात, देशात आणि जगात, घडणाऱ्या घडामोडी जाणून घेण्यासाठी वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्या यांवरच अवलंबून असतो. या दोन्ही ठिकाणी वेळोवेळी प्रकट होणाऱ्या मतांचा, बातम्यांच्या विश्लेषणाचा समाजाच्या वैचारिक धारेवर कळत-नकळत परिणाम होत असतो. समाजाचा खूप मोठा जाणता वर्ग अजूनही सामाजिक संपर्कस्थानांपासून (social networking sites) दूर आहे. या पार्श्वभूमीवर समाजाच्या वैचारिक, संयमित प्रगल्भतेला घडवण्याचे वा बिघडवण्याचे काम दोन्ही मध्यमांकडून कधी अजाणतेपणी, कधी पद्धतशीरपणे जाणीवपूर्वक केले जाते. आता प्रश्न असा आहे, की या दोन्ही माध्यमांचे आजचे स्वरूप काय आहे? हा परिसंवाद मराठी साहित्य संमेलनात घडून आला असला तरी तो इतर भाषिक माध्यमांनाही लागू करून त्याची व्यापाकता वाढवत नेणे जास्त योग्य ठरेल. अगदी बाळशास्त्री जांभेकरांची पत्रकारिता आजच्या काळात अपेक्षित नसली तरी

पत्रकारितेचा किमान धर्म दोन्ही माध्यमांकडून पाळला जातो का?

काही वृत्तपत्रांचा आणि वृत्तवाहिन्यांचा अपवाद वगळता, सवंग बातम्या, त्यांची बटबटीत शीर्षके, वाचकांना रिझवेल असा चटपटीत मसालेदार मजकूर, सेलिब्रिटींशी संबंधित बिनमहत्त्वाच्या आणि बिनमुद्यांच्या बातम्यांना दिले जाणारे अवास्तव महत्त्व या बाबी अनेक वृत्तपत्रांचे आणि वृत्तवाहिन्यांचे व्यवच्छेदक लक्षण झाले आहे. दूरदर्शनच्या काळातील निर्विकार चेहऱ्याने दिल्या जाणाऱ्या बातम्यांची शुचिर्भूतता नक्कीच अपेक्षित नाही, (कदाचित बातमी देताना आपल्या भावना त्यात दिसू नयेत असा त्यावेळचा संकेत असावा.) पण ओरडत, किंचाळत, न्यायाधीशाच्या भूमिकेतून बातम्यांची केलेली मांडणी निश्चितच स्वीकारार्ह नाही. भाषेचा दर्जा कमालीचा घसरला आहे. शुद्धलेखनाच्या बाबतीत आनंद आहे. 'आम्हीच पहिली बातमी दिली' अशा अट्टहासापायी घटनेच्या सत्यापर्यंत न पोहोचता सनसनाटी निर्माण होईल असा अर्थ-अन्वयार्थ लावून बातमी सादर करणे याची खरेच गरज आहे का, याचा विचार करणे गरजेचे आहे. सुशांत राजपूतने आत्महत्या केली अशी बातमी सत्य बाहेर यायच्या आधीच माध्यमांनी दिली, पण तीच बातमी बीबीसीने 'सुशांत राजपूत फॉऊंड डेड ॲट हिज होम' अशी दिली. ही बातमी देण्याची पद्धत होती. आपल्या माध्यमांचा उथळपणा दखवण्यास ही घटना पुरेशी बोलकी आहे. कोणीतरी सेलिब्रिटी तिच्या ट्विटर हँडलवर काय मत व्यक्त करते त्यावर सतत चर्चा घडवून आणणे ही गोष्ट खऱ्या पत्रकारितेला मारकच आहे. टीआरपी जास्त मिळतो म्हणून अशा चटपटीत बातम्यांच्या पाट्या सतत टाकत राहणे आणि सामाजिक दृष्टीने महत्त्वाच्या बातम्या एका ओळीत वा काही सेकंदात मांडणे हे धोकादायक ठरू शकते. समाज प्रगल्भ नसला तरी त्याची किमान बौद्धिक पातळी उंचावण्याची जबाबदारी वृत्तमाध्यमांची आहेच. अग्रलेखाच्या माध्यमातून समाजाच्या वैचारिक धारणा घडवण्याचे काम करणारी वृत्तपत्रे निश्चितच आहेत, पण त्यांची संख्या कमी आहे.

''लोकांना चांगले वाचायला आवडत नाही असे म्हणणे म्हणजे मुद्रित माध्यमांचा पराभव आहे,'' असे मत या परिसंवादात गिरीश कुबेर यांनी व्यक्त करून त्यांनी असे प्रतिपादित केले की लोकांना चांगले वाचायला देईन अशी क्षमता माध्यमातील लोकांकडे नाही. त्यांनी माध्यमे आणि समाज यांच्यातील परस्परसंबंध विषद केला. माध्यमे समाजातील एका घटकाचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे माध्यमांवर टीका म्हणजे अप्रत्यक्षपणे समाजावरच टीका होय. म्हणूनच माध्यमांचे मनोरंजनीकरण झाले आहे याचा अर्थ समाजाचे मनोरंजनीकरण झाले आहे, असे मत गिरीश कुबेर यांनी मांडले.

त्यांच्या या मताचा खोलात विचार केला तर लक्षात येते, की समाजाचे असे अवैचारिकीकरण झाले याची अनेक कारणे आहेत. नव्वदीच्या दशकात जागतिकीकरणाचा झंजावात पैसा आणि आर्थिक स्थिरता तर घेऊन आलाच, पण या काळाने सुखाच्या आणि यशाच्या कल्पना आर्थिक सुबत्तेशी जोडून टाकल्या. आणि एकदा का पैसा हेच सर्वस्व मानले की वैचारिकता, सरासर विवेक, सामाजिक बांधिलकी वगैरे गोष्टी आपोआपच मागे पडतात. याच न्यायाने समाज अधिकाधिक संकुचित, स्वकेंद्रित होत गेला. हातात खुळखुळणाऱ्या पैशांमुळे मनोरंजनाच्या नवीन साधनांची गरज निर्माण झाली. ती गरज पूर्ण करायला बाजारपेठा तयार होत्याच. याचेच पडसाद मग मध्यमांमध्ये उमटले. बातम्यांना मीठ-मसाला लावून बटबटीत स्वरूपात सादर करण्यामागची अपरिहार्यता काय आहे, (विशेषत: हिंदी वाहिन्यांच्या बाबतीत हा प्रश्न प्रामुख्याने उपस्थित होतो.) हे एखाद्या प्रसारमाध्यमाच्या प्रतिनिधीकडून सविस्तर येणे गरजेचे होते. तशी मांडणी परिसंवादात दिसली नाही.

या विषयावर मत मांडताना विश्वंभर चौधरी म्हणाले, की मनोरंजन हे माध्यमांमध्ये आधीपासून होतेच. वर्षानुवर्षे छापले जाणारे राशीभविष्य हा मनोरंजनाचाच एक भाग आहे. परंतु आज त्या मनोरंजनाचे स्वरूप भीषण झालेले आहे. पुढे ते असेही म्हणाले, की 'शेवटी वृत्तवाहिन्या किंवा वृत्तपत्रे हा भांडवली व्यवसाय आहे. त्याला लागणारा पैसा हा खाजगी उद्योगातून वा सरकारशी जोडलेल्या उद्योगातून येणार असेल तर पत्रकारितेची मूल्ये ही त्याप्रमाणे ठरली जातात. निष्ठापूर्ण पत्रकारितेसाठी लागणारा पैसा हा जोपर्यंत समाजातून उभा राहत नाही तोपर्यंत पत्रकारांच्या निष्ठा बळी जाणारच.' माध्यमांमुळे समाजधारणा बदलत नाही या आपल्या मताची पुष्टी करताना ते म्हणाले, 'असं असतं तर ज्ञानेश्वरी वाचून समाजात सगळे संतच निर्माण व्हायला होते.' जागितिकीकरणाच्या या लाटेत 'मागणी तसा पुरवठा' हे तत्त्व मान्य केले तरी त्यातल्या त्यात किमान वैचारिकता तरी वृत्तमाध्यमांनी तयार करावी, असे आवाहन त्यांनी केले. सुशांत राजपूत वगैरे प्रकरणात माध्यमांनी जो उत्साह दाखवला, तेवढा उत्साह डॉ. होमी भाभा यांच्या घराचा लिलाव होताना दाखवला असता तर माध्यमे प्रगल्भ आहेत असे म्हणता आले असते. हीच गोष्ट राष्ट्रीय अस्मिता असणाऱ्या राष्ट्रपुरुषांच्या बाबतीत झाली असती तर समाज, माध्यमे दोन्ही तुटून पडली असती. अशी उदाहरणे देऊन पत्रकारिता कशी दिशाहीन झालीये याची मांडणी त्यांनी केली.

अपर्णा वेलणकर यांनी सामाजिक मानसिकतेचा विचार मांडत एक सत्य मांडले की सतत जॉब बदलणारी नवीन पिढी 'जुना जॉब एक्सायटिंग नव्हता' असे स्पष्टीकरण सहज देते. यावरून कळते की सतत 'एक्सायटिंग स्टेट'मध्ये असणे ही सामाजिक गरज बनली आहे. या मानसिकतेला मनोरंजन अधिक भावते. विरोधी मतांवर चर्चा करण्याऐवजी 'विषय संपला' ही मानसिकता बनलेल्या समाजाला बातम्यापण मग मनोरंजनात्मक पद्धतीनेच द्याव्या लागतात. गंभीर काही सांगण्याची क्षमता गमावून बसणे, अभ्यासपूर्ण विवेचनासाठी कष्ट न घेणे, चुरचुरीत मजकुराच्या पाट्या टाकणे, तशाच चर्चा घडवून आणणे हे तुलनेने सोपे आहे, असे मत मांडून त्या पुढे म्हणाल्या, की 'असेच लोक वृत्तवाहिन्यांचे मनोरंजनीकरण करत आहेत.' त्यांनी यापुढे जाऊन असा आशावाद मांडला, की मीडिया जितका अधिकाधिक विखारी आणि आक्रस्ताळा बनेल तेवढीच

गंभीरपणे आणि विषयाची नेमकी मांडणी करणाऱ्या पत्रकारांची स्पेस वाढत जाईल.

जयदेव डोळे यांनी भाषणाची सुरुवातच माध्यमांचे 'मनोरंजनीकरण' असे म्हणण्याऐवजी 'नमोरंजनीकरण' अशी करून राजकारणाने प्रसारमाध्यमांचा घेतलेला ताबा या अर्थाने विषयाची मांडणी केली. ते म्हणाले, 'जी राजकीय सत्ता विचारांना उत्तेजन देत नाही ती मनोरंजन करण्याला प्राधान्य देते.' हिटलर, मुसोलिनी यांनी हेच केले, असे मत मांडून त्याच्या बरोबर उलट अमेरिकेत घडलेले उदाहरण त्यांनी दिले. 'अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प अध्यक्ष झाल्यानंतर त्यांच्याविषयी छापून येणाऱ्या बातम्यांमुळे वृत्तपत्रांचा खप प्रचंड वाढला. राजकीय व्यक्ती मनोरंजनाचे साधन बनू शकतात हे अमेरिकेने सिद्ध केले. परंतु भारतात विचारशक्तीलाच उपद्रवशक्ती समजली जाते. अशी उपद्रवशक्ती निर्माण करण्याची ताकद माध्यमांकडे हवी,' असे मत त्यांनी नमूद केले. हाच मुद्दा अधिक विस्तृत करताना गिरीश कुबेर यांनी सांगितले, की अध्यक्ष ट्रम्प् यांनी 'अशा टिपणीमुळे अमेरिकेची बदनामी होते' अशी टीका केली होती; पण 'न्यू यॉर्क टाइम्स'च्या संपादकांचे उत्तर होते, 'अमेरिकेची प्रतिमा जोपासणे हे तुमचे काम आहे. आमचे काम बातमी देणे आहे.' अशी हिंमत भारतीय माध्यमांमध्ये नाही.

हरी नरके यांनी असे मत मांडले की 'स्त्रियांची, बहुजन समाजाची, दलितवर्गाची साक्षरता ब्रिटिश काळत जवळजवळ शून्य होती. आता ही साक्षरता वाढली आहे. या नव्याने निर्माण झालेल्या नवसाक्षरवर्गाची अभिरुची कोण घडवणार? याशिवाय समाजातील एक वर्ग असा आहे की सामाजिक संपर्कस्थानांचे पुरेसे गांभीर्य त्याला नाही. आलेले संदेश विचार न करता पुढे पाठवण्यात धन्यता मानणे अशा मानसिकतेच्या लोकांमुळे निर्बुद्धता तयार झाली आहे. सामाजिक संपर्कस्थानांवर संपादक नसल्याने कशाही बातम्या, कुठेही पाठवल्या जातात. तेथे वाटेल ते लिहिण्याचे स्वातंत्र मिळाल्याने त्याचा गैरवापर होतोय. अशा मानसिकतेच्या लोकांकडून बातम्या फॉरवर्ड व्हाव्यात म्हणून वृत्तमाध्यमांवर बातम्यांचे मनोरंजन होत असेल तर ते धोकादायक आहे.'

या चर्चेच्या ओघात काही सकारात्मक मुद्दे मात्र दुर्लक्षित झाले. इलेक्ट्रॉनिक वृत्तमाध्यमांवर सरसकट बटबटीपणाचा आरोप केला जातो, पण इ-माध्यमे यापलीकडे जाऊन चांगली कामेही करत आहेत, त्याचा सांगोपांग विचार मात्र परिसंवादात मांडला गेला नाही. समाजातील अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर आवाज उठवणे, त्यावर आधारित चर्चासत्र आयोजित करणे, तेही हिन्दी वाहिन्यांवर होणारा आक्रस्ताळेपणा टाळून, विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्तींच्या मुलाखती घेऊन, त्या त्या क्षेत्रातील ज्ञान, सामान्य माणसापर्यंत पोहोचवणे, खाजगी किंवा सरकारी नोकरीच्या जाहिराती तरुणांपर्यंत पोहोचवणे, आरोग्य क्षेत्रावर विशेष कार्यक्रम सादर करणे, एखाद्या घटनेवर आधारित माहितीपट बनवणे वगैरे गोष्टींची दखलच घेतली नाही. माहितीपट बनवणे आणि त्याच घटनेवर आधारित अग्रलेख लिहिणे यात फरक आहे. माहितीपट बनवताना संहितालेखन, त्याचे अभिवाचन, शूटिंग, एडिटिंग या अनेक बाबी सांभाळाव्या लागतात. यात विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, तंत्रकुशल माणसांचे मनुष्यबळ लागते. यासाठी पैसा लागतो. तो उभा करताना काही तडजोडी कराव्या लागतात का? अशा मुद्यांना कोणत्याच वक्त्याने हात घातला नाही. दर्शकांच्या हातात रिमोट असल्याने त्यांना पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे गंभीरपणे आणि विवेकी भावनेने केलेले वृत्तांकन प्रेक्षकसंख्या जर घटवत असेल तर माध्यमांनी काय करावे? मुळातच वृत्तवाहिन्या बघणारा मराठी माणूस हा कमी आहे. त्यात सध्या ओटीटी प्लॅटफॉर्ममुळे समाज मनोरंजनाच्या गुंगीत आहे. याचे गणित कसे सोडवावे या मुद्यांचीही सांगोपांग चर्चा होणे आवश्यक होते.

समारोप करताना प्रसन्न जोशी यांनी माध्यमांमधील बातम्यांचे चटपटीत सादरीकरण करण्यामागची अपरिहार्यता मंडताना स्पष्टपणे सांगितले, की 'एक वाहिनी चालवायला महिन्याचा खर्च एक कोटीच्या घरात जातो. एवढा पैसा हा जाहिरातींच्या माध्यमातूनच उभा राहू शकतो. त्यामुळे ज्या कार्यक्रमांना टीआरपी जास्त मिळतो त्याच कार्यक्रमांना जाहिराती मिळतात. मुळात समाजात विचारवंत वाचक आणि प्रेक्षकांची संख्या ही नेहमीच मूठभर असते आणि या मूठभर अभिरुचीच्या लोकसंख्येच्या जोरावर वाहिन्या चालवणे अशक्य आहे.'

या सगळ्या चर्चेचा साधकबाधक विचार केला तर असे म्हणता येईल की आतल्या 'गिफ्ट'पेक्षा बाहेरच्या सुंदर चकचकीत खोक्याला महत्त्व देणाऱ्या या काळात माध्यमांना प्रगल्भतेची आस आहे का? माध्यमे नेमकी कोणाच्या हातात आहेत? तेथील विचारकेंद्र कोण नियंत्रित करतो? असे अनेक प्रश्न या चर्चासत्रात मांडले गेले. शेवटी विश्वंभर चौधरी म्हणाले तसे, ''व्यावसायिकता शिकावी लागते. वर्तमानपत्रं वा वृत्तवाहिन्या हे व्रत आहे की दलाली ही भूमिका घ्यावीच लागेल.''

**– डॉ. लतिका भानुशाली**
bhanushali.latika@gmail.com

॥ग्रंथाली॥




**सरकते आहे वाळू**

**लखनसिंह कटरे**

**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**



राजीव श्रीखंडे

# रॉबिन्सन क्रुसो - डॅनिएल डेफो
# Robinson Crusoe by Daniel Defoe

**डॅनिएल** डेफो हा अठराव्या शतकातील एक प्रसिद्ध लेखक. तो एक व्यापारी, वृत्तपत्रकार गुप्तहेर म्हणूनही प्रसिद्ध आहे. त्याचे मूळ आडनाव फो. त्याचा जन्म लंडनमध्ये १६६० मध्ये झाला. त्याने पुढे आपल्या आडनावासमोर डे जोडले कारण त्याला उमरावी आडनावांची आवड होती. त्याचे वडील एक सधन गृहस्थ होते. डॅनिएलने त्याच्या लहानपणात इतिहासातल्या अनेक प्रमुख घटना बघितल्या. १६६५ मध्ये प्लेगमुळे त्यावेळी सत्तर हजार लोक दगावलेले त्याने बघितले आणि पुढच्याच वर्षी आगी लावून लंडनचा बराचसा भाग भस्मसात झालेला त्याने बघितला. त्याचे घर मात्र आगीतून वाचले. तो दहा वर्षांचा असतानाच त्याच्या आईचा मृत्यू झाला. डॅनिएलचे शिक्षण एका बोर्डिंग शाळेत झाले. ही शाळा सरे येथे होती. पुढे त्याचे शिक्षण लंडनपासून थोड्या अंतरावर Charles Morton's Dissenting Academy येथे झाले. त्याकाळी इंग्लिश सरकार जे कोणी Church of England प्रमाणे प्रार्थना करत नसत, त्यांच्यावर खटले भरत असे.

डॅनिएलने पुढे व्यापारात प्रवेश केला. तो कपडे, लोकरीच्या वस्तू आणि वाइन यांचा व्यापार करायचा. यात त्याने चांगले यश मिळवले. मात्र त्याचा कर्जबाजारीपणा कधीच संपला नाही. पुढे १ जानेवारी १६८४ रोजी त्याचा मेरी टूफे या लंडनच्या एका मोठ्या व्यापाऱ्याच्या मुलीशी विवाह झाला. त्यावेळी त्याला ३७०० पौंड इतका प्रचंड हुंडा मिळाला.

१६८५ मध्ये डॅनिएलने Monmouth बंडखोरीत भाग घेतला, पण त्याच्या नशिबाने त्याला माफी मिळाली. १६८९ मध्ये राणी मेरी आणि तिचा नवरा विल्यम तिसरा हे इंग्लंडच्या राजगादीवर विराजमान झाले. डेफो विल्यमच्या निकटवर्तीयांपैकी एक होता. त्याच्यासाठी त्याने हेरगिरीचेही काम केले. पुढे १६९२ मध्ये त्याला कर्जबाजारीपणामुळे अटक झाली. त्याच्या सुटकेनंतर तो युरोप आणि स्कॉटलंडमध्ये बराच फिरला. १६९५ मध्ये तो इंग्लंडला परतला. त्याने Commissioner of Glass duty म्हणून काम पत्करले. बाटल्यांवर कर वसूल करण्याचे त्याच्या विभागाचे काम होते. पुढे त्याने इसेक्स येथील टिलबरीमध्ये (Tilbury) फरश्या आणि विटा बनवण्याचा कारखाना स्थापन केला आणि तो चालवला.

त्याने त्याच्या आयुष्यात भरपूर लिहिले. विडंबनपर कविता, राजकीय आणि धार्मिक पत्रके, लेख, कादंबऱ्या अशा त्याच्या साहित्यकृतींची एकूण संख्या ५४५ एवढी आहे. डेफोचे नावाजलेले पहिले प्रकाशित पत्रक म्हणजे 'An Essay upon Projects'. हे प्रकाशित झाले १६९७ मध्ये. त्याची सर्वात प्रसिद्ध कविता 'The True Born Englishman' ही १७०१ मध्ये प्रसिद्ध झाली. पुढे विल्यमचा १७०२ मध्ये मृत्यू झाला आणि राणी ॲनने कारभार सांभाळला. तिने Non-Conformists वर म्हणजेच प्रस्थापित धार्मिक मतांशी असहमती असणाऱ्यांच्या विरुद्ध मोहीमच उघडली आणि डेफोला त्याच्या लिखाणामुळे अटक झाली. डेफोचे चर्चवरचे टीकात्मक लिखाण याला कारण होते. त्याला दंडाची आणि कारावासाची शिक्षाही झाली. काही उच्चपदस्थ मित्रांमुळे डेफोची लवकरच सुटका झाली. १७०३ मध्ये एक फार मोठे वादळ लंडनला येऊन थडकले आणि त्याने फार मोठे नुकसान झाले. हजारो लोक मृत्युमुखी पडले. यावर डेफोने १७०४ मध्ये 'The Storm' नावाचा लेख प्रसिद्ध केला. आधुनिक वृत्तपत्रकारितेचे पहिले उदाहरण म्हणून तो आता जगन्मान्य झालेला आहे. त्याच वर्षी त्याने एक नियतकालिकही सुरू केले. हे नियतकालिक १७१३ पर्यंत चालले. याच काळात डेफोने हेरगिरीतही महत्त्वाची कामगिरी बजावली.

डेफोने १७१४ ते १७१९ मध्ये अतिशय महत्त्वपूर्ण लिखाण

केले. 'Appeal to Honour and Justice' (१७१५), 'The Family Instructor' (१७१८), 'Continuation of the Letters Turkish of a Spy' (१७१८) या पुस्तकांचा यात समावेश होतो.

डेफोने १७१९ ते १७२४ मध्ये अनेक कादंबऱ्या प्रकाशित केल्या ज्यामुळे तो जगभर प्रसिद्ध आहे. यात त्याची सर्वात उल्लेखनीय कादंबरी असलेल्या 'Robinson Crusoe' चा तसेच 'Captain Singleton', 'Memories of a Cavalier', 'Journal of the Plague Year', 'Colonel Jack', 'Moll Flanders', 'Roxana' या इतर प्रसिद्ध कादंबऱ्यांचाही समावेश होतो. आयुष्याच्या शेवटच्या वर्षात त्याने 'Complete English Tradesman', 'The New Family Instructor', 'The Great Law of Subordination Considered', 'The Political History of The Devil' आणि 'The Tour through the whole Island of Great Britain' असे विविध विषयांवरचे लिखाण प्रसिद्ध केले.

डॅनिएल डेफोचा मृत्यू २४ एप्रिल १७३१ रोजी वयाच्या सत्तराव्या वर्षी झाला. त्याला आठ अपत्ये होती. १८७० मध्ये त्याच्या सन्मानार्थ लंडनमधील Islinaton भागात त्याचे स्मारक उभारले गेले.




डॅनिएल डेफो

डॅनिएल डेफोने कादंबरी या वाङ्मयप्रकाराला लोकप्रिय करण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण काम केले. त्याने आयुष्यभर धार्मिक वर्चस्वाला विरोध केला आणि त्यामुळे अनेकदा तुरुंगवासही भोगला. त्याने राजकीय, गुन्हा, धर्म, लग्न, मानसशास्त्र आणि अतिवास्तवता अशा विविध विषयांवर विपुल लेखन करून जागतिक वाङ्मयात स्वतःचे एक अढळ स्थान निर्माण केलेले आहे. व्यापार आणि अर्थकारण यावरच्या पत्रकारितेचा तो उद्गाताच आहे.

डॅनिअल डेफोची सर्वात प्रसिद्ध आणि लोकप्रिय कादंबरी म्हणजे रॉबिन्सन क्रूसो. ही कादंबरी प्रसिद्ध झाली २५ एप्रिल १७१९ रोजी. कादंबरीच्या पहिल्या आवृत्तीत रॉबिन्सन क्रूसो हाच लेखक म्हणून दाखविलेले आहे आणि त्यामुळे त्यावेळी सगळ्यांनाच ही खरी घडलेली कहाणी आहे असे वाटले.

ही कादंबरी रॉबिन्सन क्रूसोचे आत्मचरित्र आहे. हा क्रूसो त्याच्या तरुणपणी, त्याच्या आईवडिलांच्या इच्छेविरुद्ध जहाजावर नोकरी पत्करतो. त्याच्या आईवडिलांची इच्छा असते की त्याने कायद्याचे शिक्षण घ्यावे, पण ते त्याला मान्य नसते. हा प्रवास त्याला फारच त्रासदायक ठरतो कारण काही दिवसांतच समुद्रात त्याचे जहाज बुडते. क्रूसो वाचतो, पण यामुळेदेखील त्याची सागरप्रवासाची इच्छा कमी होत नाही. तो परत एका जहाजावर दाखल होतो. त्याची ही सफरदेखील अपयशी ठरते. त्याच्या जहाजावर चाचे हल्ला करतात आणि ते क्रूसोला बंदी बनवतात. दोन वर्षांनी तो चाच्यांच्या बंदिवासातून पळण्यात यशस्वी होतो आणि त्याला एक पोर्तुगीज जहाज वाचवते. हे जहाज ब्राझीलच्या वाटेवर असते. क्रूसो ब्राझीलला पोचतो आणि त्या जहाजाच्या कप्तानाच्या मदतीने तेथे एक शेत खरेदी करतो.

पुढे बऱ्याच वर्षांनी क्रूसो आफ्रिकेतून गुलाम पळवून आणण्याच्या एका मोहिमेवर निघतो. यावेळी वादळात सापडून त्याचे जहाज बुडते आणि व्हेनेझुएलाच्या किनाऱ्यापासून साधारणतः चाळीस मैल अंतरावर असलेल्या एका बेटावर तो आसरा घेतो.




त्याच्याबरोबर त्या जहाजाच्या कप्तानाच्या दोन मांजरी आणि एक कुत्रा एवढेच असतात. बाकी कोणी वाचत नाही. जहाज संपूर्ण बुडण्यापूर्वी तो त्या जहाजातून त्याच्यातल्या अनेक उपयुक्त वस्तू बरोबर आणण्यात यशस्वी होतो. मग त्या बेटावरच्या एका गुहेत तो आपले जणू घरच तयार करतो. त्याच्याभोवती कुंपण तयार करून तो स्वतःच्या सुरक्षिततेचीही व्यवस्था करतो. लाकडी क्रॉस तयार करून तो एक कॅलेंडरदेखील बनवतो. जहाजावरून आणलेल्या अनेक आयुधांच्या साहाय्याने क्रूसो त्याचे बेटावरचे एकाकी जीवन सुरू करतो. तो शिकार करतो, बार्ली आणि भात उगवतो, द्राक्षांपासून बेदाणे (Resins) तयार करतो, मातीची भांडी तयार करण्याचे शिकतो आणि बोकडही पाळतो. एक पोपटही तो पाळतो. रोज तो बायबल वाचतो आणि तसा धार्मिकही बनतो. तो देवाला धन्यवाद देतो कारण त्याचे प्राण वाचलेले असतात. त्या बेटावर तो एकाकीच असतो त्याची त्याला खंतही असते.

अशी बरीच वर्षे जातात. पुढे क्रूसोला असेही कळते की या बेटावर मधूनमधून नरभक्षकांची टोळी येत असते, त्यांनी पकडलेल्या माणसांना मारून खाण्यासाठी. आधी तो त्यांच्याशी युद्ध करण्याचे ठरवतो, पण नंतर त्याला असे वाटते की तो त्याचा अधिकार नाही. एके दिवशी नरभक्षकांच्या तावडीतून एक कैदी पळतो तेव्हा क्रूसो त्याला वाचवतो. तो त्याचे नाव फ्रायडे (Friday) ठेवतो कारण याच दिवशी क्रूसोने त्याला वाचवलेले असते. क्रूसो त्याला इंग्रजी शिकवतो आणि ख्रिश्चन बनवतो.

पुढे एकदा पुन्हा त्या नरभक्षकांची टोळी बेटावर येते. त्यांच्याबरोबर दोन कैदी असतात. त्यांना वाचवण्यासाठी या खेपेला क्रूसो आणि फ्रायडे त्यांच्यावर हल्ला करतात आणि त्यातल्या बहुतेक नरभक्षकांना ठार करतात. या दोन्ही कैद्यांची ते सुटका करतात. यापैकी एक असतो तो फ्रायडेचा बाप आणि दुसरा स्पॅनिश खलाशी

असतो. तो स्पॅनिश खलाशी क्रुसोला जवळच असलेल्या एका स्पॅनिश जहाजाची माहिती देतो. त्याप्रमाणे क्रुसो एक योजना आखतो ज्यायोगे तो स्पॅनिश माणूस आणि फ्रायडेचे वडील त्या जहाजावर जाऊन त्या जहाजाला क्रुसो आणि फ्रायडे यांच्या सुटकेसाठी बेटावर आणतील. त्याप्रमाणे ते दोघे रवाना होतात.

ते परतण्यापूर्वीच एक इंग्लिश जहाज या बेटाजवळ येते. त्याच्यावर बंडखोरी झालेली असते आणि त्या बेटावर त्या जहाजाच्या कप्तानाला एकटे सोडण्याचा त्या बंडखोरांचा बेत असतो. क्रुसो त्या कप्तानाला मदत करायची ठरवतो. त्यायोगे बंडखोरांचा पराभव होऊन निष्ठावंत खलाशी परत त्या जहाजाचा ताबा घेतात. बंडखोर मात्र त्या बेटावर राहायचे ठरवतात, कारण इंग्लंडला गेले तर बंडखोरीबद्दल त्यांची फाशी निश्चित असते. क्रुसो त्यांना त्याने जे जग त्या बेटावर तयार केलेले असते ते दाखवतो आणि त्या जहाजावरून इंग्लंडला जायला निघतो.

सहा महिन्यांनी तो इंग्लंडला पोचतो. तो अठ्ठावीस वर्षे त्या बेटावर राहिलेला असतो. त्याच्या घरच्यांनी तो हयात नाही असेच मनाशी ठरवलेले असते. त्यामुळे त्याच्या वडिलांच्या इस्टेटीचा त्याला काहीच वाटा मिळालेला नसतो. क्रुसो मग लिस्बन येथे जातो आणि ब्राझीलमधील त्याच्या शेताच्या उत्पन्नाचा हिस्सा घेतो. त्यामुळे तो बराच श्रीमंत होतो. ही संपत्ती तो इंग्लंडला पाठवतो आणि तो आणि फ्रायडे इंग्लंडला परततात. अशी ही कादंबरी संपते.

ही साहसकथा डेफोने क्रुसोच्या आत्मकथनाद्वारे कथन केलेली आहे. हे आत्मकथनाचे तंत्र डेफोने अतिशय प्रभावीपणे या कादंबरीत वापरलेले आहे. तसे हे कथानक एका सरळ रेषेत चालणारे आहे. घडणारे सगळे प्रसंग आपल्याला क्रुसोच्या नजरेतून दिसतात, त्याच्याकडूनच कळतात. यामुळे या कादंबरीची बांधणी तशी साधी, सरळ अशीच आहे. क्रुसोच्या मनातले विचारही आपल्याला स्पष्टपणे कळतात. त्याच्या मनाची आंदोलनेही कळतात. त्यामुळे या निवेदनाला एक वजन प्राप्त झालेले आहे. डेफोची कथनशैलीही कथानकाला साजेशी म्हणजे सरळ, सोपी, सुटसुटीत आहे. घडणाऱ्या घटनांचे आणि क्रुसोच्या मनातल्या विचारांचे सरळ वर्णन करणारी ही कथनशैली तशी प्रामाणिकही आहे. तिला उपदेशाच्या जडपणाची छटा आहे, पण कथानक वेगवान असल्यामुळे या कादंबरीच्या रंजकतेला कुठली बाधा पोचत नाही.

ही कादंबरी अठराव्या शतकाच्या सुरुवातीला लिहिली असल्यामुळे तिची भाषा तशी थोडीशी प्रथम जड वाटू शकेल, पण जशी या भाषेची आपल्याला सवय होते, ती कथानकाला किती पोषक आहे याची आपल्याला जाणीव होते. कादंबरीत संवाद तसे कमीच आहेत. ते क्रुसो आणि फ्रायडे यांच्यामधील संवाद बायबलच्या शिकवणीवरच आधारलेले असल्यामुळे त्याच्यावर धार्मिकतेची दाट छाया आहे.

खरे तर ही सगळी कादंबरीच एका अर्थी एक धार्मिक कादंबरी आहे असे आपण म्हणू शकतो. या कादंबरीद्वारे डेफो Christanityच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकतो. क्रुसोची धर्माबद्दलची मते या कादंबरीत पूर्णपणे बदललेली आपल्याला दिसतात. आधी त्याचा देवावर फार विश्वास नसतो, पण बेटावर एकटे पडल्यावर तो देवाशी नियमित संवाद साधू लागतो. फ्रायडे त्याच्याजवळ राहायला लागल्यानंतर तो त्याला बायबलचा संदेश नीट समजावून सांगतो. त्यात बराच वेळ खर्च करतो. बायबलमधल्या अनेक वचनांचा या कादंबरीत बऱ्याचदा उल्लेख येतो. एका अर्थी ही कादंबरी Spiritual autobiography म्हणजे परलोकविद्यावादी आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारात मोडते.

या कथानकात व्यक्तिरेखांची तशी फार गर्दी नाही. सगळी कथा रॉबिन्सन क्रुसोभोवतीच फिरते. फ्रायडे ही आणखी एक महत्त्वाची व्यक्तिरेखा. एकटा असलेला क्रुसो त्याच्या कुत्र्यांशी बोलतो, त्याच्या पोपटाशी बोलतो, आपल्या भावना त्यांच्याजवळ व्यक्त करतो. पोपटाला काही बोलायलादेखील शिकवतो. या कथानकात मेंढ्या आहेत, बोकड आहेत, मांजरी आहेत. एकट्या असलेल्या क्रुसोचे हे सगळेच जिवलग आहेत आणि म्हणूनच कथानकात त्यांनाही वेगळेच महत्त्व प्राप्त झालेले आहे. क्रुसोची व्यक्तिरेखा आपल्या मनावर कायमची छाप पाडते. त्याच्यामध्ये होत जाणारा बदल आपल्याला त्याच्या तोंडूनच कळतो. साहसी, निष्ठुर, हिकमती, नंतर धार्मिक झालेला, आपले नशीब धीरगंभीरपणे स्वीकारणारा पण नेहमी परत जायला आसुसलेला असा हा रॉबिन्सन क्रुसो वाङ्मयातल्या सर्वात जुन्या आणि सर्वात लोकप्रिय अशा नायकांपैकी एक आहे. नरभक्षकांच्या तावडीतून सुटलेल्या फ्रायडेचीही व्यक्तिरेखा अतिशय भावणारी आहे.

जणू एखादा माणूस आपले खरेखुरे अनुभव कथन करत आहे अशा डेफोच्या कथनशैलीमुळे या कादंबरीला एक वेगळीच उंची मिळालेली आहे. त्यावर खरेपणाची निःसंशय छाया आहे. म्हणूनच या कादंबरीला प्रचंड यश मिळाले. कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या संवर्धनात या तिचा फार मोठा सहभाग आहे. इतक्या वर्षांनंतरही या कादंबरीची लोकप्रियता कायम आहे. बायबलनंतर सर्वात जास्त भाषांतरित असलेली ही कादंबरी आहे. या कादंबरीवर आधारित अनेक पुस्तके लिहिली गेली, चित्रपट काढले गेले, नभोवाणी, चित्रवाणी यांसारख्या माध्यमांतूनही या कादंबरीवर असंख्य कार्यक्रम केले गेले. या कादंबरीची जवळजवळ सातशे वेगवेगळी रूपे आजतागायत प्रकाशित झालेली आहेत. कॉमिक्ससुद्धा. इतकेच नव्हे तर Robinsonade नावाचा एक नवा वाङ्मयप्रकार या कादंबरीमुळे उदयाला आला. जागतिक वाङ्मयीन इतिहासातील एक मैलाचा दगड ठरलेली ही कादंबरी एक क्लासिक म्हणून आज जगप्रसिद्ध आहे.

**– राजीव श्रीखंडे**
भ्रमणध्वनी : ९८२१०१७४६२
rshrikhande@yahoo.com

# एंटरटेनमेन्टबद्दलच्या कल्पनाच बदलल्या...



**भरत दाभोळकर**

मुलाखत - राजीव जोशी

**वृत्तपत्र, आकाशवाणी, नाटक, सिनेमा, दूरदर्शन, ओटीटी आणि एकूणच माध्यमांची आजची स्थिती काय आहे? उद्याची काय असेल?**

रेडिओ हे माध्यम असे आहे की त्याला काही फरक पडत नाही. कारण मुळात रेडिओ हे श्राव्य माध्यम असल्याने त्याकरिता ॲक्टिव्ह सहभाग लागत नाही. म्हणून आजही जगातील कुठल्याही देशात रेडिओ आपले अस्तित्व टिकवून आहे. आपल्याकडे बघा, पूर्वी रेडिओवर गाणी लागायची, बातम्या ऐकल्या जायच्या. तेव्हा घरातली मंडळी आपापली कामे करत असायची. पॅसिव्ह माध्यम असल्याचा हा फायदा असतो. मात्र टीव्ही बघायचा तर समोर बसावे लागते, लक्ष द्यावे लागते. तसे रेडिओचे नाही, म्हणून त्याचे अस्तित्व राहणार.

न्यूजपेपर आता डिजिटल झाले आहेत. पँडेमिकमध्ये घरात पेपर येणे बंद झाले होते, तेव्हा लिंक यायची त्यावरून वाचायची तात्पुरती सवय झाली होती. परंतु आपल्याला हातात वर्तमानपत्र घेऊन वाचायची वर्षानुवर्षांची सवय असते. त्याचा एक वेगळाच फील असतो. त्यामुळे आपल्याला थोडे अवघड जाते, पण हळूहळू सवय बदलत जाते. हीच गोष्ट पुस्तकांची. अनेक वर्षे हातात पुस्तक घेऊन पाहायची, नव्या पुस्तकाचा वास अनुभवायची एक सवय असते, पण आजची पिढी किंडलसारख्या साधनांद्वारे पुस्तकवाचन करत असते. आजही ९०% टक्के वाचकांना हातात पुस्तक घेऊन वाचणे आवडते. तरुण वाचक मात्र पुस्तकाऐवजी मोबाइल, टॅब अशी आधुनिक उपकरणे सोयीस्कर मानतात.

पँडेमिकच्या काळात टीव्ही नाही, त्यात ओटीटीने आपला वेळ घालवण्यास मदत केली. ओटीटीची भयंकर सवय लागलेली आहे. नेमके, फापटपसारा नसलेले पाहण्याची आवड निर्माण झाली. एंटरटेनमेंटबद्दलच्या कल्पनाच बदलल्या. आता तर काय ५०-६० ओटीटी असल्याने सगळ्या प्रकारची करमणूक मिळते आहे. ओटीटी पाहून प्रेक्षकांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. त्याचा एकूण परिणाम इतर करमणूक माध्यमांवर होणे अपेक्षित आहे.

सिनेमा हा छोट्या स्क्रीनवर बघता येत असला, तरी तो लार्जर दॅन लाइफ स्वरूपाचा असल्याने मोठ्या स्क्रीनवर पाहण्याचा आनंद वेगळाच असतो. बाहुबलीसारखे भव्य-दिव्य सिनेमे हे पैसे खर्च करून मोठ्या थिएटरातच बघायचे असतात. नाटक हेदेखील नाट्यगृहात एकत्र बघण्याचे माध्यम आहे. यापुढे नाटक असो किंवा सिनेमा, तुम्हाला प्रेक्षकांना घरातून बाहेर बोलावायचे असेल तर तुमची कलाकृती तितकी आकर्षक असली पाहिजे. पॉलिसी ऑफ एंटरटेनमेंटकडे नव्याने बघितले पाहिजे. जे घरी बसून पाहता येत नाही, असे वेगळे आकर्षक पद्धतीने सादर केलेले दाखवू असे सांगितले तर प्रेक्षक जरूर बाहेर पडतील. दीड-दोन वर्षांनी आपल्याला नाटक बघायला मिळणार म्हणून आपला रसिक प्रेक्षक अगदी उत्साहाने बाहेर पडेल. त्यांना तुम्ही पूर्वीसारखीच नाटके देण्यापेक्षा इनोव्हेटिव्ह द्या! पैसे खर्च करून घराबाहेर येणाऱ्या प्रेक्षकांना वेगळे देण्याचा प्रयत्न करावा लागेल. एक बाब लक्षात घेतली पाहिजे, की आता प्रेक्षकांना घरबसल्या हवी ती करमणूक मिळते आहे, बाहेर नाटक किंवा सिनेमा बघायचे म्हटले की महागडे

तिकीट, जाण्या-येण्याचा खर्च, शिवाय इंटरव्हलला पॉपकॉर्न -समोसे खायचे असतात, तेही महागच असतात. मागे एकदा विवेक वासवानी म्हणाला होता, सिनेमागृहवाल्यांना सिनेमापेक्षा कँटिनमध्ये महागडे खाद्यपदार्थ व कोल्ड्रिंक्स विकूनच कमाई होते. म्हणून प्रेक्षकांना अधिक आकर्षक व जे घरबसल्या मिळू शकत नाही ते दिले तर नक्कीच येतील, पुन्हा गर्दी करतील.

**कोविड , ओटीटी आणि फाइव्ह-जी यांच्यामुळे ग्राहकांचे माध्यमांशी असलेले नाते कसे व का बदलत चालले आहे?**

कोविड-पँडेमिक आपण दीड वर्ष सहन केले. त्या काळात आपल्याला जुन्या सवयी विसरून जगावे लागले. पण हे बदलणे तात्पुरते असते. लॉकडाऊन उठल्यावर लोक कसे बाहेर गर्दी करतात? ह्याला कारण तेव्हा काळजीपोटी आपण सहन केले. म्हणून काही आपले लाइफ, जीवनशैली कायमची बदलली असे नाही. लोक सहसा बदलत नाहीत. मुळात पब्लिक मेमरी शॉर्ट असते. लोक मागचे विसरून 'जैसे थे' पद्धतीने वागू लागतात. म्हणून फारसा फरक पडेल असे मला वाटत नाही.

माध्यमांबाबत बोलायचे तर टीव्ही हे माध्यम फॅमिलीचे आहे (फॅमिली ड्रिव्हन), सर्वांनी एकत्र बसून बघायचे आहे. याउलट ओटीटीला पर्सनल अपील आहे. एखाद्या घरात समजा पाच जण आहेत, जो तो आपल्या आवडीनुसार ओटीटी बघणार. कोणाला कॉमेडी-शो बघायची आवड असते, तर कोणाला नेटफ्लिक्स, त्यानुसार विविध प्रोग्राम पाहिले जातात. आज ८०-१०० ओटीटी प्लॅटफॉर्म आहेत. पुढे काय होणार? किती वाढतील? त्यासाठी कॅपिटल किती व कोण टाकतील? अनेक प्रश्न आहेत. व्यक्तिगत पातळीवर वर्षाला तीनशे रुपये घातले तर तुम्हाला एका ओटीटीवर तुमच्या आवडीची करमणूक पाहायला मिळेल. मात्र एकदाच ५०० रुपये खर्च केले तर एक हिंदी सिनेमा वा नाटक एकदाच पाहता येते, याउलट एकदा वार्षिक वर्गणी भरली की ५०० रुपयांत किमान तीन-चार ओटीटीवरील कार्यक्रम तुमच्या सोयीने वर्षभर पाहता येतात. असे एक लाख वर्गणीदार झाले तर त्या ओटीटीकडे **दहा लाख पैसे** एका वर्षासाठी जमा होतील. पुढे तीन कोटी वर्गणीदार झाले तर वर्षाला ३० कोटी रुपये मिळतील. पण त्या पैशांत किती प्रोग्रॅम करणार? सहा किंवा सात मराठी सिनेमे! पुढे काय? नंतर कसे करणार? टीव्हीप्रमाणे ओटीटीला सतत प्रोग्रॅम लागत असतात. पहिल्या वर्षी अमुक ओटीटीसाठी वर्गणी देणारा पुन्हा दुसऱ्या वर्षी वर्गणी भरेलच असे नाही. म्हणजे त्याला गुंतवून ठेवणारी, त्याला आवडेल अशी करमणूक देण्याची व्यवस्था सातत्याने करावी लागणार आहे. नेटफ्लिक्स, ॲमेझॉन, हॉट स्टार अशा आंतरराष्ट्रीय प्लॅटफॉर्मची गोष्ट वेगळी आहे. तेथे भांडवल आहे, जागतिक प्रेक्षक आहे आणि मुख्य म्हणजे विविध प्रकारचे मोठे प्रोग्रॅम आहेत. लोकल ओटीटी प्लॅटफॉर्मला कसे जमणार? सुरुवातीला प्रेक्षक येतील, पण त्यांना टिकवणे, त्यांच्या आवडीनुरूप प्रोग्रॅम देणे हे सोपे नाही. लोकांच्या अभिरुची आणि टेस्टबद्दल असलेल्या फ्लुईडीटीबाबत विचार करणे महत्त्वाचे. समजा नाटकावर आधारित प्रोग्रॅम केला, तर तो किती जणांना आवडेल? आता मोबाइलवरच असे प्रोग्रॅम पाहिले जात असल्याने, मध्यंतरी अशी विचारणा झाली होती की रिक्षावाला हा आमचा प्रेक्षक-गट आहे, त्यांच्या करमणुकीसाठी काही करता येईल का? त्यांना अपील होईल असा प्रोग्राम करावा लागेल. लिफ्टमन असतात, त्यांना रिकाम्या वेळी पाहण्यासाठी प्रोग्रॅम डिझाइन करावा लागेल. समाजातील वेगवेगळ्या प्रकारचे नोकरदार आहेत, घटक आहेत त्यांना आवडतील असे प्रोग्रॅम करणे जरुरीचे ठरणार. कारण व्यक्तिगत आवड-निवड असलेली करमणूक मिळणार असेल तरच अमुक प्लॅटफॉर्मला वर्गणीदार मिळतील. आणि जितके जास्त प्रेक्षक तितके अधिक प्रोग्रॅम करण्याची शक्यता अधिक (विविध प्रकारच्या आवडीनिवडीनुरूप प्रोग्रॅम करण्याची क्षमता वाढू शकेल) असे हे समीकरण आहे.

**जाहिरात हे तुमचे क्षेत्र. त्यामध्ये या सगळ्याचे कसे बदल होत आहेत आणि भविष्यात होत राहतील ?**

जाहिरातींबाबत काही फिक्स समीकरणे आहेत. मेन स्ट्रीमसाठी जाहिरात करताना वीस सेकंद ते तीस सेकंद इतकी वेळेची मर्यादा गृहीत धरलेली असते. तितक्या वेळात तुम्हाला एंटरटेन करत तुमचे प्रॉडक्ट विकायचे असते. प्रेक्षकांच्या मनात ती वस्तू भरली पाहिजे, म्हणून ती सातत्याने हॅमर केली जाते. टीव्ही-सिनेमाच्या दरम्यान दाखवल्या जाणाऱ्या जाहिरातीत हे तंत्र कुशलतेने वापरलेले असते. आपण ओटीटीवर किंवा व्हॉट्सॲपवर काय पाहतो, तर चक्क पाच मिनिटांची जाहिरात करणारी फिल्म. त्यात गोष्ट चांगली असते, कलाकार उत्तम असतात, एकदा पाहिली की तुम्हाला आवडते. आवडली म्हणून तुम्ही एकदा-दोनदा बघू शकता, त्यापेक्षा जास्त वेळा नाही.

याउलट जाहिरातींबाबतचे तंत्र वेगळे आहे. एखादे प्रॉडक्ट प्रेक्षकांच्या मनावर ठसवण्यासाठी ती अनेकदा-वारंवार दाखवली गेली पाहिजे. लोकांनी अक्षरशः शंभर वेळा तरी बघितली पाहिजे. सुंदर जाहिरात करणे वेगळे आणि परिणामकारक जाहिरात असणे वेगळे. आपण पाहतो हल्ली ज्या रंजक गोष्टी असलेल्या जाहिरात करणाऱ्या फिल्म असतात, त्या पाच-दहा मिनिटांच्या असतात. जाहिरातीतील तत्त्वानुसार ते योग्य नसते. कारण इतकी मोठी जाहिरात अपेक्षित नसते. जितकी छोटी, तितकी परिणामकारक व तितकी अधिक वेळा पाहिली जाते. ओटीटी किंवा अन्य माध्यमांतून अशा फिल्म आपल्याला दिसतात, आपण फॉरवर्ड करतो. आपल्याला एकदा-दोनदा पाहायला आवडते. परंतु त्यांना रिपीट व्हॅल्यू असते का? बरे या फिल्ममध्ये जे विकायचे आहे ते प्रॉडक्ट सर्वात शेवटी येते. जाहिरात म्हटली की तुमचे प्रॉडक्ट हे नित्य -अधिक वेळा दिसलेच पाहिजे. शेवटी येणारे उत्पादन, ते अमुक असेल तर त्याऐवजी तमुक दाखवले तरी मूळ फिल्मच्या गोष्टीत काही फरक पडणार आहे का? उदाहरणार्थ, छान गोष्ट सांगितल्यावर अखेरीला तुम्हाला श्रीखंड/मिठाई दाखवली जाते. समजा,



दहा लाख पैसे?

फिल्मच्या शेवटी लोकांना घड्याळ किंवा दागिना दाखवला तरी काय फरक पडणार? म्हणजेच तुमच्या फिल्ममध्ये प्रॉडक्टबद्दलची एक्स्क्लुझिव्हिटी नसते. गोष्ट-कलाकार व सादरीकरण या बाबी महत्त्वाच्या ठरतात. भावनिक असतात, उत्तम दर्जाचा अभिनय अशा बाबी लक्षात राहतात. मग उत्पादन कोणते असले तरी चालते. ह्यात जाहिरात संकल्पनेचे बेसिक तत्त्व पाळलेले नसते. दृश्य जाहिरातीत तुमचे प्रॉडक्ट हे केंद्रस्थानी असल्याने वारंवार दिसले पाहिजे. ब्रँडनेम लक्षात राहिले पाहिजे. तशी जाहिरातच परिणामकारक व प्रभावी मानली जाते.

कमी वेळाची जाहिरात तुम्ही अनेकदा दाखवून बंबार्डिंग करू शकता. आपण अनेकदा क्रिकेट-मॅच, टीव्हीवरील मालिका-सिनेमा व अन्य शोंमध्ये पाहतो की त्याच त्या जाहिरातींचा अक्षरशः मारा केला जातो. लोकांना इरिटेट करणे , कंटाळा येईपर्यंत पाहायला लावणे हे आवश्यक असते, तरच ब्रँडनेम पक्के लक्षात राहू शकते. कारण मुळात जाहिरातमोहिमेचे सूत्रच आहे की लक्ष केंद्रित करा आणि पगडा बसवा! (Concentrate Dominate!) पाच मिनिटांची एक जाहिरात दाखवण्यापेक्षा पाच मिनिटांच्या कालावधीत तीस तीस सेकंदांच्या अनेक जाहिराती दाखवणे इष्ट असते. (इष्ट परिणाम घडवणारे असते) मात्र मास-मीडिया, टीव्ही अ‍ॅड ही महागडी असते. सेकंदाचा खर्च जास्त प्रमाणात असतो. डिजिटलबाबत पाच मिनिटांपर्यंतची जाहिरातसुद्धा चालते. लोक कंटाळणार नाहीत. फार तर स्किप करतील. छोट्या अवधीची म्हणजे वीस सेकंदाची जाहिरात ही बघितली जाते. मग दिवसातून शंभरदा दिसली तरी! ऑडिओ-व्हिडीओमध्ये जिंगलना महत्त्व आहे. कारण आपल्या देशात संगीत-गाणी महत्त्वाचे आहे. चांगली व लोकप्रिय झालेली जिंगल लक्षात राहते, गुणगुणली जाते.

**टीव्ही आणि डिजिटल जाहिरातींबाबत...**

टीव्हीवर जाहिरात दाखवणे हे महाग असते. परंतु काही उत्पादने ही घरातील प्रेक्षकांना, कुटुंबांसाठी असतात. त्यांची जाहिरात तेथेच करणे योग्य असते. उदाहरणार्थ, चॉकलेट किंवा सॉफ्ट ड्रिंकची जाहिरात टीव्हीसाठी चांगली. आता आता जाहिरात करणारे ओटीटीसाठी बजेट ठेवत आहेत. अमेरिकेत पी अँड जीसारख्या बड्या कंपन्या पन्नास टक्के जाहिराती डिजिटलवर करत आहेत. कारण खर्चाबाबत किफायतशीर, प्रभावी आणि लोकांपर्यंत पोहोचू शकतात अशी काही सबळ कारणे आहेत. तुमचे उत्पादन काय आहे, कसे उपयोगी आहे हे प्रभावीपणे सांगितले जाते. जाहिरातींबाबत अमेरिकेत एक सर्व्हे केला गेला होता. त्यात कारची जाहिरात फक्त नवीन कार घेणाऱ्या संभाव्य खरेदी करणाऱ्यांसाठीच केली होती असे नाही, तर ज्यांच्याकडे मुळातच कार आहेत, त्यांनीही आपल्या कारची जाहिरात पाहावी हाही हेतू त्यामागे होता. म्हणजे तुमचा ग्राहकवर्ग कोण आहे, त्याला कशा रीतीने सांगायचे आहे, प्रभावित करायचे आहे हे जाहिरातमोहिमेद्वारे ठरवले जाते.

**प्रिंट मीडियाबद्दल काय सांगता येईल?**

कितीही टीव्ही-डिजिटल मीडिया वाढला तरी प्रिंट माध्यम हे राहणारच. पेपर-मासिकेही राहतील. कसे ते सांगतो. कुठलीही व्हिज्युअल जाहिरात ही अवघ्या सेकंदांची असते. त्यात तुमच्या प्रॉडक्टची माहिती देणे अपेक्षित नसते. ४०-५० सेकंदांत तशी देता येत नाही. त्याकडे लोकांचे - संभाव्य ग्राहकांचे लक्ष वेधून घेणे हा मूलतः हेतू असतो. परंतु तुमच्या वस्तूबाबत अधिक तपशील पुरवायचा असतो, तांत्रिक माहिती द्यायची असते तेव्हा प्रिंटमध्ये देणे सोयीचे असते. नव्या एसीबद्दल किती छान कूलिंग होते हे व्हिडीओ फिल्म जाहिरातीतून दाखवू शकतो, पण टेम्परेचर, इलेक्ट्रिसिटीचा वापर, विविध फीचर्स सांगायला शब्दच हवेत. म्हणजे अशी माहिती प्रिंट माध्यमाद्वारे सुलभपणे देता येते. उदाहरणार्थ - कार, फ्रिज, एअरकंडिशनर यांबद्दल वेगवेगळ्या फीचरची माहिती व वापर कसा करता येईल, नवीन तंत्र, वैशिष्ट्य काय किंवा तुलनात्मक माहिती देण्याकरता पेपर-मासिक ह्यात सविस्तरपणे लिहिता येते. वाचक त्याचा अभ्यास करून चोखंदळपणे पडताळून, खरेदीचा निर्णय घेऊ शकतात. महागडी वस्तू केवळ टीव्हीवर जाहिरात बघून न घेता त्याची संपूर्ण माहिती ज्ञात करून मग ठरवता येते. टेक्निकल बाबींचा उल्लेख त्यात नीटपणे केला जातो. नावीन्य, उपयुक्तता जाणून घेण्यासाठी हे माध्यम उपयोगी आहे. आता प्रश्न असा आहे, की आजचा तरुणवर्ग किती-कितपत वाचतो? आजची तरुण पिढी वाचते आहे का? ह्याबाबत एकदा ऑन-लूकरने कव्हर-स्टोरी केली होती. त्याची माहिती मला ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर ह्यांनी दिली होती. आम्ही चर्चा केली की हा प्रश्न फक्त मराठी तरुणांचा नाही, इतर भाषांतील तरुण पिढी वाचते आहे का? तर असे चित्र दिसते की वाचन तर नाहीच, परंतु ती पिढी टीव्ही न्यूजदेखील पाहत नाही. जे काही कळते ते फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप आणि ट्विटरच्या माध्यमातूनच. लोक वाचत नाहीत म्हणून जड किंवा वैचारिक पद्धतीचे लिखाण अमेरिकेत जसे 'Dumbing down' पद्धतीने सोपे करून विविध प्रकारे सांगतात, तसे होणार का? मोबाइल व इंटरनेटमुळे दृश्य-माध्यमाची अधिक ओढ वाढलेली आहे, तेथे मॅगझिन्स-पुस्तके वाचत बसायला वेळ कोणाकडे आहे? आपल्या लहानपणी कितीतरी दिवाळी अंक होते, आता किती अंक येतात, किती वाचले जातात? पुस्तकेही मोबाइलवर-किंडलद्वारे वाचली जातात. प्रवासात ते सर्व सोयीस्कर ठरते. पुढची पिढी पारंपरिक पद्धतीने छापील पुस्तक वाचेल का? मराठी भाषेतील वाचन करेल का? ह्याचे उत्तर आगामी काळच देईल.

नाटक माध्यम हे कसे आहे, की एकट्याने पाहण्याचे नाही. ते कुटुंबाने, मित्रांनी, ग्रुपने पाहण्याचे आहे. आपल्याकडे तर नाटक पाहायला छान छान कपडे घालून प्रेक्षक येतात. नुसते नाटक पाहून चालत नाही,तर नाटक बघून झाल्यावर एकत्र डिनर घेण्याचा प्रोग्रॅम असतो. म्हणजे हे एक प्रकारे सोशल गॅदरिंगच आहे. त्याकरिता घराबाहेर पडून आऊटिंग करणे गरजेचे असते.

ओटीटीबाबत सर्वांनी एकत्र बसून बघूया, असे काही होत

नाही. (कारण प्रत्येकाच्या आवडीनिवडी भिन्न.) गेल्या दीड वर्षाच्या काळात आपण घरातच होतो. बाहेर जाणे बंद झाले होते. आता लोक बाहेर पडतील, नाटक-सिनेमा अन्य करमणूक एकत्रितपणे पाहण्यासाठी. हॉटेलात जातील, तेथे काय खातील हा मुद्दा नाही, पण घर सोडून इतरांबरोबर मिक्स होत, त्याचा वेगळा आनंद मिळवण्याचा प्रयत्न असतो. तसे पाहिले तर कोरोनाकाळात इतर वस्तूंप्रमाणे खाण्याचे पदार्थ ऑनलाइन मागवण्याची सोय होती. सगळे घरपोच मिळत होते. हॉटेलातली बिर्याणी घरी खाल्ली तरी चव तीच असणार, पण बाहेर जाऊन कोणाकोणाबरोबर खाण्याची मजा वेगळीच, नाही का? हे सगळे आपण मिस केले होते. ते मिळवण्यासाठी आता लोक बाहेर पडतील. तीच गोष्ट एंटरटेनमेंटची म्हणता येईल. घरबसल्या करमणूक पाहायची की थिएटरमध्ये जाऊन मोठ्या स्क्रीनवर दहा देशांत शूटिंग केलेला सिनेमा बघायचा!


मराठीबाबत विशेष सांगायचे तर मध्यंतरी राज ठाकरे ह्यांच्याबरोबर एक झूम मीटिंग झाली होती, तेव्हा असे कळले की ऐंशी चांगले मराठी सिनेमे तयार आहेत, त्यांना बायरची (Buyer) -घेणाऱ्यांची प्रतीक्षा आहे. आपल्या प्रेक्षकांनी सुंदर मराठी फिल्म बघितल्या पाहिजेत.आपल्याला हिंदी चांगले कळते, बॉलिवूड तर मुंबईतलेच. शिवाय इंग्रजी सिनेमे आपण पाहतो. आपल्या प्रेक्षकांना असे अनेक चॉईस उपलब्ध असतात. याउलट दक्षिणेकडे हिंदी कळत नाही. त्यांच्या भाषेतील सिनेमे ते डोक्यावर घेतात. तसे आपले मराठी सिनेमांच्या बाबतीत होत नाही. आपला प्रेक्षक हा फक्त मराठी सिनेमे पाहत नाही. शिवाय आता ओटीटीमुळे तुमच्या कलाकृतीची स्पर्धा जागतिक स्तरावरील सिनेमाशी केली जाते. कारण तेही सहजपणे बघायला मिळतात. वेगळे काही केलेत तर लोक येतील, बघतील. तसेच नाटकाबद्दल सांगता येईल. आपण नाटकवेडे आहोतच, पण यापुढे नाटक करताना ते कशा प्रकारे असेल त्यावर प्रेक्षकांची उपस्थिती अवलंबून असेल. जे घरात बसून पाहायला मिळते, ते नको. त्यापेक्षा काही आगळेवेगळे दाखवले गेले तर प्रेक्षक नक्कीच येतील.

**पुन्हा एकदा तुमच्या हिंग्लिश नाटकांचा सीझन-टू येण्यासाठी ही योग्य वेळ आहे. आपण जरूर विचार करावा. कारण आताच यंग प्रेक्षक अशा नाटकांनी आकर्षित होईल.**

माझा अनुभव सांगायचा तर 'ब्लेम इट ऑन यशराज' नावाचे म्युझिकल नाटक गेली आठ वर्षे करतो आहे. ते नाटक सामाजिक नाटक असले तरी ते लग्नाबद्दल अगदी फुल्लटू एंटरटेनमेंट आहे. फिल्मप्रमाणे नाच-गाणी आहेत. (आमच्याकडे १२-१५ डान्सर आहेत.), लग्नाबद्दल असल्याने लोकांना आवडते. आम्ही पन्नास वेळा सेट बदलतो. नाटकाच्या शेवटी बारातचा प्रसंग आहे, तेव्हा आम्ही लोकांना डान्स करायला लावून सहभागीदेखील करतो. पब्लिक खूप एन्जॉय करते. दक्षिण आफ्रिकेत दोन हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत आमचे दहा शो हाऊसफुल झालेले आहेत. अशा प्रकारे काही धम्माल - जे टीव्हीवर नाही पाहता येत- असे लाइव्ह नाटक लोक नक्कीच बघतील.

**- भरत दाभोळकर**


ग्रंथाली




**पटावरच्या सोंगट्या**

**चांगदेव काळे**

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

**चाकोरी मोडणारे पुरुष**

**हरीश सदानी**




**मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.**

# राजकारणाचे बदलते वास्तव आणि तंत्रज्ञानक्रांती



**रोहित भानुशाली**

**तंत्रज्ञानामुळे** निर्माण झालेला जागतिक बदलाचा झंझावात प्रत्येक क्षेत्रात अनुभवाला येत आहे. या बदलत्या सामाजिक वास्तवाचा राजकारणावर थेट परिणाम होत आहे. तो कसा हे पाहणे रंजक आहे. समाजातील व्यक्ती काय पाहतात, कोणते तंत्रज्ञान अधिक वापरतात. कोणत्या नेटवर्किंग साईटचा (ट्विटर, इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सॲप) वापर करतात, कुठे स्वत:ला व्यक्त करतात याचा अभ्यास करून राजकारणाची दिशा ठरवली जाते किंवा या माध्यमांचा प्रभावी वापर करून आपल्याला हवे ते वळण राजकारणाला देऊन सत्ताबदलाची गणिते ठरवली जातात.

सर्वप्रथम समाजातील बदललेल्या वास्तवाचा, जीवनशैलीचा आढावा घेऊया. आज पंचविशी-तिशीच्या आत असलेली माझी पिढी ही तंत्रज्ञानाच्या बाबतीत सुदैवी ठरली. कारण आमच्या जन्माच्या वेळी संगणक आला होता आणि आम्ही शालेय शिक्षण पूर्ण केले तोपर्यंत मोबाइल घराघरात पोहोचला होता. माझी आई मला तिच्या लहानपणीचे किस्से नेहमी सांगत असते. तेव्हा दूरदर्शन हा एकमेव टीव्ही चॅनेल असायचा. टेलिव्हिजन आणि फोन घरात असणे हे त्याकाळात श्रीमंतीचे लक्षण मानले जायचे. टीव्ही पाहण्यासाठी चोरट्यासारखे दुसऱ्यांच्या दाराकडे डोळे लावून बसणे हे अगदी सर्रास चालायचे. आईच्या माहेरी एक जुना टीव्ही माझ्या आजोबांनी आई महाविद्यालयत शिकत होती तेव्हा घरी आणला. पण टीव्हीच्या पाठीत धपाटा मारल्याशिवाय तो चालू व्हायचा नाही. अशा गमतीजमती ऐकून मला नवलच वाटते. आणि आज ओटीटी प्लॅटफॉर्मवर, एलईडी टीव्हीवर आणि मोबाइलच्या स्क्रीनवर आपण मनाला वाट्टेल ते सिनेमे आणि कार्यक्रम कधीही पाहू शकतो. हा केवढा मोठा प्रवास होय!

उद्याची माध्यमे ही नक्की कशी असतील याचा मी कायम विचार करत असतो. आमच्या घरी रोज इंग्रजी-मराठी भाषांतील विविध वृत्तपत्रे येत. मी ती  दररोज आवर्जून वाचायचो. परंतु कोविड आला आणि बातमी आली की वृत्तपत्रातूनदेखील कोविड पसरतो. त्यामुळे वर्तमानपत्रे बंद झाली आणि त्यांचे प्रत्यक्ष वाचन बंद झाले व ऑनलाइन वाचन सुरू झाले. जगाच्या सर्व घडामोडी ऑनलाइन जाणून घ्यायची मग सवयच लागली. आणि सुदैवाने वा दुर्दैवाने, ती सवय अजूनही तशीच आहे. कोविडची दुसरी लाट मंदावली पण मी वृत्तपत्र आजही सांगणकावरच वाचतोय. आज मी गर्दीमध्ये जाऊन गाडीवरचा वडापाव खाऊ शकतो, पण पेपर मात्र मोबाइलच्या ॲपवर किंवा लॅपटॉपवर ऑनलाइनच वाचतो. सूत्रांच्या मते, वृत्तपत्रांचा रेव्हेन्यू २०२०-२१ मध्ये ४० ते ६० टक्के खाली गेला होता.

मला बदलत्या जगाचा आणखी एक अनुभव भंडारा जिल्ह्यात असताना आला. त्या वेळी मी तिथे विदर्भ सिंचन विकास महामंडळ याच्या अंतर्गत गोसेखुर्द या प्रकल्पावर काम करत होतो. आमचे काम म्हणजे तिथल्या पाणीवापर संस्थांना बळकटी देणे. त्यासाठी तिथल्या स्थानिक युवकांची आम्हाला कायम गरज लागत असे. एके दिवशी त्या युवकांसोबत संध्याकाळचा चहा घेताना सहज माझी नजर त्यांमधल्या एकाच्या मोबाइलवर पडली आणि आणि मी आश्चर्यचकित झालो. भंडारा जिल्ह्याच्या कुठल्यातरी टोकाला राहणारा हा युवक, ज्याला इंग्रजी व्यवस्थित बोलताही येत नव्हते, तो चक्क नेटफ्लिक्सवर इंग्रजी सीरियल पाहत होता. तेही महिना काही रुपये शुल्क भरून. हळूहळू मला आढळले की तो नारकोस, सेक्स एजुकेशन, ब्रेकिंग बॅड यांसारख्या आधुनिक काळातल्या टीव्ही सीरिज अगदी आवडीने पाहत असे. 'मले-तुले' करणारा हा युवक जितक्या आनंदाने सावजी मटण खायचा,

तितक्याच आनंदाने कोकेनमाफिया, पाब्लो एसकोबर याची कहाणी नेटफ्लिक्सवर पाहायचा. मनात आनंदही वाटला. महाराष्ट्राचे खरोखर जागतिकीकरण होत आहे याचा साक्षात्कार झाला. इंटरनेट आणि ओटीटी माध्यमांनी खरेच जगामधली अंतरे कमी करून टाकली आहेत याचा अनुभव मी नागपूरच्या त्या वन्य आणि ग्रामीण भागात घेतला.

माहितीच्या मध्यमांमध्येसुद्धा एक मोठा बदला आलेला आहे. रेडिओच्या जागी आता लोक पॉडकास्ट ऐकतात. स्वत:ची वेबसाईट उघडतात.

शिक्षणक्षेत्रात तर जणू उद्याच्या माध्यमांनी क्रांतीच आणली आहे. कुणी विचार तरी केला होता का की आपल्या घरातला एक दहा वर्षांचा चिमुकला चक्क कम्प्युटरवर कोडिंग करू लागेल. व्हाइट हॅट ज्युनियर आणि अशा अनेक कंपन्यांचे आता हेच मॉडेल आहे. जे कोडिंग माझे अनेक मित्र इंजिनीयर होताना शिकले तेच प्रोग्रामिंग जावा स्क्रिप्टवर ही मुले शाळेच्या पहिल्या इयत्तेपासून शिकत आहेत. तेही घरी बसून. बैजूस क्लासेससारख्या अनेक संघटना तर आता मुलांना ऑनलाइन मध्यमातूनच शाळा, कॉलेज, विविध स्पर्धापरीक्षा इत्यादींचे शिक्षण देत आहेत. कोचिंग क्लासला जाण्याची सीमाच या ऑनलाइन माध्यमांनी बदलून टाकली आणि कोविड संकटाने त्यांना आणखी बळ मिळाले.

दूरदर्शनच्या बरोबरीने खाजगी वाहिन्या आल्या तेव्हा सगळे म्हणाले की कोण पैसे भरून हे चॅनेल बघणार? आज खाजगी चॅनेलांशिवाय टीव्ही व्यर्थच वाटतो. उद्याच्या माध्यमांचेही तसेच झाले आहे. सॅम पित्रोदांनी भारतात दूरसंचारक्रांती आणली. तरीही लोक पुरवून पुरवून इंटरनेट वापरत होते. मग जियोने भारतात इंटरनेटची क्रांती आणली. गावगावात इंटरनेट स्वस्तात पोहोचले. शहरात, गावात सगळेच फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर, व्हॉट्सॲप, नेटफ्लिक्स, प्राइम व्हिडिओ, हॉट स्टार इत्यादी वापरू लागले. सबस्क्रिप्शनचे पैसेही देऊ लागले. आणि आता याच माध्यमांत पहिला मराठी ओटीटी प्लॅटफॉर्म 'प्लॅनेट मराठी'ही अवतीर्ण झाला आहे.

आज पाश्चात्त्य देशांमध्ये आपल्यासारखे टीव्ही चॅनेलवर सिनेमे आणि सीरियल बघणे फार कमी झाले आहे. आता लोक ओटीटीवर कंटेंट पाहतात. स्पॉटीफाय आणि यूट्यूबवर गाणी ऐकतात. माध्यमांची हीच खासियत आहे. त्यांची रचना, टेक्नॉलजी ही कायम बदलत राहणार. कदाचित उद्याचे पर्यटन म्हणजे व्ही.आर. (व्हर्चुअल रिॲलिटी) गॉगल लावून आर्टिफिशियल इंटेलिजन्सद्वारे व्हर्च्युअल जग फिरणे असेल. उद्याचा खेळ बघणे म्हणजे घरून प्रत्यक्ष ३६० डिग्रीमध्ये स्टेडियमचा फील घेता येईल, असे असेल. मशीन लर्निंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे जगात प्रचंड परिवर्तन येणार आहे.

आजच्या पिढीला मनमोकळेपणाने जगायचे आहे. तिला सेन्सॉर बोर्डाची बंधने नकोत. त्यांना गुन्हेगारीची दुनिया, ड्रग्सची तस्करी, वेश्याव्यवसाय हे सगळेच मनोरंजच्या मध्यमांद्वारे बघायचे आहे. कुठलाही राजकीय पक्ष, धर्म, तत्त्वप्रणाली अथवा वैचारिकता यांना न जुमानता सोशल मीडियावर स्वत:ला व्यक्त करायचे आहे आणि याबरोबरच सर्व समाजिक संपर्कस्थानांच्या (फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर) मध्यमांमधून इतरांनाही ऐकायचे आहे. स्वत:ची मते ठामपणे मांडायची आहेत.

मग राजकीय क्षेत्र तरी याला अपवाद कसे असेल? राजकीय क्षेत्रातसुद्धा आधुनिक प्रसारमाध्यमांनी एक प्रचंड क्रांती घडवली आहे. मी राजकीय सल्लागार म्हणून काम करतो. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञान, सामाजिक संपर्कस्थाने, प्रसारमाध्यमे यांचा राजकारणात केवढा प्रभावी वापर केला जातो ते रोजच अनुभवतो. लोक आधी मंत्र्यांना भेटण्यासाठी तासन्तास रांगेत तिष्ठत उभे राहायचे. आज तेच मंत्री थेट ट्विटरवर तुम्हाला उत्तर देण्यासाठी बांधील झाले आहेत. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲप या सर्व मध्यमांवर राजकारण्यांना आणि राजकीय पक्षांना सतत सक्रिय राहावे लागते, आणि आपल्या समाजकार्याचे प्रदर्शन करावे लागते. मुंबईचेच उदाहरण घ्या. बीएमसीच्या ट्विटर हॅंडलवर लोकांनी काही प्रश्न विचारला किंवा तक्रार केली तर त्यावर लगेच सरकारी पातळीवरून उत्तर तर दिले जातेच, शिवाय त्या तक्रारीचे निवारणसुद्धा होते. अनेक जणांनी एखाद्या गोष्टीवर ट्वीट केले आणि एखादा हॅशटॅग खूप प्रसिद्ध झाला तर ती बाब 'ट्रेन्डिंग' आहे असे निदर्शनास येते आणि मंत्र्यांपासून थेट पंतप्रधानांना त्याची दखल घ्यावीच लागते. याचाच अर्थ, आपला आवाज समाजात ऐकू येण्यासाठी आपण एखादी मोठी व्यक्ती असणे आता गरजेचे नाही. बस तुमच्या ट्वीटमध्ये दम असणे गरजेचे आहे. हे स्वातंत्र्य सामान्य माणसाला पूर्वी उपलब्धच नव्हते. ही खऱ्या अर्थाने लोकशाही आहे.

राजकारणी आणि त्यांचे पक्षसुद्धा आता कॉर्पोरेट स्टाइलने काम करतात. त्यासाठी वेगवेगळ्या कंपन्या अस्तित्वात आहेत, ज्या राजकीय पक्षांसाठी काम करतात. २०१४च्या निवडणुकीत बीजेपी बहुमताने निवडून आला त्यामागे प्रशांत किशोर यांची 'आयपॅक' कंपनी कार्यरत होती हे आता उघड सत्य आहे. मी त्या कंपनीत काही काळ काम केले असल्याने तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे, सामाजिक संपर्कस्थाने, इतकेच नव्हे; तर अगदी काही वेळा ओटीटीवर प्रदर्शित होणारे सिनेमे यांचा राजकीय पक्ष कसा वापर करतात ते जवळून अनुभवले आहे.

राजकारणी व्यक्तिमत्त्वांचे ब्रॅंडिंग करणे, त्यांच्या मतदारसंघाचा अभ्यास करणे, अकार्यक्षम नगरसेवक, कार्यकर्ते, विभागप्रमुख, शाखाप्रमुख या सगळ्यांचा पद्धतशीरपणे अभ्यास करणे, ही कामे विविध कंपन्यांच्या मार्फत केली जातात. जी समाजहिताची कामे पक्षातर्फे केली जातात त्यांची सामाजिक संपर्कस्थाने, प्रसारमाध्यमे यावर सतत प्रसिद्धी केली जाते. प्रत्येक राजकारणी व्यक्तीचे स्वत:चे नेटवर्क तयार केले जाते. त्यासाठी वेगवेगळ्या गावांमध्ये, वेगवेगळ्या शहरांमध्ये हे कार्यकर्त्यांचे जाळे पसरवले जाते. त्याआधारे लोकांशी थेट संपर्क साधण्यावर भर दिला जातो. आधी कार्यकर्ते नेत्यांच्या सांगण्यावरून एखाद्या मुद्द्याच्या विरोधात आवाज उठवण्याचे काम

करत असत; आज मात्र या नवीन धोरणानुसार ते सक्रिय कार्यकर्ते म्हणून काम करतात. वेगवेगळ्या जबाबदऱ्या त्यांना थेट सोपवल्या जातात. कामाचा आढावा घेण्यासाठी झूम मीटिंगसारख्या पर्यायातून पक्षप्रमुखांशी प्रत्यक्ष संवाद साधला जातो. त्यांच्या कुटुंबीयांसाठी वेगवेगळ्या कल्याणकारी योजना आखल्या जातात. त्यामुळे त्यांची पक्षबांधिलकी टिकून राहते. काम करण्यासाठी त्यांना आवश्यक ती ऊर्जा मिळते. आपल्या मताला पक्षात किंमत आहे ही भावना वाढीस लागते. त्यातूनच पक्षाची पाळेमुळे बळकट होतात. नगरसेवक आणि त्यांच्या कामाचा आढावा हादेखील सामाजिक संपर्कस्थानांच्या माध्यमातून गोळा केला जातो. प्रत्यक्ष माहिती मिळते तिचे विश्लेषण केले जाते. गुगल फॉर्मच्या माध्यामातून प्रश्नावली भरून घेतली जाते. त्याचे विश्लेषण करून गावागावात पक्षाची जनमानसात काय प्रतिमा आहे याचा शोध घेतला जातो. पक्षाचे ट्विटर हँडल विकसित करून लोकांच्या अपेक्षा, पक्षाविषयी भावना, पक्षातील नेत्यांविषयी भावना जाणून घेतल्या जातात.

यातून मिळालेल्या महितीच्या आधारे आणि लोकांच्या अपेक्षेप्रमाणे पक्षाची ध्येयधोरणे बदलली जातात. कधी कधी नेमके याच्या उलट काम राबवले जाते. आपल्याला हवी तशी पक्षाची जनमानसात प्रतिमा तयार करण्यासाठी सामाजिक संपर्कस्थानांचा वापर केला जातो. सतत नेता चर्चेत राहील याची काळजी घेतली जाते. सकारात्मक प्रसिद्धीवर भर दिला जातो. थोडक्यात, नेत्यांना स्वत:चे ऑनलाइन अस्तित्व तयार करावे लागते.

पूर्वीचा काळ आता राहिला नाही. आता ऑनलाइन विश्वात काय घडत आहे यावर संपूर्ण जगाचे लक्ष असते. बीजेपीने यात मास्टरी मिळवलेली आहे. काही पक्ष पैसे देऊन आपल्याला हवे तसे कॉमेंट सामाजिक संपर्कस्थानांवर लोकांकडून करवून घेतात अशी चर्चा होती, पण याबद्दल अजूनही पुरावा मिळालेला नाही. अमित मालवियसारख्या लोकांनी बीजेपीचे नेटवर्क इतके तळागाळापर्यंत विकसित केले की प्रत्येक छोट्या छोट्या भागात त्यांचे कार्यकर्ते आहेत. मुख्य म्हणजे ते शिक्षित आहेत. त्या प्रत्येकाला टूलकिटच्या माध्यमातून त्यांच्यापर्यंत संदेश जातो की कोणत्या नेत्यांविषयी त्यांना काय ट्वीट करायचे आहे. सामाजिक संपर्कस्थानांवर काय पोस्ट करायचे आहे. त्यामुळे बऱ्याचदा मोठ्या मोठ्या नेत्यांनी अगदी सेम टू सेम पोस्ट टाकलेली आपल्याला दिसते. उदाहरणार्थ, नुकतेच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले तेव्हा किरण रिजीजू आणि बीजेपीच्या इतर मोठ्या नेत्यांनी अगदी हुबेहूब पोस्ट टाकल्या. अगदी कॉपी-पेस्ट. आणि त्या लोकांच्या निदर्शनास आल्या. नेत्यांचे ऑनलाइन अस्तित्व जास्तीत जास्त कसे वाढेल याची कंपन्यांकडून सतत काळजी घेतली जाते. त्याला किती लाइक्स मिळाल्या, किती पोस्ट शेअर झाल्या, कोणत्या प्रतिक्रिया त्यावर आल्या, याचा अभ्यास केला जातो. त्यानुसार आवश्यक ते बदल करण्यावर भर दिला जातो.

प्रत्यक्ष मतदारसंघाची बांधणी करण्यासाठी या माहितीचा वापर केला जातो. आपल्याला अनुकूल असे जनमत बनवण्यासाठी वेगवेगळ्या गोष्टी केल्या जातात. त्या त्या वेळचे ज्वलंत मुद्दे मुद्दाम चर्चेत आणले जातात. एखादी निवडणूक येऊ घालते तेव्हा लोकांच्या जिव्हाळ्याचे, असंतोषाचे मुद्दे कोणते याचा आढावा घेऊन संपूर्ण निवडणूकनीती आखली जाते. मग सतत तेच मुद्दे जाणीवपूर्वक तापवले जातात. यात वेगवेगळ्या जातीय गटांना लक्ष्य केले जाते. वेगळ्या सामाजिक गटांना लक्ष्य केले जाते. जातीय समीकरणे जुळवली जातात. मतदारांच्या आर्थिक स्तराचा विचार केला जातो. आणि अशा प्रकारे ती मोहीम राबवली जाते. उदाहरणार्थ, एखाद्या गटाचे समाजमंदिर बनले नसेल आणि ते काम सत्ताधारी पक्षाकडून अपेक्षित असेल तर विरोधी पक्षाच्या निवडणूकनीतीमध्ये असा मुद्दा हमखास समाजमाध्यमांवर खेळवला जातो. सामाजिक संपर्कस्थानांवर त्याची चर्चा होईल याची व्यवस्था केली जाते.

आधुनिक सामाजिक संपर्कस्थानांचा वापर करून पक्षनेते, पदाधिकारी, नगरसेवक, विभागप्रमुख व्यक्तिगत पातळीवर जी माहिती गोळा करतात त्याची पार्टी हायकमांडकडून निश्चितच दखल घेतली जाते. अर्थात, पद देण्यासाठी वा तिकीट देण्यासाठी या एकमेव घटकाचा वापर केला जात नाही. ते अनेक घटकांवर ठरते. काही वेळा या माहितीचा वापर करून परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी वाव दिला जातो. आधी या गोष्टी कधीच होत नव्हत्या. नेत्याचे स्वत:चे वजन किती आहे, कोणाकडे ऊठबस आहे यावर पूर्वी त्याचे अस्तित्व ठरायचे. आता या माहितीच्या आधारे जनमानसात त्याचे स्थान काय, प्रतिमा काय हे शोधून मगच त्याचा विचार केला जातो.

ही माहिती गोळा करण्यासाठी प्रत्येक पक्षाकडे एक 'बॅक एंड' टीम असते. ही टीम आपापले सोर्स पणाला लावते.

समाजप्रवाहानुसार राजकारण बदलते हे खरे आहेच, तसेच बदललेल्या प्रवाहाच्या प्रतिबिंबात राजकारण कूस बदलते हेही तितकेच खरे.

**– रोहित भानुशाली**
rohitbhanushali@hotmail.com

||ग्रंथाली||




**कपडे वाळत घालणारी बाई**

**हर्षदा सुंठणकर**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत १०० रु.**

# जर्नी ऑफ ब्लॅक...



**पार्श्वनाथ विजय नांद्रे**

**तो** दिवस मला अजूनही स्मरणात आहे, ज्या दिवशी मला माझ्यातल्या चित्रकलेची जाणीव झाली. मी इयत्ता तिसरीत असताना पहिले चित्र माझ्या काळ्या दगडी पाटीवर पेन्सिलने रेखाटले होते. ते चित्र होते एका हॉकी खेळणाऱ्या मुलाचे... तेसुद्धा काळ्या रंगात काढलेले. बी. रमेश कंपनीच्या वहीचे कव्हर होते ते... त्या दिवसापासून सुरू झालेला माझा चित्रप्रवास आजही अव्याहत सुरू आहे. काळ्याचा हा प्रवास सदैव माझा पाठलाग करतोच आहे. अपवादात्मक वेळ सोडली तर चित्रकलेचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतल्यानंतर सदैव चित्रनिर्मिती सुरूच आहे .

घरची परिस्थिती फारशी चांगली नसली तरी माझ्या वडिलांनी मला कधी त्या परिस्थितीचे चटके बसू दिले नाहीत. माझे वडील एका साखर कारखान्यात हंगामी कामगार होते. त्यातच कारखान्यातील अपघातात ते उजव्या हाताने अपंग झाले. परंतु परिस्थितीशी दोन हात करतानाही त्यांनी माझ्या शिक्षणात कसूर केली नाही. त्यामुळे तसा कोणताही संघर्ष मला करावा लागला नाही. इयत्ता दहावीवी नंतर चित्रकला महाविद्यालयात प्रवेश घेताना वडील थोडे नाराज होते, पण तीव्र विरोध त्यांनी कधी केला नाही. शाळेतून मला फारसे कलेबद्दल काही मार्गदर्शन मिळाले नाही. गावात साईनबोर्ड तयार करणाऱ्या एका प्रसिद्ध पेंटरांकडून मात्र मला मार्ग सापडत गेला. साईनबोर्ड रंगवण्याचे काम मी इयत्ता नववीमध्ये असल्यापासूनच करत होतो. त्यातून चित्रकलेची ओढ अधिक तीव्र झाली. त्या पेंटरांनीच मग पुढे मला कलाशिक्षण घेण्याचे प्रोत्साहन दिले. त्याअर्थाने ते माझे पहिले गुरू होते.

तीव्र ओढीने मी कलामहाविद्यालयात प्रवेश घेतला असला तरी तेथे शिकताना मात्र मला माझ्यामधल्या कलाक्षेत्रातील मर्यादांची जाणीव झाली. येथेही शहरी वातावरणात आणि झगमगाटी दुनियेत कित्येकदा माझ्या रंगावरून मला चिडवले जायचे. माझ्या काळ्यासावळ्या रंगावरून अत्यंत अपमानकारक फिशपॉन्डही टाकून त्याचा आनंद घेतला गेला. दुर्दैवाने फौंडेशनच्या परीक्षेत मी अनुत्तीर्ण झालो. आलेल्या अपयशाने मी पूर्णपणे खचून गेलो होतो. पहिल्यांदा दहावी अनुत्तीर्ण आणि आता आवडीच्या क्षेत्रात अनुत्तीर्ण. माझ्यातील निराशेने मनात न्यूनगंडाची भावना निर्माण होत होती. काळा पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या मार्गाने तोंड वर काढत होता. अशावेळी चित्रकार शंकर पळशीकरसरांचे वर्गमित्र आणि जर्मनीत स्थायिक असणारे माझ्या गावचे चित्रकार कुतूब शेख गावी आले. त्यांची विजयादशमीच्या दिवशी भेट झाली. त्यांनी माझी चित्रे पाहिली. खूप आनंदी झाले आणि त्यांच्याजवळच्या पेलिकन कंपनीच्या रंगांच्या मोठमोठ्या बाटल्या, त्यांनी वापरलेले ब्रश, वॉटरकलर, पेपर पॅड असे बरेच साहित्य मला भेट दिले. तो क्षण आणि तो दिवस माझ्यासाठी अक्षरशः अविस्मरणीय आहे. तिथून पुन्हा नव्या उत्साहाने, नवा जोश घेऊन मी सुरुवात केली.

चित्रकार कुतूब शेख जवळपास तीन महिने गावी होते. त्या काळात मी सदैव त्यांच्याजवळच राहू लागलो. त्यांनी मला पाश्चात्त्य कला आणि तेथील कित्येक कलाकारांची माहिती दिली. माझ्या कामात सातत्याने त्यांनी बदल घडवून आणले. अत्यंत दर्जेदार पुस्तके त्यांनी मला भेट म्हणून वाचायला, अभ्यासाला दिली आणि माझे ज्ञान समृद्ध केले. पुढे मी फौंडेशन पास झाल्यानंतर फाईन आर्टला प्रवेश घेतला. त्यासाठी मी कलानिकेतन महाविद्यालयातून दळवीज् आर्ट इन्स्टिट्यूट या कोल्हापुरातील प्रसिद्ध कॉलेजमध्ये दाखल झालो. कलानिकेतनच्या माझ्या फौंडेशनच्या वर्गाच्या क्लास टीचर प्रेमा भोसले मॅडमनी माझ्यावर खऱ्या अर्थाने 'रंगसंस्कार' केले. आजही त्यांनी केलेला रंगांचा संस्कार घेऊनच माझी चित्रे

जन्माला येतात. त्यांचे ऋण विसरणे केवळ अशक्य आहे.

पुढे दळवीज आर्टमध्ये मी फाईन आर्टचा माझा अभ्यासक्रम पूर्ण केला. येथेही अंजली भोसले मॅडम, अस्मिता जगताप मॅडम, मोहन सरनाईक सर यांचे अमूल्य मार्गदर्शन मला मिळत गेले. माझे वर्गशिक्षक प्रा. शिवाजी शर्मा सरांनी मात्र माझ्या कामात खूप सकारात्मक बदल घडवून आणले. माझे पोर्ट्रेट पेंटिंगचे काम केवळ सरांच्या अमूल्य मागदर्शनाने अत्यंत चांगल्या दर्जाचे झाले. ब्रशचे जोमदार स्ट्रोक्स आणि त्यातला वेग ही माझ्या पोर्ट्रेटची जमेची बाजू तयार झाली. त्यासोबतच माझे कॉम्पोझिशनचे काम मात्र खूप वेगळ्या मार्गाने जाणारे ठरू लागले. शर्मा सर आणि गिरीश उगळे सर यांनी माझ्यावर खास नजर ठेवून माझ्याकडून सातत्याने निर्मिती करून घेतली. त्याचे फळ मला जी.डी. आर्टच्या चांगल्या गुणांनी मिळाले, मात्र येथवर येतानाही इंटरच्या वर्षाला मी पुन्हा अनुत्तीर्ण झालो होतो. काळा पाठलाग  सोडत नव्हता, पण यावेळच्या अपयशाला निराशेत परिवर्तित होऊ दिले नव्हते. वडील आणि घरच्यांनीही या कठीण वेळी खूप मोठा मानसिक आधार दिला होता.



जी.डी.आर्ट अशा पद्धतीने अडथळ्यांची शर्यत पार करत पूर्ण झाले. पुढे सातत्याने विविध भागांत निसर्गचित्रण करणे, महालक्ष्मीमंदिर, रेल्वेस्टेशनवर स्केच करणे, ज्यावेळी जे वाटेल त्या वेगवेगळ्या शैलीत काम करत चित्रनिर्मिती सुरू झाली. कोणतीही ठोस दिशा नव्हती. केवळ चित्रे काढणे एवढेच होते. त्यातल्या त्यात या काळात मात्र चित्रकार शिवाजी शर्मा यांच्या चित्रशैलीचा माझ्या चित्रांवर खूप प्रभाव पडला होता. प्रत्येक कलाकृतीमधून शर्मा सरांचे रचनातंत्र, ब्रशिंगची पद्धत, रंगलेपन  दिसू लागले. पुढे मात्र जसजसे सातत्याने मुंबईला येणेजाणे होऊ लागले, प्रदर्शने पाहता आली त्यातून नवे काही सापडत गेले. हळूहळू स्वतःचे प्रयोग सुरू झाले. अर्थातच या प्रयोगांमध्ये वेगवेगळ्या कलावंतांचे प्रभावही दिसू लागले. असे करता करता मग बुद्धचित्र विषयाकडे वळलो. त्यासाठी लागणारे साहित्य वाचायला सुरुवात केली. चित्रनिर्मिती तर होत होती मात्र प्रत्येक ठिकाणी कुठलातरी प्रभाव आपले अस्तित्व दाखवतच होता. स्वतःचे म्हणावे असे काही निर्भेळ निर्माणच होत नव्हते. हळूहळू पुन्हा निराशा आणि न्यूनगंडाने मानगूट पकडली होती. अशातच एके दिवशी शारीरिक दुखण्याने अचानक जगण्याचे संदर्भ बदलले आणि तेथून म्हणजे सन २०१४ पासून खऱ्या अर्थाने स्वचित्रनिर्मितीला सुरुवात झाली.

अचानक आलेल्या या अनारोग्याने त्या काळात विचारांना वेगळी दिशा दिली. हॉस्पिटलमधील दिवसांनी जगण्याचे मर्म दाखवले. रंगीत आयुष्याची दुसरी काळी क्रूर बाजू या प्रसंगाने नाट्यमयरीत्या माझ्या समोर आणली. शेजारच्या बेडवरचा रात्रीच्या अंधारात काढला जाणारा मृतदेह जगण्याच्या क्षणभंगुरतेची उदाहरणे देत होता. जगण्यामरणाच्या स्वल्प अंतरातील अमूर्त काळेपण तसेच या काळात सतत वाचन व चिंतनाने मनात निर्माण होणाऱ्या सगळ्या भावकल्लोळांना चित्ररूपात मांडण्याची ओढ वाढली आणि हे सर्व कशा आणि कोणत्या चित्रशैलीत व्यक्त व्हायचे, यातून नकळत संपूर्ण अमूर्त चित्रशैलीकडे वळलो. नव्या प्रवासासाठी...

आलेल्या दुखण्यालाच चित्राविषय करून निर्मिती सुरू झाली. नकळत चित्रांमधून हृदयाच्या शस्त्रक्रियेत वापरला जाणारा 'कॅथेटर' चित्रविषय म्हणून येऊ लागला. या काळातील चित्रनिर्मितीने मात्र प्रेम, माया, काळजी, मित्रत्वाची, आपलेपणाची जाणीव या भावनांची मला नव्याने ओळख झाली. हे सुरू असतानाही पुन्हा चित्रांमध्ये एकसुरीपणा येऊ लागला. मार्ग सापडतच नव्हता. अशावेळी मनात आले आपण आपली चित्रे थेट प्रसिद्ध चित्रकार प्रभाकर कोलते सरांना दाखवावीत. सरांचा नंबर मिळवला आणि धाडसाने सरांना फोन करून मनातली गोष्ट सांगितली. सरांनी मात्र मोठा आश्चर्याचा धक्का दिला आणि म्हणाले, 'तू मुंबईला येण्याऐवजी मीच  तुझ्याकडे येतो! तसाही मी एका कार्यक्रमासाठी कोल्हापूरला येणारच आहे.' काळ्या ढगांना सजलेली ही सोनेरी किनार वाटली. ठरल्याप्रमाणे सर माझ्या स्टुडिओला आले. माझी सगळी चित्रे



चित्रांचे वैशिष्ट्य बनून येत होता. असा थेट गोल्डन वापरण्याच्या या धाडसाचे बऱ्याच जाणकारांनी कौतुक केले. अर्थात हे करणे थोडे धाडसाचे असले तरी एका अज्ञानातून केलेल्या मुक्त प्रयोगाचे छान रूप होते. त्या प्रकारानेही खूप काही शिकवले. मनातल्या हव्या हव्या सोनेरी क्षणांची ती ओढ त्यातून सहज व्यक्त होऊन गेली होती.

हळूहळू चित्रनिर्मितीत अभ्यासपूरक प्रगल्भता येण्यासाठीचा प्रयत्न सुरू झाला. मनासारखी आणि मुक्त निर्मिती सुरू झाली. कोणत्याही शैलीचे प्रभाव झटकण्याचे बळ मिळाले. सन २०१९ पासून कोविडचा प्रादुर्भाव सुरू झाला. एका अनोळखी अदृश्य काळ्याने जगावर संक्रमण आणले. सगळा भवताल काळवंडलेला. संशयाची काळी भुते मनात नाचत भयकंप निर्माण करत होती. या काळात खूप आणि अथक चित्रनिर्मिती झाली. खास करून पुन्हा नव्याने रंग शोधण्यासाठी केवळ काळा वापरून चित्रनिर्मिती झाली.

पाहिली आणि म्हणाले या शैलीची तुझी सुरुवातीची चित्रे सोडली तर बाकी चित्रे मला केवळ साडयांची डिझाईन वाटतात. तुझ्याकडे तंत्र आहे, रंगसंगतीची जाण आहे, पण केवळ भावनेच्या भरात केलेली; विचार नसणारी चित्रे आहेत. चित्रांत विचार हवा. पुन्हा येथून नव्याने एका नव्या वाटेवर सरांनी आणून सोडले. या वाटेवर चालण्यासाठी जवळपास दोनतीन तास माझ्याशी सविस्तर चर्चा केली, मार्गदर्शन केले आणि वैचारिक आणि बौद्धिक निर्मितीसाठी तयार केले. दरम्यानच्या काळात २०११ मध्ये जहाँगीरमध्ये आणि २०१६ मध्ये आर्टिस्ट सेंटर येथे, अशी दोन प्रदर्शने झाली. पुढे २०१८ सालचे जहाँगीरचे प्रदर्शन मला मिळाले. त्याला जोडूनच नेहरू सेंटरचेही प्रदर्शन मिळाले. सलग चौदा दिवस मुंबईच्या दोन्ही प्रसिद्ध गॅलऱ्यांसाठी संधी मिळाली. २०१६पासून त्याची तयारी सुरू झाली. आदरणीय कोलते सरांच्या मार्गदर्शनाने कामात झालेला अमूलाग्र बदल घेऊन ही दोन्ही प्रदर्शने पार पडली. रसिकांनी कामाचे कौतुक केले. नामवंत व ज्येष्ठ चित्रकार पांडुरंग देवघरे सर, विजयराज बोधनकर सर, दत्ता पाडेकर सर, पारा सर, मोग्गलान श्रावस्ती सर, प्रकाश वाघमारे सर, उत्तम पाचारणे सर यांनी प्रदर्शनास भेट देऊन कामाचे योग्य मूल्यमापन केले, समाधान व्यक्त केले आणि सातत्य राखून नवबदलांसाठी मार्गदर्शन केले. त्यावेळच्या चित्रांमध्ये जोरदार काळ्या स्ट्रोक्सबरोबर प्रत्येक रंगात मिसळून येणारा किंवा आपले शुद्ध रूप ठेवून येणारा गोल्डन रंग या

लहानपणापासून समाजात माझ्या काळ्यासावळ्या रंगाने मला कुणी कलर म्हणायचे, कुणी वेस्ट इंडिज म्हणायचे, कुणी थेट काळ्याच म्हणून बोलावायचे. ते घृणास्पद भाव, या सर्वांपासून दूर राहण्यासाठी लहानपणी अंधारात धान्य साठवायच्या कणगीत लपून बसायचो. त्या कणगीतून, त्या अंधारातून पाहिलेले झरोके, ती अंधाराने माखलेली काळ्या कौलांची खोली, त्यातील थोडयावेळाने स्पष्ट दिसणाऱ्या दृश्यांच्या मनात कोरलेल्या प्रतिमा, या सगळ्या प्रकारात मी त्या कणग्यांमध्ये बसून विड्यांचे तुकडे पेटवून ओढायचो. समाजातील व्यसनांची काळी किनार आयुष्याला कवेत घेऊ पाहात होती  तेव्हा मी फार तर पाचवीत वगैरे असेन. इतके दडपण, एक अनामिक भीती मी अनुभवत होतो. आपण खूप कुरूप आहोत असे वाटायचे. या सगळ्या भावनांना या काळात मी मुक्तपणे रंगवण्याचा प्रयत्न केलाय. पुन्हा पुन्हा उद्‌भवणारे हृदयाचे दुखणे, सलग तीन वेळा झालेल्या हृदयशस्त्रक्रिया, अशा अडचणीच्याच काळात वडिलांचे कर्करोगाचे दुखणे, त्यांचे आकस्मात जाणे अशा सर्व भावभावनांना मी माझ्या काळ्या रंगातील चित्रनिर्मितीतून व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो आहे.


कोणताही जाणूनबुजून विषय घेऊन चित्रनिर्मिती करण्यापेक्षा सहजकृतीतून येणारा विचार रंग, रेषा, पोताच्या विविध प्रयोगांतून कॅनव्हासवर उतरवणे म्हणजे एक विलक्षण अनुभूती देणारा सृजनसोहळा असतो याचा आनंद घेत अमूर्त निर्मिती करत आहे.

काळ्या रंगाबरोबरच कधीतरी एखादा वेगळा रंग चित्रात उतरतो तेव्हा त्याचे बदलते संदर्भ किती सकारात्मक ऊर्जा देतात हे या निर्मितीप्रक्रियेत मला जाणवत राहते.

काळ्यामागच्या संवेदना तंत्राच्या साहाय्याने मांडताना सातत्याने वेगवेगळी पोतनिर्मिती, रचनेतील सुलभता, कधी कधी अगदीच संपूर्ण सपाट रंगलेपन पद्धतीचा वापर चित्रात करत निर्मिती सुरू आहे. दररोज काहीना काही रेखाटन अथवा अमूर्तनिर्मिती करणे हा आता नियमच बनून गेला आहे. रचनेमध्ये वैविध्य आणणे मला जास्त आवडते. एकाच पठडीतील चित्रनिर्मितीपेक्षा मला अमूर्त शैलीमधील विविध प्रयोग करण्यात अधिक आनंद होतो. आता काळाही आनंदाने ओथंबून मनाच्या कॅनव्हासवर बरसून जातो. कधी कधी एखादी कविता सुचते आणि त्यानंतर माझे एखादे नवीन चित्र आकाराला येऊ लागते. काळ्या रंगासोबत प्रयोग करतानाही रंगमाध्यमाचे (जलरंग, क्रेलिक अथवा ऑईल इत्यादी) गुणधर्मानुसार आपले तंत्र बदलते आणि त्यानुसार काम करताना काळ्याच्या विविध पातळ्यांवरील करड्या छटा अधिक मोहवून टाकतात. याचबरोबर थोडे समकालीन प्रयोग करताना कधी सुतळी, कधी कोरोगेटेड बॉक्सचा जाड पुठ्ठा, मेंढ्यांची लोकर, घोंगडे इत्यादी माध्यमे माझ्या निर्मितीमध्ये मी वापरत असतो. सातत्याने केवळ अमूर्त रचनाच होतात असे नाही, तर मानवी मन, मेंदू आणि वासना या विषयाशी निगडित इंक माध्यमातील रेखाटनेसुद्धा मी करण्याचा प्रयत्न करतो. यातून मानवी मनाच्या अपवित्र अवस्थांचा उलगडा काळ्या रंगासोबत होतो. जैन तत्त्वज्ञानाचा लहानपणापासून माझ्यावर असणारा संस्कार माझ्या कामातील परिग्रह कमी करून निर्मितीमधील अपरिग्रह वाढवत राहतो. असा हा प्रवास निरंतर सुरू आहे. हाच काळा माझ्या या चित्रप्रवासाला 'जर्नी ऑफ ब्लॅक' बनवतो. तो कदाचित असाच राहणार अगदी एन्डलेस.... या प्रवासात माझा जिवलग मित्र चित्रकार महावीर पाटील तसेच आदरणीय प्रभाकर कोलते सर, प्रकाश वाघमारे सर, प्रकाश भिसे सर तसेच अनेक कलावंत मित्र, सातत्याने सकारात्मक ऊर्जा देणाऱ्या सर्वांचे ऋण व्यक्त करणे कर्तव्य समजतो. दुर्दैवाने हा प्रवास लिहीत असतानाच कोल्हापूरच्या कलाक्षेत्रात मला सर्वात प्रथम संधी देणाऱ्या जेष्ठ चित्रपटदिग्दर्शक चंद्रकांत जोशी सरांच्या दुःखद निधनाची धक्कादायक वार्ता आली. थोडावेळ काळ्या शाईचे हे पेनही थांबले. त्यानेही दोन ठिपके कागदावर उमटवले. जोशी सरांशी नेहमी वेगवेगळ्या विषयांवर कलात्मक चर्चा व्हायच्या. सदैव नवनवा विचार त्यांच्या अनुभवसमृद्ध बोलण्यातून सापडायचा.  शेवटी आताही या बातमीने काळा माझा पाठलाग करतो आहे; नव्हे, तो माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे असेच कदाचित सिद्ध करतो आहे. त्यांच्या स्मृतींना श्रद्धांजली अर्पण करतो.

**– पार्श्वनाथ विजय नांद्रे**
भ्रमणध्वनी : ९९७०१२९५३६
kalapurkolhapur@gmail.com

ग्रंथाली




**अंतरंग भावनांचे ललित चित्रण**
**भावतरंग**
**सुषमा शाळिग्राम**

**मूल्य २०० रु.  सवलतीत १२० रु.**




**रंगभूमीचे सौंदर्यशास्त्र**
**लेखक : देवेंद्र राज अंकुर**
**अनुवाद : डॉ. वसुधा सहस्रबुद्धे**

**मूल्य २५० रु.  सवलतीत १५० रु.**

# सागरात हिमशिखरे पुस्तकाचे प्रकाशन



**मेधा आलकरी लिखित 'सागरात हिमशिखरे पुस्तकप्रकाशनसमयी श्रीनिवास नार्वेकर, विनोद आलकरी, लेखिका मेधा आलकरी, द्वारकानाथ संझगिरी, फ्रान्सिस डिमेलो आणि सुदेश हिंगलासूपरकर**

''प्रवासवर्णन हा एक मजेदार प्रकार आहे. एक कुणीतरी व्यक्ती प्रवासाला जाऊन आलेली असते. तिनं काहीतरी तिच्या नजरेनं बघितलेलं असतं आणि तिला ते इतरांना सांगावंसं वाटतं. ते सांगणं जितकं रंजक, जितकं रसाळ, जितकं रोचक असेल तितकं ते प्रवासवर्णन ऐकावंसं वाटतं, वाचावंसं वाटतं.'' मेधा आलकरी यांच्या 'सागरात हिमशिखरे' या पुस्तकप्रकाशन समारंभाची सुरुवात करताना सूत्रसंचालक मकरंद जोशी यांनी प्रवासवर्णनाच्या पुस्तकांचं मर्म इतक्या सोप्या सरळ शब्दांत सांगितलं. ३० नोव्हेंबर २०२१ रोजी, रवींद्र नाट्यमंदिराच्या वास्तूत पु.ल. देशपांडे कला अकादमीच्या हॉलमध्ये हा सोहळा पार पडला.

प्रसिद्ध क्रिकेट समालोचक, सिनेसंगीतप्रेमी आणि लेखक द्वारकानाथ संझगिरी यांच्या हस्ते हे प्रकाशन संपन्न झालं. यावेळी ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीची वाटचाल आणि भविष्यातील योजना सांगणारं मनोगत मांडलं. लेखिका मेधा आलकरी यांनी आपल्या मनोगतात त्यांच्या लेखनप्रवासाची सुरुवात कशी झाली ते उद्धृत करताना तो प्रवास पत्रलेखनाद्वारे सुरू झाल्याचं नमूद केलं. त्यामुळे त्यांच्या साऱ्याच लेखनात एक अनौपचारिकता, सहजता असते. त्या म्हणाल्या, ''निखळ आनंदासाठी मी प्रवास करते आणि इतरांना तो घेता यावा म्हणून लिहिते.'' त्यांनी त्यांच्या या लेखनप्रवासातील काही गोष्टी यावेळी उलगडल्या.

ज्येष्ठ पत्रकार आणि लेखिका संजीवनी खेर यांनी या पुस्तकाला अतिशय मोजकी आणि नेटकी प्रस्तावना लिहिली आहे आणि चित्रकार विजयराज बोधनकर यांचं मुखपृष्ठ आतील लेखांइतकंच आकर्षक आहे. लेखिकेचा साहित्यप्रवास जवळून पाहिलेले आणि पुस्तकाच्या कामात मोलाची भर टाकणारे तिचे शालेय गुरू फ्रान्सिस डिमेलो यांनी आपल्या भाषणात लोकसत्तातील चतुरंग पुरवणीपासून सुरू झालेला, त्यांच्या विद्यार्थिनीच्या लेखनप्रवासाचा आलेख प्रेक्षकांसमोर उघडून दाखवला. 'तिने स्वतःला एक उत्तम प्रवासवर्णनकार म्हणून सिद्ध केलेलं आहेच; त्याचबरोबर ती एक उत्तम निवेदिका, सूत्रसंचालक, मुलाखतकार, म्हणून साहित्यवर्तुळात ओळखली जाते' असे लेखिकेच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू त्यांनी आपल्या भाषणात वर्णन केले. लेखिकेच्या प्रवासवर्णनाचं वेगळेपण सांगताना त्यांनी पर्यटनाकडे पाहण्यासाठी तिला लाभलेल्या वेगळ्या दृष्टीचा उल्लेख केला. तेथील समाजजीवन, स्त्रीजीवन, आख्यायिका, दंतकथा सांगत, विकृती किंवा अतिशयोक्ती टाळून, वाचकांना सोबत घेऊन जाणारं हे प्रवासवर्णन असल्याचं ते म्हणाले.

व्हिजन व्हॉइस एन ॲक्टचे श्रीनिवास नार्वेकर यांनी या पुस्तकातील एका मजेशीर अनुभवाचं उत्कृष्ट अभिवाचन केलं.

विविध देशांत फिरून आलेले आणि आपल्या खुसखुशीत शैलीत त्या त्या देशातील किस्से सांगणारे द्वारकानाथ संझगिरी यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना, मेधा आलकरी यांच्या लिखाणाचं कौतुक केलं. साऊथ आफ्रिका, वेस्ट इंडिज आणि पाकिस्तान या देशांतील खुमासदार आणि हृद्य किस्से सांगून प्रेक्षकांच्या ज्ञानकक्षा वाढवत मनोरंजनही केलं. एकदा साऊथ आफ्रिकेतील पीटर मॅरीसबर्ग या स्टेशनवरील वेटिंग रूमला ते भेट देऊन आले. त्यावेळी तेथील धूळ मोठ्या श्रद्धेनं त्यांनी आपल्या कपाळी लावली. कारण तिथेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना गोऱ्या अधिकाऱ्यांच्या आदेशानं, अपमानित करून, पहिल्या वर्गाचं तिकीट असतानासुद्धा आगगाडीतून उतरवण्यात आलं होतं, हे सांगताना ते म्हणाले, ज्या जागेवर गांधीजींना सत्याग्रहाचं हत्यार सापडलं, ते ठिकाण माझ्यासाठी एक पवित्र मंदिर होतं.

वेस्ट इंडिज या पर्यटकांच्या यादीत नसलेल्या देशाबद्दल बोलताना त्यांनी तेथील मोकळ्या आणि वेगळ्या संस्कृतीबद्दल सांगितलं. पाकिस्तानच्या वास्तव्यात शाहरुख खानच्या चुलतभावाच्या आणि दिलीपकुमारच्या घराला भेट दिल्याचा किस्सा सांगताना त्यांनी दोन देशांतील नागरिकांच्या मनात असलेली आपुलकी आणि प्रेम याचा आवर्जून उल्लेख केला. वेश्याव्यवसाय सोडून हॉटेल चालवणाऱ्या एका कुटुंबाशी त्यांचा झालेला परिचय आणि ती परिस्थिती जाणून घेताना त्यांना 'जिन्हें नाझ है हिंदपर वो कहाँ है' या ओळी लिहिणारा साहिर लुधियानवी न आठवता

# बंदिशींतील सौंदर्यस्थळे

## अस्मिता पांडे




ग्रंथाली वाचकदिनाचं या वर्षीचं आणखी एक आकर्षण होतं पं. सत्यशील देशपांडे यांची सांगीतिक 'संवाद मैफल – बंदिशीतील सौंदर्यस्थळं'. 'बंदिश' या विषयावरील एका परिसंवादात पंडितजी म्हणाले होते – बंदिश ही एक अशी संदूक आहे, ज्यात रागरूपी धन बंदिस्त आहे आणि ती संदूक उघडायला प्रतिभेची किल्ली लागते.' हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचं किंवा ख्यालसंगीताचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे 'बंदिश'. वेगवेगळे राग उलगडताना गायक बंदिश गातात. रागाचा विस्तार ज्या माध्यमातून होतो, ते माध्यम म्हणजे 'बंदिश'. राग एकच असतो, मात्र त्यात अनेक बंदिशी रचल्या जातात. एक राग उलगडायचा तर प्रत्येक घराण्याच्या वेगवेगळ्या बंदिशी तयार झालेल्या आहेत. गायक आपल्या प्रतिभेनं, त्याच्या त्यावेळच्या मूडनुसार बंदिशीची निवड करतो. एकाच रागात इतक्या बंदिशी का? त्यांची सौंदर्यस्थळं म्हणजे नेमकं काय? बंदिशीतून रागाचे वेगवेगळे प्रदेश प्रतिभावंत गायक कसे उलगडतात? – अशा आपल्या मनातल्या साऱ्या कुतूहलांची उत्तरं पंडितजींच्या विवेचनातून मिळत गेली.

बंदिशीतील सौंदर्यस्थळ म्हणजे काही पर्यटनस्थळ नव्हे. तो एक प्रवाह आहे. ते बिंदू नाहीत. मुळातच संगीत ही प्रवाही कला आहे. सौंदर्याचा प्रवाह आहे. एका बंदिशीतून एक राग मांडला जातो; पण संपूर्ण राग एका बंदिशीत नसतो. त्यामुळे रागाचं दर्शन घडवण्यासाठी, तो उलगडण्यासाठी वेगवेगळ्या बंदिशी तयार होतात ज्या रागाचे पैलू समोर ठेवत जातात.

गाणं सादर करताना आलाप, बोलतान, तान यांसारखी अष्टांगं आहेत; मात्र गाणं त्यासाठी नाही. ही सगळी तंत्रं आहेत, मात्र त्यांचं एकत्रित प्रदर्शन म्हणजे कला नव्हे. विद्यालयीन शिक्षणपद्धतीत जरी यांचा प्रचार केला गेला, तरी ही 'Tools of improvisation' आहेत. दरवेळी ती सगळीच वापरायलाच हवीत हा अट्टहास असू नये. बंदिशीत दडलेलं गाणं बाहेर काढणं' हा खरा सौंदर्यविचार आहे. मग सौंदर्यनिर्मितीच्या दिशेनं वाटचाल सुरू होते.

हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत हे काही पूर्वनिश्चित गाणं नाही. गाणं हे प्रवाही शिल्प (Fluid Sculpture) आहे. ते पूर्वनिश्चित नसतं; म्हणूनच आपल्याकडे त्याच गवयाचा तोच राग ऐकायला श्रोते पुन्हा पुन्हा जातात. कारण त्यावेळच्या मांडणीत, आवाजाच्या मॉड्युलेशनमध्ये अकल्पित असं काही घडू शकतं आणि तो क्षण टिपायला रसिक उत्सुक असतो. ठरावीक पद्धतीनंच गाणं मांडणं हे सौंदर्यविचाराला घातक आहे. म्हणूनच प्रयोगशीलता असणं महत्त्वाचं.

पंडितजींची दिलखुलास शैली आणि सुबोध मांडणी यांनी ही मैफल श्रोत्यांना आगळा आनंद देणारी झाली.

(या कार्यक्रमाचं ध्वनिचित्रमुद्रण Granthali Watch या फेसबुक पेजवर, यूट्यूब वाहिनीवर उपलब्ध आहे.)

**– अस्मिता पांडे**
asmitaspande@gmail.com

# वाचकदिन प्रकाशने



सुषमा शाळिग्राम







डॉ. शरद काळे







हरीश सदानी





हर्षदा सुंठणकर





डॉ. राणी दुष्यंत खेडीकर

प्रकाशनसमयी सुषमा शाळिग्राम (भावतरंग), शरद काळे (चिंतन भाग २) आणि (विज्ञानाच्या पाऊलखुणा), हरीश सदानी (चाकोरी मोडणारे पुरुष), हर्षदा सुंठणकर (कपडे वाळत घालणारी बाई), डॉ. राणी दुष्यंत खेडकर (लाल दिव्याची वस्ती आणि निष्पाप बालपण)

# वाचकदिन प्रकाशने




सुधीर थत्ते





काशीनाथ भावे





चांगदेव काळे





डॉ. वसुधा सहस्रबुद्धे





ॲड. लखनसिंह कटरे





प्रतिभा सराफ



प्रकाशनसमयी सुधीर आणि नंदिनी थत्ते (नोबेलनगरी २०२१), काशीनाथ भावे (ओ.एन.जी.सी.तील दिवस), चांगदेव काळे (पटावरच्या सोंगट्या), डॉ. वसुधा सहस्रबुद्धे (रंगभूमीचे सौंदर्यशास्त्र), ॲड. लखनसिंह कटरे (सरकते आहे वाळू), प्रतिभा सराफ (उमलावे आतुनीच...)

# वाचकदिन प्रकाशन वृत्तांत




पुस्तिकेच्या प्रकाशन करताना– धनश्री धारप, पं. सत्यशील देशपांडे, एन.एन. श्रीखंडे, श्रीकृष्ण जोशी आणि सुदेश हिंगलासपूकर



डॉ. लतिका भानुशाली



अस्मिता पांडे

**ग्रंथालीचा** ४७ वा वाचकदिन दादर–माटुंगा सांस्कृतिक केंद्र आणि कीर्ती महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दा.मा.सां. केंद्राच्या सभागृहात संपन्न झाला. डॉ. बाळ फोंडके, डॉ. अविनाश सुपे, संजीवनी खेर आणि राजीव श्रीखंडे या मान्यवर वक्त्यांच्या हस्ते पुस्तके प्रकाशित झाली. ज्येष्ठ वैज्ञानिक आणि संशोधक शरद काळे लिखित 'चिंतन – भाग २' आणि 'विज्ञानाच्या पाऊलखुणा' यांसह इतर मान्यवर लेखक–कवींची – कविता, ललित, अनुवाद असं वैविध्य असणारी एकूण बारा पुस्तकं प्रकाशित झाली.

शरद काळेंसारख्या वैज्ञानिकाचं चिंतन केवळ वैज्ञानिक विषयांपुरतं मर्यादित न राहता जीवनाच्या सर्वांगांना भिडतं. आपल्या मनोगतात ते म्हणाले, की वैज्ञानिक तुमच्यासरखेच हाडामांसाचे असतात; पण एखाद्या गोष्टीचा वेगळा विचार कसा करायचा हे वैज्ञानिक पाहतात आणि त्या वेगळ्या विचारांतून विज्ञानाच्या ज्या वेगळ्या वाटा निर्माण होतात, त्या विज्ञानाच्या पाऊलखुणा असतात. समाजानं त्या वाटेवरून चालावं, अशी माझी अपेक्षा आहे.

'कोरोनाकाळातील माध्यमांचे स्वरूप', 'कोरोनाकाळ आणि साहित्य', 'कोरोनानं वैद्यकक्षेत्रापुढे उभे केलेले आव्हान' आणि 'कोरोनाकाळातील विज्ञान' या विषयांवर अनुक्रमे राजीव श्रीखंडे, संजीवनी खेर, डॉ. अविनाश सुपे आणि डॉ. बाळ फोंडके या वक्त्यांनी मनोगतं व्यक्त केली.

'भविष्यात व्यक्त होण्यासाठी रोज नवे प्लॅटफॉर्म येणार आहेत. त्यासाठी गरज आहे प्रगत तंत्रज्ञानाची. समाजमाध्यमं आणि तंत्रज्ञानाची जोड आवश्यक आहे, कारण यांचा आवाका प्रचंड मोठा आणि थक्क करणारा आहे. कोरोनाकाळात यानंच आपण एकमेकांशी जोडले गेलो.' – असं मत राजीव श्रीखंडे यांनी मांडलं.

संजीवनी खेर म्हणाल्या, 'आपलं घर, आपली खोली याच्यापलीकडे न गेलेल्या लहानग्यांनी या कोरोनाकाळात आपल्या बरोबरीचे सवंगडीदेखील पाहिले नाहीत. बाहेरच्या जगाची ओळख करून देणारं साहित्य निर्माण होण्याची आता गरज आहे. एकमेकांना भेटण्याचं मुक्त स्वातंत्र्य २०२२ मध्ये लाभावं.'

डॉ. अविनाश सुपे यांनी वैद्यकीय क्षेत्रापुढची आव्हानं मांडताना, या कोरोनाकाळानं आरोग्यव्यवस्थेला स्वत:च्या मर्यादा किती स्पष्टपणे दाखवून दिल्या, प्रगतीमुळे निर्माण झालेल्या मनातल्या अहंकाराला कसा धक्का दिला, याचा नेमका आढावा घेतला. 'कोरोना ही अवघड प्रश्नपत्रिका होती; जिला कोणतीही पाठ्यपुस्तकं नव्हती', हे नमूद करत 'गेल्या चार–पाच वर्षांतली संशोधनं हेच सांगताहेत की येणाऱ्या काळातले नवीन आजार वन्यजीवांतून येणार आहेत. मात्र या सगळ्या शोधांच्या, उपाययोजनांच्या गोष्टी लोकांपर्यंत जायला हव्यात. यासाठी समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत विज्ञान आणि आरोग्यव्यवस्था पोहोचायला हवी, कोणतीही उपाययोजना न होण्याची अगतिकता बदलणं आणि आरोग्यव्यवस्था बळकट करणं ही खरी आव्हानं आहेत. आरोग्याची शिदोरी घेऊन कोरोना किंवा तत्सम आजारांसोबत आपल्या आरोग्याचं बळकटीकरण करीत पुढल्या वर्षाकडे जाऊया, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

'कोरोनाकाळातील विज्ञान' हा विषय मांडताना प्रसिद्ध वैज्ञानिक, लेखक डॉ. बाळ फोंडके यांनी लस, औषधं यांच्या नवनिर्मितीपासून वेगवेगळे स्टार्टअप या काळात समाजात निर्माण झाले, या सकारात्मक बदलाकडे लक्ष वेधलं. मात्र हे बदल डॉक्टर किंवा वैज्ञानिकांपुरतेच मर्यादित न राहता, या गोष्टी समाजापर्यंत पोहोचवल्या पाहिजेत आणि हीच समाजमाध्यमांची खरी जबाबदारी आहे, हे अधोरेखित केलं. त्यादृष्टीनं वाचकदिनाच्या निमित्तानं प्रकाशित झालेली विज्ञानविषयक पुस्तकं ही फार मोठी घटना आणि चळवळ असल्याचं त्यांनी सांगितलं.

यानंतर पंडित सत्यशील देशपांडे यांची 'बंदिशींतील सौंदर्यस्थळं' ही मैफल संपन्न झाली. त्यापूर्वी यानिमित्त ग्रंथालीनं प्रसिद्ध केलेल्या संगीतविषयक पुस्तिकेचं प्रकाशन झालं. या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन डॉ. लतिका भानुशाली आणि अस्मिता पांडे यांनी केलं.

# रेणू दांडेकर लिखित तीन पुस्तकांचे प्रकाशन







**रेणू दांडेकर लिखित 'प्रिय प्रतिमास रेणूकडून', 'सृजनाच्या नव्या वाटा' आणि 'वय झाल्यावर' या तीन पुस्तकांचे प्रकाशनसमयी कैवल्य दांडेकर, सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. लतिका भानुशाली, अविनाश धर्माधिकारी, लेखिका रेणू दांडेकर, सोनाली कुलकर्णी, डॉ. सागर देशपांडे, सुचेता पडळकर आणि धनश्री धारप**

रेणू दांडेकर यांनी लिहिलेल्या 'प्रिय प्रतिमास रेणूकडून' (आत्मकथन), 'सृजनाच्या नव्या वाटा' (शैक्षणिक लेखसंग्रह), 'वय झाल्यावर' या तीन पुस्तकांचे प्रकाशन १३ डिसेंबर २०२१ रोजी पत्रकारभवन पुणे येथे संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सूत्रसंचालक कैवल्य दांडेकर यांनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी व्यासपीठावर अविनाश धर्माधिकारी (माजी सनदी अधिकारी), सोनाली कुलकर्णी (सुप्रसिद्ध अभिनेत्री व लेखिका), सुचेता पडळकर (लेखिका शिक्षणतज्ज्ञ), डॉ. सागर देशपांडे (संपादक, जडणघडण, सह्याद्री प्रकाशन), सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. लतिका भानुशाली उपस्थित होते.

डॉ. लतिका भानुशाली यांनी आत्मकथनासंदर्भात बोलताना मराठी साहित्यातील आत्मचरित्र लेखन, आत्मकथन यांचा आढावा घेतला.

सुदेश हिंगलासपूरकर यांनी 'ग्रंथाली'चे मराठी सारस्वतातील योगदान, तसेच भविष्यकाळातील ग्रंथप्रसाराच्या योजना, प्रकाशित पुस्तकविश्व आणि ग्रंथालीचा सांस्कृतिक वारसा याविषयी निवेदन केले.

अविनाश धर्माधिकारी आणि श्रीमती सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते आत्मकथन 'प्रिय प्रतिमास रेणूकडून' याचे प्रकाशन झाले तर डॉ. सागर देशपांडे यांनी 'वय झाल्यावर' या पुस्तकाचे प्रकाशन केले. श्रीमती सुचेता पडळकर यांनी 'सृजनाच्या नव्या वाटा' या पुस्तकाचे प्रकाशन केले.

'सृजनाच्या नव्या वाटा' या पुस्तकाविषयी बोलताना सुचेताताई यांनी सृजनानंद विद्यालयाचे वेगळेपण नवी दिशा देईल. प्रत्येकाला या सर्व शाळांतील वेगळेपणाशी तुलना करून आपल्या शाळेचे मूल्यमापन करता येईल; असे म्हटले अतिशय अभ्यासपूर्ण नोंदी देत त्यांनी या पुस्तकाची मांडणी केली.

'वय झाल्यावर' पुस्तकाविषयी मांडणी करताना वृद्धत्वच्या

भावनिक बाजूवर हे पुस्तक विचार मांडते असेही सांगितले. वय आणि माणूस यांच नात कसं असावं हेही त्यांनी स्पष्ट वृद्धत्वाची आर्थिक नियोजनाची बाजू, सामाजिक स्थान, पिढीतले अंतर यापेक्षा दोन पिढ्यांचे संबध कसे असावेत, निवृत्ती म्हणजे काय, स्वीकार आणि तटस्थता म्हणजे काय याची मांडणी हे पुस्तक करते असे त्या म्हणाल्या.

सोनाली कुलकर्णी पुस्तकाबद्दल बोलताना म्हणाल्या काही पुस्तकाची चीड येते; दुःख मांडून काय साध्य होणार? पण रेणूताईंचे हे पुस्तक वाचताना, मला माझे जुने मन मिळाले. या पुस्तकात कुठेच रेणूताईंनी मी किती भाग्यवान, मी किती मोठी आहे याचा उल्लेख केला नाही. आत्मसंवादात खंत मांडली जाते. ती बोचरी होऊ शकते पण हे पुस्तक स्वतःशीच संवाद करत पुढे जाते. ही एका शिक्षिकेची आनंदयात्रा आहे. त्यात सहजता, साधेपणा आहे. या पुस्तकातील अनेक संदर्भ देत त्यांनी 'प्रिय प्रतिमास रेणूकडून' हे पुस्तक आवडल्याचे व्यक्त केले.

अविनाश धर्माधिकारी यांनी 'वय झाल्यावर', 'सृजनाच्या नव्या वाटा' यांचा संदर्भ घेत 'प्रिय प्रतिमास रेणूकडून' या पुस्तकाविषयी बोलायला सुरुवात केली. सामाजिक कामात किती झोकून द्यावं लागत याची मांडणी करत; चिखलगावला सुरू असलेल्या कामाविषयी आपण साक्षीदार आहोत असे ते म्हणाले राजा बरोबर रेणूचे नाव येते नि रेणू बरोबर राजाचे नाव येत असे; हे सांगत माराठीतील अनेक आत्माचारित्रांचा संदर्भ देत पती–पत्नीमधील तणावाचे मर्मभेदक विवेचन केले. यात पु.ल. देशपांडे यांच्या पत्नीने लेहिलेल्या मंगेश पाडगावकर यांच्या पत्नीने लिहिलेल्या आत्मचरित्राचा वेगळा संदर्भ दिला. या आत्मकथनाबाद्दल बोलताना ते म्हणाले हे आत्मकथन न वाचताना माझ्या पोटात खूप मोठा खड्डा, पडला डोळ्यांत पाणी आलं.

शेवटी रेणू दांडेकर यांनी कृतज्ञाता व्यक्त केली. आयुष्यात फक्त चांगलीच माणसं भेटत गेल्याने ही रेणू घडली, शिकती झाली नि ही आनंदयात्रा घडली, असे त्या म्हणाल्या.

कैवल्य दांडेकर यांनी यावेळी आई कधी कळलीच नाही ही कविता वाचून दाखवली सभागृहात आलेला गंभीरपणा आपल्या खुमासदार शैलीने हसरा केला.

## 'नीलमोहर'ची कविता सर्वस्पर्शी - कमलाकर देसले



'नीलमोहर' काव्यसंग्रह प्रकाशनसमयी मान्यवर

'नीलमोहर या काव्यसंग्रहातील कविता केवळ स्त्रीवादी नाही, तर ती जीवनाच्या सर्वांगांना स्पर्श करते. या कवितेची जातकुळी ही ज्ञानेश्वरीशी नाते सांगणारी आहे, म्हणून तिचे मोल मोठे आहे,' असे प्रतिपादन कविवर्य कमलाकर आबा देसले यांनी केले.

सा.वा.ना.च्या मु.शं. औरंगाबादकर सभागृहात 'नीलमोहर' या जयश्री वाघ यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन नुकतेच संपन्न झाले. या प्रसंगी कवी कमलाकर देसले, कवी संजय चौधरी, सा.वा.ना.चे जयप्रकाशजी जातेगांवकर, डॉ. शंकर बोऱ्हाडे, ज्येष्ठ कवी संतोष हुदलीकर आणि ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

'नीलमोहर संग्रहातील कविता कवयित्रीच्या समस्त अनुभवांची आहे. ती अंतर्मुख करते, मनाचा तळ ढवळते. स्त्री कवयित्रींची परंपरा समृद्ध करणारी कविता जयश्री वाघ यांनी ताकदीने लिहिली आहे.' असे प्रतिपादन कवी संजय चौधरी यांनी केले.

प्रास्ताविक कवी विवेक उगलमुगले यांनी केले, युवा गझलकार संजय गोरडे आणि आकाश कंकाळ यांनी जयश्री वाघ यांच्या निवडक गझलांचे वाचन केले. मराठी विश्वकोश मंडळाच्या सदस्या मनीषा उगले यांनी 'नीलमोहर'चे वेगळेपण आणि त्यातील आशय उलगडला.

जयप्रकाश जातेगावकर आणि शंकर बोऱ्हाडे यांनी आपल्या मनोगतात कवयित्रीला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास नाशिक व परिसरातील अनेक मान्यवर आवर्जून उपस्थित होते.

कार्यक्रमांचे सूत्रसंचालन कवी राजेंद्र उगले यांनी केले, तर आभार मुकुंद ताकाटे यांनी मानले.

# ‘हॅश टॅग  कविता’ या काव्यसंग्रहाचे प्रकाशन



**‘हॅश टॅग # कविता’ प्रकाशनसमयी डॉ. संतोष पाठारे, नाटककार रवींद्र भगवते, अभिनेत्री संपदा जोगळेकर-कुळकर्णी, नाटककार रवींद्र लाखे, कवी अशोक नायगावकर, कवी अशोक बागवे, गीतकार अश्विनी शेंडे, सुदेश हिंगलासपूरकर, विजयराज बोधनकर आणि कॅप्टन वैभव दळवी**

‘हॅश टॅग # कविता’ या अनोख्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ११ डिसेंबर २०२१ रोजी ठाण्याच्या मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात करण्यात आले.

‘हॅश टॅग # कविता’ या कवितासंग्रहात कॅप्टन वैभव दळवी, चित्रकार विजयराज बोधनकर, चित्रपट समीक्षक डॉ. संतोष पाठारे आणि नाटककार रवींद्र भगवते या वेगवेगळ्या क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्या चार जणांनी लिहिलेल्या कविता  दिग्दर्शक-अभिनेत्री-लेखिका संपदा जोगळेकर-कुळकर्णी यांनी संपादित केल्या आहेत.


ठाणे आर्ट गिल्ड या संस्थेचे सदस्य असलेल्या या कविमित्रांना एकत्र आणून त्यांच्या कवितांचे संपादन करण्याची कल्पना संपदा जोगळेकर-कुळकर्णी यांना त्याच्या ‘चार सख्य चोवीस’ या कथासंग्रहाच्या निर्मितीमधून सुचली. या कवितासंग्रहाचे एक वैशिष्ट्य म्हणजे, प्रत्येक कवीने आपल्या अनुभवविश्वातून स्फुरलेल्या कवितांच्या बरोबरीने संपदा जोगळेकर-कुळकर्णी यांनी दिलेल्या चित्रावर एक कविता लिहिली आहे. प्रत्येक कवीच्या पंचवीस कवितांचा समावेश या काव्यसंग्रहात करण्यात आलेला आहे आणि कवितेचा भावार्थ सूचित करणारी चित्ररेखाटने विजयराज बोधनकर यांनी काढली आहेत.

या कवितासंग्रहाला ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांची प्रस्तावना लाभली आहे. या चारही कवींच्या कवितांमधील सौंदर्यस्थळे त्यांनी आपल्या प्रस्तावनेमध्ये उलगडून सांगितली आहेत. कवींना पुढील लिखाणासाठी शुभेच्छा देताना, ‘सभोवताली आव्हान देणारं खूप नवं नवं आहे, ते तुम्ही तुमच्या कवितांमधून शब्दबद्ध करा’ अशी अपेक्षासुद्धा त्यांनी व्यक्त केली आहे.

कवितासंग्रहाच्या प्रकाशनसोहळ्यात कवी अशोक नायगावकर हे अध्यक्षस्थानी होते. कवी अशोक बागवे, नाटककार-कवी रवींद्र लाखे आणि गीतकार अश्विनी शेंडे हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी ‘ग्रंथाली’च्या सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रकाशक म्हणून मनोगत व्यक्त केले. अश्विनी शेंडे यांनी कवितासंग्रहातील त्यांना भावलेल्या कवितांचे रसग्रहण केले. रवींद्र लाखे यांनी कविता या साहित्यप्रकारचे रसिकांच्या भावविश्वातील महत्त्व विषद केले. अशोक बागवे यांनी प्राचीन ते अर्वाचीन कवींच्या कवितेतून आलेलं समाजभान उपस्थितांना समजावून सांगितलं. अशोक नायगावकर यांनी ‘कवी ही मोठी पदवी आहे, ती बाळगणाऱ्या व्यक्तीनं जबाबदारीनं वागलं पाहिजे,’ असा मोलाचा सल्ला दिला.

या प्रकाशनसोहळ्याला अनेक मान्यवर रसिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृंदा दाभोलकर यांनी केले. सरस्वतीवंदना आणि पसायदान यांचे गायन अमृता दीक्षित यांनी केले.


॥ग्रंथाली॥




**उमलावे आतुनीच...**

**प्रतिभा सराफ**

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

**हॅश टॅग # कविता**

**वैभव दळवी**
**विजयराज बोधनकर**
**संतोष पाठारे**
**रवींद्र भगवते**


**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**





'मालवणी बोलीभाषेतील वाक्प्रचार आणि हुमाणी' या विद्या प्रभू लिखित पुस्तकाला ठाणे संग्रहालयचा ललितेतर वाङ्मय पुरस्कार  प्राप्त झाला. त्या समारंभात प्रकाशक म्हणून 'ग्रंथाली'ला देण्यात आलेला कै. वामन अनंत रेगे यांच्या स्मरणार्थ पुरस्कार संजय कृष्णाजी पाटील यांच्या हस्ते स्वीकारताना सुदेश हिंगलासपूरकर

## *ग्रंथालीच्या 'नाही गिरवता येत कुठलीच लिपी' या काव्यसंग्रह प्रकाशन*




**'नाही गिरवता येत कुठलीच लिपी' या काव्यसंग्रह प्रकाशनसमयी सूत्रसंचालन बापूसाहेब दळवे, डॉ. प्रमोद पाटील, शिरीष घाटे, सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. महेंद्र कदम, अंजली कुलकर्णी, लेखिका डॉ स्मिता पाटील आणि पद्माकर कुलकर्णी**

''समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या स्त्रियांवरील बंधनाचा वेध घेत स्त्रीजीवनाच्या प्रतिमांतून स्मिता पाटील यांच्या कवितेत स्त्रीचा समर्पित आशावाद प्रकट होतो. खेडी ओस पडताना, शेतकरी आत्महत्या करताना अनेक संवेदनशील विषय त्यांच्या कवितेतून येतात ही खरी कवीच्या संवेदनशीलतेची बाब वाचकांच्या समोर येते.'' असे प्रतिपादन प्राचार्य महेंद्र कदम यांनी केले. डॉ.स्मिता पाटील लिखित 'नाही गिरवता येत कुठलीच लिपी' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन प्रसंगी बोलत होते. सोलापूरच्या हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या  एमफी थिएटर येथे झालेल्या, ग्रंथाली आणि पाटील परिवार आयोजित प्रकाशन सोहळ्यात सोहळ्यात मंचावर कवयित्री अंजली कुलकर्णी, ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर, चित्रकार शिरीष घाटे आदी मान्यवर उपस्थित होते.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक पद्माकर कुलकर्णी यांनी केले. त्यांनी स्मिता पाटील यांच्या साहित्यसेवेचा प्रवास उलगडून दाखवला. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार पाटील परिवारांच्या वतीने झाला. कवयित्री स्मिता पाटील यांनी आपल्या कविता लेखनामागील उद्देश आणि स्त्रियांच्या जगण्याचे प्रश्न कसे भेडसावत गेले त्यातून या कवितेचा जन्म कसा झाला याचे विवेचन केले. त्यानंतर कवयित्री अंजली कुलकर्णी यांनी स्त्री-जीवनातील प्रतिमांचा योग्य वापर करत वास्तवतेचा आणि आजूबाजूच्या परिस्थितीचा साकल्याने कसा विचार केला आहे हे प्रतिपादित करत आपलं अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि साहित्य रसिक उपस्थित होते. बापूसाहेब दळवे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. प्रमोद पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

# ग्रंथालीच्या संजय चौधरी लिखित दोन काव्यसंग्रहांचे प्रकाशन



**अखिल भारतीय साहित्य संमेलन, नाशिक येथे ग्रंथाली प्रकाशनाच्या स्टॉलवर संजय चौधरी यांच्या 'आतल्या विस्तवाच्या कविता' आणि 'माझं इवलं हस्ताक्षर'च्या तिसऱ्या आवृत्ती चे प्रकाशन करण्यात आले. सुप्रसिद्ध कवयित्री अनुराधा पाटील, कौतिकराव पाटील, अरुण म्हात्रे, शंकर बोराडे, मनिषा चौधरी आणि कवी संजय चौधरी यावेळी उपस्थित होते.**



नाशिक येथे संपन्न झालेल्या ९४ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात ग्रंथाली प्रकाशनाच्या स्टाल वर कवी संजय चौधरी यांच्या आतल्या विस्तवाच्या कविता या ग्रंथाली प्रकाशन, मुंबई यांनी प्रकाशित केलेल्या तिसऱ्या कवितासंग्रहात प्रकाशन साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या सुप्रसिद्ध कवयित्री अनुराधा पाटील यांच्या हस्ते संपन्न आले. यावेळी अनुराधा पाटील म्हणाल्या की, संजय चौधरीची या आधीची कविता मी वाचली असून गेल्या वीस पंचवीस वर्षांपासून संजय चौधरी निष्ठेने कविता लेखन करीत आहे. माझं इवलं हस्ताक्षर आणि कविताच माझी कबर या दोन्ही संग्रहाचे रसिकांनी चांगलेच स्वागत केले असून दोन्हीही कवितासंग्रहाना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांची कविता मला आवडते म्हणून मी या प्रकाशनाचे निमंत्रण स्वीकारले आहे. हा संग्रह मला आजच मिळालं असून कवितासंग्रह वाचून मी त्याच्याविषयी नंतर सविस्तर बोलेन. तसेच माझं इवलं हस्ताक्षर या संग्रहाच्या तिसऱ्या आवृत्ती चे ही प्रकाशन यावेळी कवी अरुण म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. अरुण म्हात्रे म्हणाले की, संजय ची कविता ही रसिक मान्य कविता असून त्याच्या कितीतरी कविता लोकांच्या ओठांवर आहेत. दागिना, पाऊस, गंगेवरची म्हातारी, सूर्यदुःख, मुलींच्या कविता या त्यांच्या कविता विशेष गाजल्या आहेत,

आभाराचा भार कशाला ?
अता फुलांचे हार कशाला !
हृदयामध्ये घर बांधू नका या
अशा घराला दार कशाला ?

ही कविता तर महाराष्ट्रात सगळीकडे म्हटली जाते. कवी संजय चौधरी यांनी ही यावेळी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, मी आतून येणारी कविता कागदावर उतरवत असतो. माझ्या रक्तात वाहणारी जी कविता आहे तिला मी रसिकांच्या हवाली करतो. माझी कविता नेहमीच आपल्या ऋणात राहील. रसिकांच्या प्रतिक्रिया, दिलखुलास दाद नव्या कवितलेखनासाठी प्राणवायू असतात. यावेळी त्यांनी ग्रंथाली प्रकाशनाचे आणि सुदेश हिंगलाजपुरकर यांचे विशेष आभार मानले. या आधीचे माझं इवलं हस्ताक्षर आणि कविताच ... माझी कबर हे कवितासंग्रह ग्रंथाली नेच प्रकाशित केले आहेत.


प्रकाशन प्रसंगी ग्रंथाली प्रकाशनाचे श्री.दिनकर गांगल, सुदेश हिंगलाजपुरकर, अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे कौतिकराव ठाले पाटील, सार्वजनिक वाचनालय नाशिकचे कार्यवाह शंकर बोऱ्हाडे, मनीषा संजय चौधरी तसेच मोठ्या संख्येने साहित्य रसिक उपस्थित होते. या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन मोठ्या उत्साहात आणि आनंदात पर पडले.














# ग्रंथालीच्या गेल्या दोन वर्षांतील नवी ९४ पुस्तके

२. **आनंदयात्री – पोलीस अधिकाऱ्याची डायरी** । जयंत नाईकनवरे, आय.पी.एस. । **मूल्य २०० रुपये**
४. **यशप्राप्तीचं रहस्य** । डॉ. प्रेमानंद रामाणी । **मूल्य २०० रुपये**
५. **जगावेगळी माणसं** । रमेश वाघमारे । **मूल्य ३५० रुपये**
६. **शिकणारी शाळा 'अभि'रंग** । संपादन : वैशाली रोडे । **मूल्य ३५० रुपये**
७. **शिकणारी शाळा बालरंग** । संपादन : वैशाली रोडे । **मूल्य ३०० रुपये**
८. **प्रेमसेतू** । संदीप रामराव काळे । **मूल्य २५० रुपये**
९. **यशपुष्प** । डॉ. आशुतोष रारावीकर । **मूल्य २०० रुपये**
१०. **छपाई ते लेखणी** । यशवंत मराठे । **मूल्य २०० रुपये**
११. **कार्पोरेट कविता** । प्रथमेश किशोर पाठक । **मूल्य १५० रुपये**
१२. **स्वरमंजूषा** । योजना शिवानंद । **मूल्य २०० रुपये**
१३. **आस** । अपर्णा महाजन । **मूल्य २०० रुपये**
१४. **माध्यमयात्रेतील माणसं** । रविराज गंधे । **मूल्य २०० रुपये**
१५. **नाटक एक मुक्त चिंतन** । रवीन्द्र दामोदर लाखे । **मूल्य १५० रुपये**
१६. **नोबेलनगरी २०२० – NOBELNAGARI** । सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते । **मूल्य १०० रुपये**
१७. **टपालकी** । सॅबी परेरा । **मूल्य २५० रुपये**
१८. **ठोंब्या, टकलू अंकल आणि इतर कथा** । आबा गोविंदा महाजन । **मूल्य ३० रुपये**
१९. **व्यासंग आणि विचार** । संकलन धनंजय गांगल, अरुण जोशी । **मूल्य १५० रुपये**
२०. **वर्तमानाच्या लिपीत** (कवितासंग्रह) । प्रशांत भरवीरकर । **मूल्य १२५ रुपये**
२१. **माझ्या दृष्टांताची दृश्ये** (गझलसंग्रह) । चंद्रशेखर सानेकर । **मूल्य १५० रुपये**
२२. **गझलच्या उजेडात गझल** । चंद्रशेखर सानेकर । **मूल्य २५० रुपये**
२३. **चंबुखडी ड्रीम्स** । डॉ. जगन्नाथ पाटील । **मूल्य ३५० रुपये**
२४. **काव्याञ्जलि** । उमाशंकर श्रीवास्तव । **मूल्य १०० रुपये**
२५. **उच्छ्वास** । उमाशंकर श्रीवास्तव, माया श्रीवास्तव । **मूल्य २०० रुपये**
२६. **शरदाचे चांदणे** – श्रेष्ठ गायक पं. शरद साठे यांच्याविषयी... । **स्मिता महाजन** । मूल्य ४०० रुपये
२७. **वादळवाट** । एम.डी. देशमुख । **मूल्य ४०० रुपये**
२८. **अभ्युदय** । प्र.के. वकारे । **मूल्य २०० रुपये**
२९. **कबीराच्या कविता – रवींद्रनाथ टागोर** । अनुवाद शर्मिला प्रभुणे । **मूल्य १५० रुपये**
३०. **प्रभु अजि गमला** । डॉ. स्मिता निखिल दातार । **मूल्य ४०० रुपये**
३१. **आत्मभान** । गो.श्री. पंतबाळेकुंद्री । **मूल्य २०० रुपये**
३२. **सोलो** । सोनाली लोहार । **मूल्य १५० रुपये**
३३. **सहा दशकांची पत्रकारिता** । वसंत वासुदेव देशपांडे । **मूल्य २५० रुपये**
३४. **एकला चलो रे!** । बी.जी. वाघ । **मूल्य ३५० रुपये**
३५. **व्हिस्कीत बर्फ वितळावा** । सदानंद डबीर । **मूल्य १२५ रुपये**
३६. **हस्तसंवाद** । देवेंद्र पाटील । **मूल्य ३५० रुपये**
३७. **नाट्यविचार** । डॉ. अनंत देशमुख । **मूल्य १५० रुपये**
३८. **नाट्यसमीक्षा** । डॉ. अनंत देशमुख । **मूल्य ५०० रुपये**
३९. **ओंजळभर शिंपले** । शशिकांत जागीरदार । **मूल्य ३०० रुपये**
४०. **जाना कुमारी** । रेमंड मच्याडो । **मूल्य ३०० रुपये**
४१. **करोनांगुली** । विवेक मोहन गद्रे । **मूल्य १५० रुपये**
४२. **पेव्हरब्लॉक** । मिलिंद बल्लाळ । **मूल्य १५० रुपये**
४३. **शब्द जायबंदी होण्याचे दिवस** । योगिनी सातारकर-पांडे । **मूल्य १५० रुपये**






















४४. **प्राजक्तप्रभा** । प्राजक्ता माळी । **मूल्य १०० रुपये**
४५. **Shoots & Roots** । **Dr. Hema Purandarey** । **मूल्य ४०० रुपये**
४६. **चुटकीभर गंमत** । डॉ. मृण्मयी भजक । **मूल्य २०० रुपये**
४७. **लाजवाब** । ज्योती दाते । **मूल्य ४०० रुपये**
४८. **गणित अध्यापक आणि प्रसारक स.पां. देशपांडे** । संपादक-अ.पां. देशपांडे । **मूल्य ४०० रुपये**
४९. **मनाशी संवाद** । अनिरुद्ध जाधव । **मूल्य ३५० रुपये**
५०. **राजा कालस्य कारणम्** । बा.ग. केसकर । **मूल्य २५० रुपये**
५१. **भारतीय अध्यात्मशास्त्र गीता आणि विपश्यना** । जनार्दन शां. संखे । **मूल्य २५० रुपये**
५२. **अशक्य ते शक्य... कारगिल संघर्ष** । अनुराधा विष्णू गोरे । **मूल्य ४५० रुपये**
५३. **आम्ही अशा वेगळ्या** । अनुराधा विष्णू गोरे । **मूल्य १५० रुपये**
५४. **आठवणी दाटतात** । अनुराधा विष्णू गोरे । **मूल्य १५० रुपये**
५५. **नाटक : काही निरीक्षणे, काही परीक्षणे** । प्र.ना. परांजपे । **मूल्य ३५० रुपये**
५६. **अक्षरयात्रा** । डॉ. प्रियदर्शन मनोहर । **मूल्य २५० रुपये**
५७. **राहा फिट** । डॉ. अविनाश सुपे । **मूल्य ३०० रुपये**
५८. **'सर्जन'शील** । डॉ. अविनाश सुपे । **मूल्य ३५० रुपये**
५९. **तरंग भवतालचे** । विनता कुलकर्णी । **मूल्य २०० रुपये**
६०. **चिंतन** । शरद काळे । **मूल्य ६०० रुपये**
६१. **विज्ञान-तंत्रज्ञानात हीरकमहोत्सवी महाराष्ट्र** । संपादक : विवेक पाटकर, हेमचंद्र प्रधान । **मूल्य ७५० रुपये**
६२. **कोरोनाचा कहर - सामाजिक भान आणि प्रतिक्रिया** । डॉ. पी.एस. रामाणी । **मूल्य १५० रुपये**
६३. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे दलितेतर सहकारी (भाग-२)** । योगीराज बागूल । **मूल्य ४०० रुपये**
६४. **टेल्को ते टेक्सास** । चंद्रकांत राणे । **मूल्य ३५० रुपये**
६५. **आकाशवीणा** । वीणा आशुतोष रारावीकर । **मूल्य १०० रुपये**
६६. **परक्या मातीत रुजताना** (कथासंग्रह) । उषा तांबे । **मूल्य २०० रुपये**
६७. **नाही गिरवता येत कुठलीच लिपी** । डॉ. स्मिता पाटील । **मूल्य १५० रुपये**
६८. **वाळूत उमटलेले ठसे** । अर्चना जगदीश । **मूल्य २०० रुपये**
६९. **प्रिय प्रतिमास, रेणूकडून** । रेणू दांडेकर । **मूल्य ३०० रुपये**
७०. **सृजनाच्या नव्या वाटा** । रेणू दांडेकर । **मूल्य २०० रुपये**
७१. **वय झाल्यावर... (वृद्धत्वाकडे बघण्याचा वेगळा दृष्टिकोन)** । रेणू दांडेकर । **मूल्य १५० रुपये**
७२. **माझ्या मराठीचा बोल** । अरुण साधू । **मूल्य १२५ रुपये**
७३. **मोइ कुन? आमी कुन? - एनआरसी आणि आसामी जगण्याचा अस्वस्थ शोध** । मेघना ढोके। **मूल्य २०० रुपये**
७४. **पोर'पॉर्न'खेळ - पोर्नोग्राफी आणि गेमिंगचा चक्रव्यूह** । मुक्ता चैतन्य । **मूल्य २०० रुपये**
७५. **ऐसे नको गोरक्षण... - गोवंश हत्याबंदी कायद्याचा शेतकऱ्यांवरील परिणाम** । दत्ता जाधव । **मूल्य २०० रुपये**
७६. **हमारी याद आएगी** । कुमार सोहोनी । **मूल्य २५० रुपये**
७७. **रोजीरोटी** । विलास कसबे । **मूल्य ५० रुपये**
७८. **मंत्रमुग्धा** । डॉ. शुभा चिटणीस, अशोक चिटणीस । **मूल्य २५० रुपये**
७९. **मदतनीसनामा** । ॲड. राजेश बेहेरे । **मूल्य १०० रुपये**
८०. **साडी गं साडी** । ज्योती रत्नपारखी-वालझाडे । **मूल्य ४०० रुपये**
८१. **कल्चरली करेक्ट** । संपादन : संदीप वारंग-वंदना महाजन । **मूल्य ४०० रुपये**
८२. **उभारणी** । भगवान इंगळे । **मूल्य ३०० रुपये**
८३. **कितीदा नव्याने तुला आठवावे** । संकल्पना : मंदार आपटे, शब्दांकन : श्रेयसी वझे-मत्रवादी। **मूल्य ४०० रुपये**
८४. **आतल्या विस्तवाच्या कविता** । संजय चौधरी । **मूल्य १५० रुपये**
८५. **माझं इवलं हस्ताक्षर** । संजय चौधरी । **मूल्य १०० रुपये**
८६. **कर्मवीर भाऊसाहेब हिरे** । ज्योत्स्ना सोनसाखळकर । **मूल्य ४०० रुपये**
८७. **पुन्हा संगमी... संध्याकाळी**। रामचंद्र कुलकर्णी। **मूल्य ५० रुपये**

















८८. **थेंबांनी विणली नक्षी**। मोहन काळे । **मूल्य १०० रुपये**
८९. **कृष्णेचे पाणी** । श्रीकृष्ण शिदोरे । **मूल्य ४०० रुपये**
९०. **सागरात हिमशिखरे** । मेधा आलकरी । **मूल्य ३०० रुपये**
९१. **लोकमान्य टिळक घरातले आणि जनमानसातले** । डॉ. उज्ज्वला मेहेंदळे। **मूल्य ३०० रुपये**
९२. **नीलमोहोर** । जयश्री वाघ। **मूल्य १५० रुपये**
९३. **ती अजूनही जळत आहे** । राजश्री पाटील । **मूल्य १५० रुपये**
९४. **दिसांमाजी** । प्रशांत भरवीरकर । **मूल्य २०० रुपये**
९५. **अंतरंगातील भावनांचे ललित चित्रण भावतरंग** । सुषमा शाळिग्राम। **मूल्य २०० रुपये**
९६. **चाकोरी मोडणारे पुरुष** । हरीश सदानी । **मूल्य १५० रुपये**
९७. **चिंतन–भाग २** । शरद काळे। **मूल्य ७५० रुपये**
९८. **विज्ञानाच्या पाऊलखुणा** । शरद काळे। **मूल्य ४०० रुपये**
९९. **पटावरच्या सोंगट्या**। चांगदेव काळे। **मूल्य २५० रुपये**
१००. **कपडे वाळत घालणारी बाई** । हर्षदा सुंठणकर । **मूल्य १५० रुपये**
१०१. **लाल दिव्यांची वस्ती आणि निष्पाप बालपण** । डॉ. राणी खेडीकर । **मूल्य १५० रुपये**
१०२. **सरकते आहे वाळू** । ॲड. लखनसिंह कटरे । **मूल्य १०० रुपये**
१०३. **ओ.एन.जी.सी.तील दिवस** । काशीनाथ भावे । **मूल्य १०० रुपये**
१०४. **नोबेलनगरी २०२१** । सुधीर थत्ते–नंदिनी थत्ते । **मूल्य १०० रुपये**
१०५. **रंगभूमीचे सौंदर्यशास्त्र** । अनुवाद – डॉ. वसुधा सहस्रबुद्धे । **मूल्य २५० रुपये**
१०६. **उमलावे आतुनीच...**। प्रतिभा सराफ । **मूल्य २०० रुपये**

# ग्रंथाली


## माय मराठी – My Marathi

**मराठी शिकवणारे सुलभ मार्गदर्शन**

मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने तयार केलेला,
ग्रंथालीने प्रकाशित केलेला एक अपूर्व अभ्यासक्रम

एकात्मिक संभाषणात्मक पद्धतीने पद्धतशीर
मराठी शिकू इच्छिणाऱ्या अमराठींसाठी.

'माय मराठी'च्या एका संचात
पाठ्यपुस्तक, अभ्यासपुस्तिका आणि
विनामूल्य दृक्श्राव्य डीव्हीडी यांचा समावेश आहे.




मूल्य ~~रु.१२५०~~ १००० रुपये फक्त

| प्रकल्प समन्वयक | लेखक |
|---|---|
| विभा सुराणा | सुहास लिमये |
| दीपक पवार | जयवंत चुनेकर |

**टपालखर्च १०० रु.**



## शब्द रुची

**संपर्काचे मासिक माध्यम**

**वार्षिक वर्गणी**

**३०० रुपये**

**इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर... मराठीत प्रथमच**




**संकल्पनाकोश (खंड १ ते ५) – सुरेश वाघे**

विषय : धर्म, काळ, विश्व, प्राणी, वनस्पती • मानवी शरीर व जीवनावस्था, कुटुंबसंस्था
• नागरिक जीवन • गुणावगुण • मन व स्वभाव, ललितकला

**मूळ किंमत ३२०० रुपये • सवलतीत २४०० रुपये • टपालखर्च १५० रु.**

॥ग्रंथाली॥

## गुलज़ार यांचा बोस्की संच : ९ पुस्तके





















**९ पुस्तकांच्या संचाची मूळ किंमत १००० रुपये । सवलतीत ६०० रुपये**

---

***महाराष्ट्राच्या हीरकमहोत्सवी वाटचालीत विज्ञान, भाषा, साहित्य आणि संस्कृती या क्षेत्रांतील कामगिरीचा मागोवा घेणारे तीन संग्राह्य खंड***

**लवकरच प्रसिद्ध होत आहेत**





संपादक

**विवेक पाटकर**

**हेमचंद्र प्रधान**

**मूल्य ७५० रु.**

**सवलतीत ५०० रु.**





संपादन

**रमेश अंधारे**

**मूल्य १५०० रु.**

**सवलतीत १००० रु.**




संपादन

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**

**डॉ. अजय देशपांडे**

**मूल्य ७५० रु.**

**सवलतीत ५०० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**वय झाल्यावर**

**रेणू दांडेकर**




**आपणच आपल्याकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहायला हवे**

*'' 'जग ही एक रंगभूमी आहे' असं वाक्य निबंधात लिहिलं होतं. छान वाटलं. नंतर 'घर ही एक रंगभूमी आहे' असं एक दिवस वाटलं. विचार करू लागले नि खरंच पटू लागले. एका लहानशा मुलापासून आजीपर्यंत नि एका लहानशा मुलापासून आजोबापर्यंत भूमिका बदलत गेल्या. यात नावंही वेगवेगळी मिळत गेली भूमिकांप्रमाणे! शेवटी आजी-आजोबा ही भूमिका होती. आधीच्या भूमिका भराभर आपोआप साकार होतात. ही भूमिका अशी असते की यानंतर कोणतीच भूमिका नाही.''*

'वय झाल्यावर' या शीर्षकाचे हे रेणू दांडेकर यांचे पुस्तक. वय ही यातली मध्यवर्ती कल्पना. साधारण वयाचे जे टप्पे आपण करतो ते बालाश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम. अलीकडच्या काळात विशेषत: विचार करायचा झाल्यास शेवटच्या दोन आश्रमांशी संबंधित असलेल्या वयाचा करावा लागतो, जो पन्नाशीनंतर सुरू होतो. अगोदरचा कालखंड शिक्षण, नोकरी, जबाबदारी यांच्या फेऱ्यांत कुठल्या कुठे पिळवटून जातो. बर्फाच्या वितळण्यासारखा तो कळतही नाही. भान येते पन्नाशीच्या उंबरठ्यावर उभे राहिल्यानंतर, याचे कारण या टप्प्यावर जबाबदाऱ्यांची ओझी शिरावरून उतरलेली असतात. प्रापंचिक दगदग ओसरलेली असते, ज्यांच्या भवितव्याची काळजी करायची ती मुले-मुली आपापल्या पायांवर उभी राहिलेली असतात. काही करायचे राहिले आहे, कुणी आपल्यावर अवलंबून आहे, याची यादी करण्याची गरज संपलेली असते. त्यातून दिसू लागते एक वेगळेच विश्व ज्याचा विचार सुरू होतो, आता काय?

प्रत्येकाच्या आयुष्यात हा टप्पा येतो. तिथून वेगळ्या आयुष्याची सुरुवात होते; ज्याला लेखिकेने नाव दिले आहे, उत्तरायणाचा प्रारंभ. वयाच्या पन्नाशीत आल्यानंतर, निवृत्तीचा क्षितिजावर जेव्हा संध्याछायेची तांबूस आभा गडद होऊ लागते तेव्हा मागे पाहण्याचे दिवस मागे पडलेले असतात, ज्याला भूतकाळ म्हणायचा तो आता वर्तमान म्हणून समोर उभा राहतो, एक नवा प्रारंभ तिथून सुरू होतो. यात पुरुष आणि स्त्री यांच्यासमोर वेगवेगळे प्रश्न, समस्या, पोकळी, एकटेपण, दुर्लक्षितपण उभे राहते. याबाबत लेखिका स्पष्ट करतात, नोकरीत निवृत्तीचे वय आहे. शारीरिक-बौद्धिक क्षमतेचे निकष तिथे लावले जातात आणि त्यानुसार काम करणारी व्यक्ती ठरावीक वयानंतर आयुष्यभर जे काम करीत आली तिच्यासाठी निरूपयोगी ठरते. परंतु ही मंडळी स्वत:चा व्यवसाय करतात, ती कधीच निवृत्त होत नाहीत, उलट ती सतत नवनवीन कल्पना अमलात आणून आपला व्यवसाय वृद्धिंगत करताना दिसतात. त्यांच्या अनुभवाचा फायदा ते व्यवसायासाठी करतात. मग नोकरीतली व्यक्तीच कशी अकार्यक्षम ठरते?

वय झालेल्या व्यक्तीसमोर निरूद्योगी असताना वेळ कसा घालवायचा हा सगळ्यात मोठा प्रश्न असतो. त्यानंतर दुसरा प्रश्न असतो आरोग्याचा. वयानुसार आरोग्याच्या तक्रारी येणे यात नवीन काही नाही, परंतु या येणाऱ्या पाहुण्याची अपेक्षा केलेली नसते, त्याच्या स्वरूपाची कल्पना नसते, त्यामुळे हा पाहुणा भीतिदायक ठरतो आणि त्याची सोबत कायम राहणारी असेल तर कोलमडून पडण्याला पर्याय ठरत नाही. तीच अवस्था आजाराची. घरात आता आपली कुणाला गरज राहिलेली नाही, कुणी आपल्याकडे लक्ष देत नाही ही एकटेपणाची समस्या तितकीच जीवघेणी ठरणारी असते. समस्या, प्रश्न सगळीकडेच असतात. त्यावर उपाय शोधणेही आपल्याच हातात असते. त्यासाठी गरज असते ती काही नियम, शिस्त अंगीकारण्याची. स्वत:ला समजून घेण्याची आणि स्वत:च स्वत:ची समजूत घालण्याची. ती कशी, याचे उत्तर लेखिका या पुस्तकातून समोर ठेवतात. हे उत्तर केवळ वय झालेल्या व्यक्तीशी निगडित आहे. मात्र त्याकडे लक्ष द्यायचे आहे ते कुटुंबातील प्रत्येकाने. हे वृद्धत्व म्हणजे दुसरे बालपण आहे, हे बालपण सांभाळणे कठीण आहे, ते सोपे आहे. फक्त त्यासाठी आवश्यक आहे तो आपलेपणाने माखलेला सकारात्मक विचार!

या पुस्तकात एकूण एकवीस लेख आहेत. ते 'वय झाल्यावर' या विषयावरील सर्वांगीण विचारांचे धन घेऊन आलेले आहेत. 'पन्नाशीनंतर' ह्या शब्दाभोवती असलेले विविध विषय तक्त्याच्या स्वरूपात दिलेले आहेत. सूर्याचे फाकलेले किरण दाखवावेत तसे. व्याधीचा विचार करण्यापेक्षा उपायांचा विचार अधिक उपयुक्त आणि प्रभावी ठरू शकतो. म्हणून लेखिकेने प्रत्येक लेखात त्यांची मात्रा कशी असावी याचे विवेचन केले आहे. बहिणाबाई, तुकाराम, संस्कृत श्लोक यांचे उचित संदर्भ दिलेले आहेत. आपल्याला जे मांडायचे आहे ते सहज आणि सुलभतेने व्यक्त केले, त्यात उपदेशाचा हेतू न ठेवता समजूतदारपणाच्या चार गोष्टी असा आपलेपणाचा भाव ठेवला तर ते लेखन आपलेपणाशी नाते तयार करते, भावते. तसे हे भावणारे ललितलेख आहेत. लेखिकेची यातली भूमिका 'अभिभावका'ची आहे. त्यात अनेक अनुभव इतरांचे आहते तसे स्वत:च्या अनुभवांची त्याला जोड दिलेली आहे. यातले सौंदर्यदेखील मनाला सहज साद घालणारे आहे. 'माझा आनंद दुसऱ्यांच्या दु:खास कारणीभूत नको व्हायला', 'पन्नाशीनंतर आपलाच आपल्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत नाही तर सगळेच आपल्याकडे वेगळ्या नजरियाने बघू लागतात.' 'सगळ्या आजारांना ही नातवंडांची पिढी चांगलंच औषध असते.' 'रोजच्या औषधाच्या गोळ्यांपेक्षा चार कौतुकाचे शब्द, शाबासकी बरंच काम करते हे पुढच्या पिढीनं लक्षात घ्यायला काय हरकत आहे, शीर्षक आणि आशयाला साजेसे सुंदर मुखपृष्ठ अन्वर हुसेन यांनी साकारलेले आहे.

**मूल्य १५० रुपये   सवलतीत १०० रुपये**




# ग्रंथपान

**माझं इवलं हस्ताक्षर**
**संजय चौधरी**




**आतल्या गाभ्यातील संवेदनशील भाववृत्ती**

*''मी फुलांना म्हणालो, प्रेतावर उधळल्यावर तुम्हाला कसं वाटतं रे? फुलं म्हणाली, प्रेत म्हणजे आमच्या दृष्टीनं एक गळून पडलेलं फूलच असतं ...मातीकडे परत निघालेलं.''*

कवी कविता लिहितो म्हणजे काय करतो? तो काहीच करीत नाही. कवी एक माध्यम असतो लेखणी हाती घेण्यासाठीचे. तो हाती घेतो ती प्रत्येक वस्तू लेखणीच होत असेल तर त्याला कवी तरी काय करणार? घाम-रक्त-आसू यांच्या मिश्रणातून तयार झालेली शाईच उसळून येत असेल तर कवी तरी तिला कसा थोपवून धरणार? वेदनेला आराम पडावा म्हणून झाडपाला होणारी कविता त्याच्या लेखणीतून उतरत असेल, मुक्या वाचेचा ती शब्द होणार असेल, सुकलेल्या ओठांत ओलावा पेरणार असेल, तुटत चाललेल्या काळजात आपलेपणाचा पान्हा म्हणून पाझरणार असेल तर कवी या लेखणीचे माध्यम का नाही होणार? कवीला जे दिसते, ज्याने त्याच्या मनावर आघात होत आहेत, याच्या संवेदनांची स्पंदने अस्वस्थ निखाऱ्यासारखी पिळवटून निघत आहेत, त्याच्या आतला सुहृद त्यामुळे उसळत आहे, तो कवी डोळ्यांवर झापड लावून निद्रीस्त अवस्थेत कसा राहू शकतो? जो काळाचा हिशोब मांडतो. झुलवत ठेवणारा गारुडी तो वर्तमानकाळ अत्यंत बेभरवशाचा इसम म्हणजे भविष्यकाळ आणि भूतकाळ म्हणजे छळून छळून बेपत्ता झालेला दगाबाज! असा थेट काळावर प्रहार करणारा कवी ठामपणे उभा राहतो तेव्हा तो असतो आजचा उद्गार, उद्याचा आश्वासक पहारेदार. त्यांच्या हातात असलेली लेखणी आहे दुधारी तलवार, घाव घालणारी, घाव पचवणारी आणि त्याचवेळी पान्हा जिवंत ठेवणारी, मायेच्या ओलाव्याने चिंब ओथंबलेली. असा कवी ज्याचे नाव आहे संजय चौधरी. तो घेऊन आला आहे कवितासंग्रह ज्याचे शीर्षक आहे, 'माझं इवलं हस्ताक्षर'.

अलीकडे एक ओरड सतत कानांवर येत आहे, कवी उदंड आहेत; परंतु त्यांच्या कवितासंग्रह छापणारे प्रकाशकच त्यांना मिळत नाही. तर प्रकाशकांची तक्रार वेगळीच, कवितासंग्रह छापतो परंतु कुणी त्यांना विकत घेणारेच नाहीत. या दोन्ही आक्षेपांना खोडून काढणारा, अल्पावधीत लोकप्रिय झालेला कवितासंग्रह आज आपल्यासमोर आहे. त्याला लाभलेले प्रकाशक मान्यवर आहेतच, परंतु त्यांनी ज्या विश्वासाने हा संग्रह प्रकाशित केलेला आहे, त्याने ना प्रकाशकांच्या विश्वासाला बट्टा लागू दिला ना कवीच्या आत्मविश्वासाला. त्याचे शीर्षक आहे 'माझं इवलं हस्ताक्षर'. आज या कवितासंग्रहाची तिसरी आवृत्ती माझ्यासमोर आहे. पहिली आवृत्ती मीच कवीकडून विकत घेतलेली होती. आजची तिसरी आवृत्तीही माझ्या हाती आहे. पहिल्या आवृत्तीने त्यावेळी निखळ आनंद दिला होता. आजची आवृत्ती वाचताना तिच्यातला ताजेपणा तितकाच ताजा टवटवीत आहे. पूर्वीइतका, नव्हे त्याहून अधिक मुरलेल्या वाइनसारखा. इथे एक मला स्पष्ट करायला हवे, आवृत्ती असते ती मूळ संहितेत केलेल्या बदलाची. आणि ज्यांत कुठलाही बदल न करता पुन्हा त्याची छपाई होते त्याला म्हणतात पुनर्मुद्रण! 'माझं इवलं हस्ताक्षर' या कवितासंग्रहाचे तिसरे पुनर्मुद्रण नाही, आहे ती आवृत्ती!

या संग्रहात असलेल्या अनेक कविता या मुक्तछंदातील आहेत. त्या वाचताना सहजपणे आपल्या मनाच्या तळाशी जाऊन आपला ताबा घेतात. त्यांच्यातले व्यक्त होणे हे थेट संवादरूपाने आल्यासारखे वाटते. परंतु त्यांच्यातला जो आशय समोर येतो, त्याने थक्क व्हायला होते. गंगेवर स्नान करणारी म्हातारी एका वाक्यात आपल्या नजरेतला विखार टराटरा फाडून टाकते. 'आयुष्यभर या कातडीला चिकटलेल्या लोकांच्या नजरा धुतेय.' 'सुरकुत्या' या कवितेत. 'फाटत जाणाऱ्या स्वप्नांना ती टाके घालीत राहिली.' 'लाजमहाल : कसे सांभाळावेत तिने हे धुक्याचे दागिने?', 'गारुड : वारा करतोय तिचे लाड तिला समजून फुलांचं झाड.' अशा ठोका चुकवणाऱ्या, स्तब्ध करणाऱ्या, पावलांना बेड्या घालणाऱ्या, स्वतःला पारखून घ्यायला लावणाऱ्या अनेक प्रतिमा, प्रतीके या कवितांमधून व्यक्त झाली आहेत. ती नितळ मनाची, खोल डोहांनी भरलेल्या संवेदनांची आणि तितक्याच तरल वृत्तीची प्रतिबिंबे म्हणून आपल्यासमोर उभी राहतात. मुक्तछंदाचा उपयोग आहे तरी त्याला स्वतःचा नाद आहे. त्यात ताल आहे. त्याची चौकट पक्की आणि बांधीव आहे, तर दुसऱ्या बाजूला बहुतेक कविता या गेय स्वरूपात आलेल्या आहेत. त्यांना स्वतःची चाल आहे, ठेका आहे. अभंग, दोहा यांच्याशी जवळीक साधण्याची किमया त्यांच्यात आहे. 'हात तुझे ओल्या मेंदीचे' ही कविता तर लावणीचे रूप लेऊन आलेली आहे. 'पाकळ्या पाकळ्या' ही कविता गझलेचा हात हातात घेऊन आलेली आहे. त्यामुळे कवितेची विविध रूपे या संग्रहात समाविष्ट झालेली आहेत. जगण्याचे विविध टप्पे आणि त्यांची प्रतिबिंबे समोर ठेवलेली आहेत. ही सगळीच भावणारी, सुखवणारी, अंतर्मुख असणारी आंदोलने आहेत. दत्ता हलसगीकर यांच्या शब्दांत सांगायचे तर 'आतल्या गाभ्यातली प्रामाणिक, संवेदनशील भाववृत्ती असलेली अल्पाक्षरी, कमालीची हळुवार, सत्कवीची सुकुमार लक्षणे असलेली ही कविता आहे.' स्वतः कवी कवितेविषयी लिहितो. 'कविता... आरशाच्या अनियमित आकाराच्या तुकड्यासारख्या त्या त्या जगण्याचं प्रतिबिंब घेऊन उभ्या हारीनं... वळणावळणावर.'

अशा या इवलं हस्ताक्षराच्या अफाट आवाका असलेल्या सुंदर कविता कवीच्या उज्ज्वल भवितव्याची ग्वाही देणाऱ्या आहेत हे निश्चितपणे म्हणता येते. या संग्रहाला आणि शीर्षकाला आपल्या आशयात सामावून घेणारे मुखपृष्ठ सतीश देशपांडे यांनी साकारलेले आहे.

**मूल्य १०० रुपये सवलतीत ६० रुपये**

# ग्रंथपान

**लाजवाब**
**ज्योती दाते**



**दिलखुलास बेमिसाल व्यक्तिवाचे लाजवाब कथन**

*''मी कलाकारांना शिकवतो व खासकरून गाण्यात भावनिर्मिती कशी करावी, त्यावर माझा भर असतो. ज्या गाण्यात भावना नसेल ते संगीतच नव्हे. भावना नसतील तर गाण्यातील अर्थही रसिकांच्या हृदयापर्यंत पोचू शकणार नाही. गायक, कलाकार सुरांनी झपाटलेला व भावनेने पछाडलेला असेल तसेच त्याचे गाणे परिणामकारक होईल व रसिक-हृदयाचा ठाव घेऊ शकेल.''*

कलावंत मनस्वी असेल तर त्याच्या कलेची अनुभूती कस्तुरीसारखी सर्वदूर पसरते. त्याला कलेचा वारसा घरातच लाभला आणि त्यात त्याने स्वत:ला झोकून दिले, तर त्याचासारखा भगवान दुसरा असू शकत नाही. रवी दाते हे असे मनस्वी, ध्यास असलेले, कलेवर आतून प्रेम करणारे कलावंत होते. संगीतकार म्हणून त्यांची कारकीर्द अनेक पैलूंत बहारदार बहरली, जाणीवपूर्वक त्यांनी तिची आराधना केली, त्याचे फळ म्हणजे संगीतक्षेत्रात त्यांचा असलेला लौकिक!

रामूभय्या, अरुण दाते यांची नावे प्रत्येक संगीतप्रेमी रसिकांच्या हृदयात विराजमान झालेली आहेत. रामूभय्यांचा कालखंड थोडा आधीच्या काळातला. परंतु त्यांनी मिळवलेला लौकिक त्यांची संगीत कलेवरील भक्ती ही रवीसाठी ठेवाच म्हणायचा. रामूभैय्या हे रवी दाते यांचे पिताजी तर अरुण दाते हे बंधू. एकाच घरात असे तीन संगीतकलावंत असणे हे 'घराणे'च म्हणायला हवे. रामूभय्या हे इंदूरचे. कुमारगंधर्वांचा मुक्काम इंदुरात असायचा तो रामूभय्यांकडे. त्यामुळे कुम ारगंधर्वांचा सहवास, त्यांची गायकी रवी दाते यांना घरातच अनुभूती देऊन जायची. कुमारांच्या मैफिली ही तर त्यांच्यासाठी मेजवानीच म्हणायची.

नोकरीनिमित्त मुंबईत वास्तव्याला आले आणि मंगेशकर कुटुंबीयांशी घनिष्ठ संबंधाने जोडले गेले. तिरूपतीला लता मंगेशकर यांच्या गायनाचा कार्यक्रम असताना तबल्याची साथ करण्यासाठी त्यांनी रवी दाते यांना सोबत घेतले होते. इतकेच नाही तर प्रत्यक्ष बालाजीच्या हिऱ्या-सोन्याच्या दागिन्यांनी मढवलेल्या लखलखत्या मूर्तीसमोर बसून लतादीदींना तबल्यावर साथ करण्याची सुवर्णमय संधी त्याला मिळाली होती. ही संधी त्यांच्यासाठी स्वर्गीय आनंद देणारी ठरली. तसाच आनंद किशोरी आमोणकर यांच्या गायकीने आणि अगत्यशील स्नेहाने दिला. सी. रामचंद्र, कल्याणजीभाई, पु.ल. यांचाही स्नेह अनुभवास आला. त्यांच्या हृद्य अशा आठवणी यात आहेत. गझलमुळे जगजित सिंग, सुरेश भट यांच्याशी खूप जवळचे संबंध प्रस्थापित झाले. याच गझलच्या प्रेमाखातर पाकिस्तानी गझलगायक मेहदी हसन यांना भेटण्यासाठी अगत्याने हॉटेलवर गेले.

लेखिका रवी दाते यांच्याविषयी अभिमानाने लिहितात, 'हे एक लाजवाब, जिंदादिल, अंतर्बाह्य रसिक कलाकार व गुणग्राहक असे अष्टपैलू व्यक्तित्व होते. ह्यांनी वडिलांकडून देखण्या-रुबाबदार व्यक्तिवाचा वारसा घेतला होता. त्याचप्रमाणे गुणग्राहकता, हजरजबाबी विनोदी वृत्तीचा, सौंदर्यसक्तीचा व अनेक कलागुणांचा वारसाही जन्मजात मिळवला होता. असे असले तरी त्यांच्या शीघ्रकोपी संतापाचाही त्या उल्लेख करतात.

'लाजवाब संगीतकार रवी दाते यांचा अफलातून जीवनप्रवास' असे या कथनाचे शीर्षक आहे. याच्या लेखिका आहेत ज्योती दाते. याचे शीर्षक आले आहे मंगला गोडबोले यांनी लिहिलेल्या, दिलखुलास दाद दिलेल्या प्रस्तावनेतील एका वाक्यातून, 'हे एका बेमिसाल' माणसावरचं 'लाजवाब' पुस्तक आहे' या वाक्याची प्रचती पुस्तक वाचताना वाचकाला नक्कीच येईल. रवी दाते हे दिलखुलास, बेमिसाल, लाजवाब व्यक्तिमत्त्व होतेच. त्यांच्या सोबत असलेला त्यांचा परिवारही याला अपवाद नाही. स्वत: लेखिका ज्योती-जोतिर्मयी दाते यांच्याकडे असलेल्या गुणांचाही परिचय सहजपणे यात आलेला आहे आणि तो दाद द्यावा असाच उत्कट आहे. सुप्रसिद्ध लेखक वसंत वरखेडकर यांच्या या कन्या. लेखनाचा वारसा त्यांनीही जपला आहे. पत्रकारिता अनेक काळ केलेली असल्याने विविध विषयांवर त्यांनी लेखन केलेले आहे. प्रवासाची आवड असल्याने अनेक देशांचा प्रवास, त्याची वर्णने, भेटलेली माणसे यांच्यावर त्यांनी भरभरून लिहिले आहे. त्यांच्याविषयी मंगला गोडबोले लिहितात, 'बावन्न वर्षांच्या समृद्ध सहजीवनाची समाप्ती झाल्यावरही जीवनावर, जीवनदृष्टीवर अशी काजळी जमू न देण्याचा ज्योतीकाकूंचा कटाक्ष पुस्तकात जाणवतो, तो मला विशेष अभिनंदनीय वाटतो.'

लेखिकेने हे कथन रवी दाते यांच्या निधनानंतर पूर्ण केलेले आहे, ज्याची सुरुवात रवी दाते हयात असतानाच सुरू झालेली होती. रवी दाते जसे जगले, त्यांचा जो सहजीवनात प्रवास घडला, त्याच्या ज्योती दाते सहचारिणी म्हणून साक्षीदार आहेत, नव्हे त्यांचाही त्यात सहभाग आहे. त्यामुळे हे लेखन करताना कुठे अडखळण्याचा प्रश्नच नव्हता. रवी दाते यांच्याप्रमाणेच अरुण दाते, मुले, सुना, दीपाली व समीर, सुरजित व अदिती यांच्या प्रगतिशील यशस्वी जीवनप्रवासाविषयी त्यांनी मुक्तपणे लिहिले आहे. त्यामुळे हे संपूर्ण दाते कुटुंबाचे कथन आहे असे म्हणता येईल. यात नेहमी एक धोका असतो, लेखक व निवेदक जमेची अधिक बाजू स्वत:कडे घेतो, परंतु इथे तसे झालेले नाही या पुस्तकाचे दोन विभाग करण्यात आलेले आहेत. एका भागात लेखिकेने केलेले वर्णन येते तर दुसऱ्या भागात आठवणीचा मोहोर जोडलेला आहे. अनेक निकटवर्तीयांनी रवी दाते यांच्या अनुभवांना, संबंधांना आत्मीयतेने उजाळा दिलेला आहे. आत भरपूर फोटो दिलेले आहेत, ज्यात दिसणारी मान्यवरांची प्रभावळ थक्क करणारी आहे. त्यामुळे या लेखनाला परिपूर्णता लाभली असेही म्हणता येईल.

एक लाजवाब जीवनप्रवास वाचल्याचा दिलखुलास आनंद हे पुस्तक देते. लेखनही ओघवते, नेमके आणि संपूर्ण आहे. ग्रंथालीने त्याची केलेली निर्मिती त्याला साजेशी केलेली आहे. सतीश भावसारांचे मुखपृष्ठ लाजवाब!

**मूल्य २०० रुपये  सवलतीत १२० रुपये**